# वऱ्हाडसमाचार.

**BERAR SAMACHAR**

वर्ष ४२ ] आकोला वऱ्हाडसमाचार सोमवार तारीख ६ माहे एप्रिल सन १९०८ इ० [ अंक १२



## वर्गणीचेदर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........२ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशिचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन आळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीस त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.



## जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

ह्या बँकेत खाली दिलेल्या भटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविता जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेवर व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A Phillips
आकोला ९।१।०९ } एजंट
नं ७३


## नोटीस

नोटीस बेशमी रंगापा वा गंगापा बोंद्रे दुकान ता० चिखली

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझी आई नामे राधाबाई मर्द विठोबा वागीन राहणार मेरेबुजरुक ता. चिखली हल्लीं मुक्काम चिखली ही आज अवमाज सहा महिन्यापासून तुमचे येथे आहे. तेथेच ता० १८-११-०७ रोजीं मरण पावली आहे. व मी तिची वारस मुलगी आहे. तिजला माझे शिवाय दुसरे कोणी वारसदार नाहीं तरी तुम्हांस या नोटिशीनें असें कळविण्यांत येतें कीं तिचे जवळ असलेले डागिने व भांडे कुंडे तुह्मी ही नोटीस पावल्या दिवसापासून ८ दिवसाचे आंत मला आणून देणें.

( मेरे बुजरुक येथें )

| | | |
|---|---|---|
| चांदीचा माल | | वजन तोळे |
| हातचे कडे चार ४ | | ४० |
| दंडच्याचा जोड १ | | ४० |
| पाटल्याचा जोड १ | | २० |
| गळ्यांतील लिंगाकार देव गोफासह | | २२ |
| कांकणाचा जोड १ | | १० |
| सोन्याचा नग | | वजन तोळे |
| पुतळ्या सहा | | २ |
| नथ सोन्याची नऊ मासे | | ०८९ |
| मुद्या दोन प्रत्येकी वजन दोन तोळे | | ४ |
| तांब्याचीं भांडीं नग | पितळेचीं भांडीं | नग |
| गुंड ३ | मोठी पितळी | १ |
| गंगाळ ३ | बहगुणें मोठें | १ |
| घागरी ३ | पितळ्या लहान | ४ |
| मोठ्या पितळ्या २ | तांबे | ९ |
| | कढची | २ |

माझे ऐकण्यांत आलें आहे कीं माझी आई प्लेगानें फार आजारी असतांना तिच्या नांवानें असलेलें शेत आखरचें मला बुडविण्याच्या हेतुनें तुह्मी आपल्या फायद्या करितां असामीच्या नांवानें खरेदी केलें आहे. तें खरेदीखत खोटें आहे. तिला विकण्याची कांहीं गरज नाहीं. वरील दाखविलेला माल न आणून दिल्यास मी तुमचेवर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून या नोटिशीचे खर्चासह सर्व खर्च घेतला जाईल कळावें.

सही

काशीबाई मर्द बापु आरावाणी हिंगमिरे राहणार मेरेबुजरुक ता० चिखली

नं० ख० ४ निशाणी हातची बांगडी

## जाहिर नोटीस

खालीं सही करणार यांजकडून सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं जनाई जवने हनवंतगीर गुरु रावेगीर गोसावी राहणार वीवर ता० बाळापूर ही माझी लग्नाची बायको आहे. इच्याशीं कोणी गंधर्व वीवाह लाऊं नये. गंधर्व लाविल्यास कायद्याप्रमाणें तजवीज केली जाईल. हे सर्व लोकांस जाहीर नोटिशीनें कळविलें आहे. दस्तुर नारायण रामराव.

सही

हनवंतगीर गुरु रावेगीर गोसावी राहणार विवर नि. खु.

नं. ख. ६

## नोटीस

नोटीस बेशमी रा० रा० पुंजाजी वल्लद दुलाजी राहणार रिंगणवाडी ता. जळगांव

यांसः—

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमचे दुकानचे नांवांनें दस्तैवज जानजी वल्लद संताजी झाली बानखेडे यांचेवर दावा करण्यास तुह्मास मुखत्यारपत्र माहे सप्टेंबर सन १९०७ च्या सुमारास दिलें व आपले जवळ दस्तैवज व त्याचे खर्चाकरितां रुपये १४० अक्षरी एकशें चाळीस दिले. परंतु तुह्मी त्या दस्तैवजाची फिर्याद दाखल केली नाहीं व फिर्यादी करितां खर्चाचे रुपये नेले ते आपण स्वतः खर्च करून टाकले आहेत. या कारणावरून ह्या नोटिशीनें आपणास कळविण्यांत येतें कीं अपलें मुखत्यारपत्र रद्द केलें तरी आमचे दुकानासंबंधीं तुह्मी कोणताही व्यवहार करूं नये व आपण रुपये १४० खर्च केलेले आठ दिवसांचे आंत आणून देऊन आमची पावती घेऊन जावी असें न केल्यास आपलेवर योग्य कोर्टांत काम चालवूं. दस्तैवज दुकानचे वकील रा० रा० अण्णेकर यांच्या पाशीं असून फिर्यादही लिहून तयार आहे. रुपये तुह्मी न दिल्यामुळें फिर्याद तशीच पडून राहिली होती. ही नोटीस दिली तारीख ३१-३-१९०८ इसवीं

सही

बिरीचंद कस्तूरचंद यांच्या दुकानचा मालक शिवलाल कस्तूरचंद द. खुद राहणार रिंगणवाडी ता० जळगांव

नं० ख० १

## नोटीस

नोटीस राघोजी व गणाजी वल्लद विठोबा कयने कुणबी राहणार पिंपळोद तालुके दर्यापूर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा नवरा नामे नारायणजी हा मरण पावल्यास अजमास वर्षे सत्रावर्षे झालें तेव्हां पासून तुह्मी मजला त्रास देत आहां, या सालची रकम मालाबद्दल १२९ सवाशे रुपये व ठेव तुह्माजवळ आहे ते रुपये २०० दोनशे एकून रुपये ३२९ नोटीस पावले दिवसापासून पंधरा दिवसांत आणून द्यावे व आमची पावती घ्यावी. शिवाय गणाजीचें शेतांत शेत आमचे आहे तें वाटून द्यावें दुसरी माझी देराणी सारजी इचें व माझें साइकीचें पेव आहे तिलाही आपण फंद देतां ती एकत्रीचेंच आहे असें ह्मणतात. ह्या गोष्टी बरोबर नाहींत या सर्व कामाचा पंधरा दिवसांत निवाडा करावा न केल्यास दिवाणींत फिर्याद केली जाईल. कळावें. ता० २८ माहे मार्च सन १९०८ इ. दस्तूर भैयराम गणाजी काराळे कुणबी रा. बडाळी दस्तूर खुद

सही

किसन अज्ञान पालन करणार आई राधी मर्द नारायणजी कयने राहणार पींपळोद ता० दर्यापूर निशाणी

नं. ख. ७ खुद हातची बांगडी

## नोटीस

एलिचपूर सिव्हिल स्टेशन म्युनिसिपाल कमिटीचे हद्दीत राहणार सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं ता. २९ मार्च १९०८ इसवीं रोजीं सदहू कमीटीनें सन १९०८-०९ साला करितां भंगी पट्टी, घरपट्टी, हौदपटी व पोलीस पट्टीचा ठराव केला आहे. सदहू झालेल्या ठरावाचें तक्ते म्युनीसिपल कमिटीचे ऑफीसचें वेळांत सकाळपासून संध्याकाळपर्यंत कोणाही मनुष्यास पाहण्यास मिळतील. तरी झालेल्या ठरावास जे कोणी नाराज असतील त्यांनीं आजपासून ( नोटिशीचे तारखेपासून ) ३० दिवसांचे आंत कमेटीकडे लेखी अर्ज करावे ह्मणजे त्यांच्या अर्जाचा विचार केला जाईल. सदहू मुदती नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तकरार ऐकली जाणार नाहीं. कळावें ता. ३० माहे मार्च १९०८ इ.

Ganesh Nagesh

व्हाइस चेअरमन

एलीचपूर सिव्हिल स्टेशन मुनिसिपल कमिटी

नं. ख. ८

## नोटीस

नोटीस बेशमी—आहमदखा वल्लद इसफखा जमादार पिंपळगांवराजा ता० मलकापूर जिल्हे बुलढाणे यांस नोटीस करणार हरूणखा वल्लद इसफखा रा० पिंपळगांव राजा ता० मलकापूर जि० बुलढाणे यांस जाहीर लेखानें कळविण्यांत येतें कीं सदहू वाडिलाचे जिनगींत माझा हक्कच असून तुह्मी मला खाण्यास खर्च देत नसल्यामुळें मी रागानें व निशेमध्यें सफदरखा वल्लद मुसेखा यांस माझा हिस्सा खरीदी करून दिला परंतु आकार रुपये ४००० चा भरना पावलो नाहीं. त्यांनीं ह्मटलें कीं घरीं रुपये देतो ह्मणून मी रुपये पावले असा कबूल जबाब दिला. सबदरखा रुपये ही देत नाहीं मला व खाण्यासही देत नाहीं व तुह्मी माझे वडील बंधु आहांत तर तुह्मीही मला खाण्यास देत नाहीं व शेती भाडेपट्यानें केल्यास लावून काढली ही मोठी तानूब आहे करितां कळवितों कीं तुह्मी माझा खाण्याचा सर्व बंदोबस्त नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत बंदोबस्त करावा. माझा बंदोबस्त न केल्यास मी रीतीप्रमाणें दावा करून माझा हक्क मी घेईन. पुढें कोणचेच प्रकारे सबब ऐकिली जाणार नाहीं कोर्टें खर्च मुद्दां बाकी भरून घेईन. ही नोटीस लिहून दिली सही ता० १।४।०९ इ.

नं. ख.९ सही ( उर्दुंत )

हरूणखा वल्लद इसफखा द० खुद

## वर्तमानसार

कांहीं दिवसांपूर्वी मध्यरात्रीच्या सुमारास पिंडीदास यांस लाहोर सेंट्रल जेलमधून दुसरीकडे नेण्यांत आलें. कोठें नेलें हें

इंग्रजी राज्य उलथून पाडण्याकरितां दारूगोळा व बंदुका जमविण्याची हिंदी लोकांची अमेरिकेंत खटपट चालू असल्याबद्दल माहिती लागल्यावरून कलकत्त्यांतील मुख्य पोलीस अधिकारी व स्कॉटलंड यार्ड मधील गुप्त पोलीस हे न्यूयार्कमध्यें गेले असल्याची न्यूयार्कप्रेस पत्रानें बातमी प्रसिद्ध केली होती. त्यानंतर याचसंबंधानें हिंदी लोकांस ताकीद या मथळ्याखाली इंडियन सोशियालाजिस्ट पत्रांत खालील आशयाचा मजकूर प्रसिद्ध झाला आहे:– 'हिंदुस्थान सरकारनें हिंदी लोक कोठेही असतील तेथें त्यांचा पिच्छा पुरविण्यासाठीं गुप्त पोलिसांची एक फौज तयार केली आहे. या फौजेंतील सैनिक फ्रान्स, स्वित्झर्लंड, जर्मनी अमेरिका, जपान या देशांत बंडाचा कट करणाऱ्या हिंदी लोकांचा शोध लावण्याकरितां फिरत असून त्यांचा सर्व खर्च हिंदुस्थानांतील तिजोरींतूनच करण्यांत येत आहे.

मुंबईच्या तारखात्यांतले संपवाले शिपाई ता. ३१ रोजीं कामावर हजर झाले नाहींत. कामावर कां येत नाहीं ह्मणून विचारतां, आपल्या अमलदारांनीं आपल्यास बोलाविलें नाहीं असें त्यांनीं उत्तर दिलें. काल रात्रीं त्यांनीं सभा भरविली होती. एक महिनाभर संप चालू ठेविण्याचें व चार दिवसांच्या आंत त्यांच्या अर्जास उत्तर न मिळाल्यास हिंदुस्थान सरकाराकडे दाद मागण्याचें त्यानीं त्या सभेंत ठरविलें. संपवाल्यांचा निश्चय झालेला दिसतो व पोस्टाच्या शिपायांकडून तारा पोंचविण्याचें काम भागत आहे असें पाहून अधिकाऱ्यांचाही सवलती न देण्याचा निश्चय झालेला दिसतो. चोवीस तासांच्या आंत कामावर हजर न झाल्यास संपवाल्यास बडतर्फ करण्याची अधिकाऱ्यांनीं ताकीद दिली आहे.

मँचेस्टर येथील मिसेस रायफंड या बाईची इस्टेट मृत्युसमयीं ४४८,६९२ पौंड होती व त्यांनीं त्यांपैकीं ५००० पौंड फंड हिंदुस्थानांत झनानीमिशनचे कामासाठीं अर्पण केला आहे.

कलकत्ता बंदरांतील लाइटशिप प्लॅनेट हें जहाज काल दुपारीं एकदम उडालें. त्यामुळें सर्व शहर हदरून गेलें. जहाजांत असलेलीं दोन माणसें अतिशय उंच उडून पडल्यामुळें त्यांचे तुकडे होऊन गेले. या जहाज शेजारीं असलेलें दुसरें जहाज याच प्रमाणें उडालें. व त्याचे तुकडे तुकडे झाले. या जहाजाची एक फळी सुद्धां हातीं लागली नाहीं. जहाजांत कोणी माणसें नसल्यामुळें फक्त दोन माणसें या अपघातांत मरण पावलीं.

डाका येथील एका बंगाली गृहस्थाच्या घराचा व एका दुकानदाराच्या दुकानचा झाडा पोलिसांनीं घेतला. तेव्हां त्यांस 'रणनीती' नांवाचें लष्करी माहितीचें पुस्तक सांपडलें! आतां पोलिसानें त्याचेवर १०७ कलमाअन्वयें खटला केला आहे! सध्यां हे दोघे गृहस्थ अनुक्रमें १००० व ५०० रुपयाचे जामीनावर खुले आहेत.

कलकत्ता येथील एच डूरास नावाच्या इंग्रजानें आपल्या खिजमतगारास कामावरून दूर केले; तेव्हां त्या खिजमतगाराच पगार मागण्याकरितां त्याचा भाऊ साहेबाकडे आला. पण त्याला पाहून साहेब गरम झाले व आपल्या समोरून निघून जा, ह्मणून त्या इसमास सांगूं लागले; पण तो समोरून गेला नाहीं. तेव्हां साहेबांचा कोप अनिवार होऊन त्यांनीं बंदुक झाडली, त्यामुळें तो इसम व त्याच्या मागें उभी असलेली एक मुलगी जखमी झाली! साहेब मजकूरावर खटला करण्यांत आला असून खटला सेशनपुढें चालणार आहे.

सोमवार ता. ३० रोजीं रगून येथील दुकानदारांनीं बराच दंगा करून गांवांत लुटालूट केली. दंग्याच्या भीतीनें दुपारपर्यंत सर्व दुकानें बंद होतीं. अखेर बंदोबस्ताकरितां लष्करी पोलिसची योजना झाल्यानंतर सर्व व्यवहार पूर्ववत चालूं झाला दंगेखोरांपैकीं १८–२० इसमांस पकडण्यांत आले आहे. उपहाराचे जिन्नस व फळफळावळ विकणाऱ्या दुकानदारांच्या दुकानांचा भाग पुढें आला असल्यास त्यावर म्युनिसिपालिटीनें ता. १ एप्रिल पासून दरमहा दर फुटास दोन रुपये प्रमाणें कर बसविला. म्युनिसिपालिटीच्या प्रसिडेंटच्या द्वारें या दुकानदारांनीं स्थानिक सरकाराकडे अर्ज ही पाठविला होता, त्याचें समाधानकारक उत्तर न आल्यामुळेंच हा दंगा झाला असावा असा अंदाज आहे. हल्लीं तेथील दुकानदारांनीं संप करून आपलीं दुकानें बंद केलीं आहेत. बदमाष लोकांनीं लुटालूट करण्याची ही संधि साधून शहरांत बराच धुमाकूळ माजविला. बाजारांतील बऱ्याच मालाची त्यांनीं नासधूसही केली. लष्करी मदतीनें सध्यां रंगून येथें स्थीरस्थावर झालें आहे. तरी पुन्हां दंगा होणार अशा कंडया वरचेवर उठत असल्यामुळें लोकांची धास्ती अद्याप कमी झाली नाहीं.

मि. जॉन रेडमंड ह्यांनीं आयर्लंडला होमरूल देण्याविषयींचा कॉमन्स सभेपुढें आणलेला ठराव, इंम्पीरियल पार्लमेंटच्या वर्चस्वाचें रक्षण करण्यासंबंधाच्या मि. आस्किथ ह्यांच्या उपसूचनेसह पास झाला. ह्या ठरावाला ३१३ अनुकूल व १५७ प्रतिकूल मतें पडलीं.

ता. २७ मार्च रोजीं डाका येथें रॅली ब्रदर्सच्या तागाच्या वखारीस आग लागून कित्येक देशी व विदेशी व्यापाऱ्यांचें फार नुकसान झालें आहे. युरोपियन व्यापाऱ्यांचें १५,००० मण तागाचें नुकसान झालें आहे. देशी व्यापाऱ्यांचें ९,००० मणांचें नुकसान झालें आहे. बंगाली कंपनीच्या मालाचा विमा उतरलेला नाहीं. आग विझविण्यास पाण्याचे बंब लौकर आले नाहींत.


# वऱ्हाडसमाचार

चैत्र शुद्ध ५ शके १८३०


## जमाखर्चासंबंधी वादविवाद.

हिंदुस्थान सरकारच्या कायदेकौन्सिलांत नव्या वर्षाच्या जमाखर्चाच्या अंदाज पत्रकावर झालेला वादविवाद बराच संतोषकारक झाला असें ह्मणण्यास विशेषशी हरकत दिसत नाहीं. या वादविवादांत सरकारी आणि लोकपक्षीय अशा दृष्टीचा भेद सभासदांमध्यें दिसून आला नाहीं आणि लोकपक्षीय सभासदांच्या टीकेला आणि सूचनांना सरकारी सभासदांकडून जीं उत्तरें मिळालीं तीं देखील आदरपूर्ण अशींच होतीं असें तारतम्याच्या दृष्टीनें पहातां वाटेल. कांहीं वर्षापूर्वीच्या अशा वादविवादांसंबंधानें असें ह्मणतां येत नसे. त्यावेळीं लोकपक्षीय सभासदांच्या विवेचनाला सरकारी सभासदांकडून जे जबाब मिळत ते शिक्षक व शिष्य या संबंधाची आठवण करून देत असत. त्यांची भाषाही आतांपेक्षां विशेष कडक असे. तेव्हांच्या आणि आतांच्या या स्थितींतील या फरकाला लोकपक्षीय सभासदांच्या अंगचें कोणतेंही न्यून जबाबदार नव्हतें हें स्पष्टच आहे. यंदांच्या जमाखर्चावरील वादविवादांत हिंदुस्थान सरकारचे फडणीस ना. मि. बेकर यांनीं गेल्या पंधरा वर्षांतील वादविवादांचें पर्यालोचन असें प्रांजलपणें कबूल केलें कीं लोकपक्षीय सभासदांच्या भाषणांमुळें सरकारला बहूतेक खात्यांच्या कारभाराच्या संबंधांत उपयुक्त आणि मोल्यवान सूचनांचा लाभ झालेला आहे. कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासदांच्या संख्येचें प्रमाण कायमचें कमी ठेवण्याच्या सरकारी कल्पनेशीं हा कबुली जबाब किती विसंगत आहे हें सांगणें नको. यंदा पुनः दुष्काळाच्या बोजामुळें शिक्षण आणि इतर लोकोपयोगी कार्याकडे होणें अवश्य असलेल्या खर्चाचें मान आंखुडतें ठेवावें लागणार असल्याबद्दल ना. मि. बेकर व व्हाइसरॉय यांनीं दिलगिरी प्रदर्शित केली. पण दुष्काळासारखी आपत्ति उपस्थित झाली ह्मणून लोकोपयोगी अशीं जरूरीचीं इतर कामें तहकूब ठेवण्यांत यावीं हा नियम ह्मणून कबूल करणें रास्त होणार नाहीं. कारण मोफत प्राथमिक शिक्षणासारखीं कामें अशानें कधींही हातीं धरवणार नाहींत. अशा रीतीच्या ज्या सुधारणा आहेत त्यांच्या आड दुसरा कोणताही मोठा खर्च येऊं देण्याची रीति सुधारलेल्या देशांत नाहीं. देशाच्या सर्व अभिवृद्धीचा पायाच अशा शिक्षणासारख्या सुधारणांची प्रगति पैशाची कितीही टंचाई सरकारी खजिन्यांत असली अगर आगंतुक कारणामुळें उत्पन्न होण्याचा संभव असला तरी त्यांची प्रगति थांबवितां येत नाहीं. इंग्लडनें बोअर लोकांशीं युद्ध सुरू केलें तेव्हां तें सरकार सांपत्तिक बाबतींत बरेंच मेटाकुटीस आलें होतें आणि अद्याप सुद्धां तेव्हांच्या धक्क्यांतून तें पुरतेंपणीं सावरलें नाहीं; पण शिक्षणासारख्या बाबींत त्यावेळीं सुद्धां यत्किंचितही आंखुडता हात घेतला गेला नाहीं, इतकेंच नव्हे तर एरव्हीं प्रमाणें त्या काळीं सुद्धां शिक्षणाची व्यवस्था पूर्ण प्रगतिपर अशा रीतीनें चालूं ठेवण्यांत आली होती. मोफत प्राथमिक शिक्षण ही एकंदर प्रजेच्या चारित्र्यासंबंधाची सर्वांत महत्वाची बाब दुष्काळाच्या संकटाच्या सबबीवर तहकूब ठेवण्यांत येऊं नये. त्याकरितां जरी विशेष जास्त खर्च करावा लागला तरी या नव्हे तर त्या मार्गानें खर्चाची तरतूद सरकारला करून ठेवतां येण्याजोगी आहे. अशा प्रसंगीं उत्पन्न वाढविण्यासाठीं परदेशांतून येणाऱ्या मालावरील जकात वाढविण्याची सुधारलेल्या राष्ट्रांची रीति हिंदुस्थान सरकारनें अनुसरण्यास कोणती हरकत आहे?

परदेशी मालावरील जकातीच्या संबंधांत बोलतांना मध्यप्रांतातर्फेचे सभासद ना. चिटणविस यांनीं देशांत उत्पन्न होणाऱ्या कपाशीच्या मालांवरील जकात उठविण्याची सूचना केली. हिंदुस्थान सरकारला ही सूचना अर्थात रुचली नाहीं. सरकारतर्फे अशी सबब पुढें करण्यांत आली कीं ही अंतर्गत जकात उठविली तर आयात जकातही उठवावी लागेल आणि तसें केलें ह्मणजे सरकारी तिजोरीला दरवर्षी साडे चार कोटि रुपयांची चाट लागेल. देशाच्या एकंदर स्थितीचा विचार करतां येवढ्या मोठ्या रकमेवर पाणी सोडावें हे सरकारास बरें वाटत नाहीं. आणि आयात जकात काढून टाकल्याखेरीज नुसती अंतर्गत जकात उठवून लंकेशायरवाल्यांचा रोष करून ब्रिटिश सरकार तयार होणार नाहीं. यावर ना. मि. चिटणविस यांनीं या अंतर्गत जकातीमुळें हिंदुस्थानांतील उद्योग धंद्यांचें कसें नुकसान होत आहे हें दाखवितांना असा इषारा दिला कीं आतां यापुढें या प्रश्नाचा निकाल करून टाकल्याखेरीज पुढें पाऊल टाकणें अशक्य आहे, सध्यांच्या स्थितींत सरकारचें व प्रजेचें उभयतांचेंही नुकसान आहे. प्रसिद्ध जपानी सरदार काउंट ओकुमा यांनीं कांहीं दिवसांपूर्वीं जें भाषण केलें त्यावरून हें तर ठाम झालें आहे कीं हिंदुस्थानच्या हितावर पाय ठेवून आपला व्यापार वाढविण्याचा निश्चय करण्यापर्यंत जपानी लोकांची मजल येऊन पोहोचली आहे. या बाबतींत जपनी लोकांचें धोरण कसें आहे, त्याचें दिग्दर्शन ना. मि. चिटणविस यांनीं केलें. जपानच्या व्यापारधंद्याची अभिवृद्धी करण्यासाठीं निर्यात व्यापार चालविणाऱ्या जपानी व्यापाऱ्यांना पैशाच्या रूपानें जपानी सरकार मदत करीत असतें, या मदतीच्या जोरावर मोजे, गंजीफ्राक वगैरे माल जपानी व्यापारी हिंदुस्थानांत देशी मालापेक्षां स्वस्त दरानें देऊं शकतात आणि त्यामुळें मुंबईच्या एका प्रसिद्ध गिरणीला अशा जातीचा माल काढण्याचें सोडून द्यावें लागलें. अशी स्थिति असतां तिजकडे डोळे झांक कोठवर करावयाची आणि स्वस्थ कोठवर बसावयाचें या प्रश्नाचा विचार व्हावयास पाहिजे. या बाबतींत चौकशी करण्याचें आश्वासन सरकारतर्फे ना. मि. हार्वे यांनीं दिलें. कारखानदार व निर्यातीचे व्यापारी यांना पैशासंबंधीं मदत करण्याच्या जपान सरकारच्या पद्धतीमुळेंच हिंदुस्थानांतील सुताच्या

व्यापाराला चीन देशांत धक्का बसलेला आहे. आणि आतां तर याच अस्त्राचा प्रयोग खुद्द हिंदुस्थानावर करण्याची मोकळीक जपानी लोकांना डोळे मिटून देणें ह्मणजे हिंदुस्थानाला ठार बुडविणें होईल.

धान्याच्या असाधारण तेजीच्या भावाच्या संबंधांत ना. मि. गोखले आणि इतर लोकपक्षीय सभासद यांनीं केलेल्या टीकेचा हिंदुस्थान सरकारावर परिणाम होऊन या विषयीं पूर्ण चौकशी करण्यासाठीं एक कमिटी नेमावी किंवा कसें याचा विचार सरकार करीत आहे. धान्याची महर्गता आणि रुपयाची कृत्रिम रीतीनें वाढविलेली किंमत यांचा अन्योन्य संबंध आहे या विषयीं लोकपक्षीय तज्ञ गृहस्थांच्या मनांत मुळींच शंका उरलेली नाहीं. या आधारावर जी टीका करण्यांत आली तिचा परिणाम सरकारच्या फडागिसांवर झाल्यावांचून राहिला नाहीं. त्यांनीं असें बाजून दाखविलें कीं धान्याच्या चढलेल्या भावाच्या संबंध स्थानिक आणि तात्पुरत्या कारणांशीं नसून एकंदर पृथ्वीवर सोन्यारुप्याच्या नाण्याच्या भावाच्या तेजीमंदीशीं याचा जास्त निकट संबंध आहे. आणि तसें आहे यांत कांहीं आश्चर्य नाहीं. येवढें कबूल असल्यावर देखील या स्थितींत जास्त खोल चवकशी करून तिच्या दुरुस्तीच्या उपायांची योजना करण्याचें कर्तव्य हिंदुस्थान सरकारनें आतांपर्यंत टाळलें. आणि या दिरंगाईचा परिणाम यंदाच्या दुष्काळाच्या प्रसंगीं हिंदुस्थानांतील प्रजेला अत्यंत कष्टद अशा रीतीनें भोगावा लागत आहे. देशाच्या व्यापारी आणि सांपत्तिक स्थितीचें मान बऱ्याच अंशानें नाण्यावर अवलंबून असतें आणि अशा अत्यंत महत्वाच्या बाबतींत जी निष्काळजी राखण्यांत आली तिच्यामुळें असा अनर्थावह प्रसंग आल्यास त्यांत नवल कसचें ! खुद्द व्हाइसरॉय यांना देखील ही स्थिति कळून आली नव्हती असें नाहीं. हिंदुस्थानांत अस्वस्थता आहे ती कोणत्या स्वरूपाची आहे या विषयीं विवेचन करतांना त्यांनीं स्वमुखानेंच कबुली जबाब दिला आहे. हिंदुस्थानांतील अस्वस्थता राजकीय नसून आर्थिक आहे असें प्रतिपादन करतांना लॉर्ड मिंटो यांनीं दिलेला कबुलीजबाब अत्यंत प्रामाणिकपणाचा आहे. हिंदुस्थानांत केवळ राजकीय महत्वाकांक्षेचें प्राबल्य आहे असा पुर्वपक्ष कोणी केला होता हेंच समजत नाहीं. ती महत्वाकांक्षा किती आहे आणि कोणत्या वर्गांत मुख्यत्वेंकरून आहे या विषयींचा विचार क्षणभर बाजूला ठेवला तरी हिंदुस्थानांतील अस्वस्थता आर्थिक आहे हें विधान ब्रिटिश सत्तेच्या दोनशें वर्षांच्या अमलाला काळोखी लावणारें नाहीं असें ह्मणण्यास कोणी समर्थ होईल असें वाटत नाहीं. परमपूज्य दादाभाई नौरोजी, बाबु रमेशचंद्र दत्त आदिकरून हिंदी राजनितिज्ञांनीं सिद्ध केलेलीं प्रमाणें सरकाराला कबूल करावीं लागलीं ही संतोषाची गोष्ट आहे.

---

## न्याय व अंमलबजावणी.

यंदाच्या जमाखर्चावरील वादविवादांत न्याय व अंमलबजावणी या खात्यांच्या फाळणी संबंधानें सरकारतर्फें असें जाहिर करण्यांत आलें कीं या तजविजीचा अनुभव बंगाल प्रांतांत करून पहाण्याचें नक्की ठरलें आहे. या योजनेंत फौजदारी कामांतील न्याय देण्याचें व अंमलबजावणी करण्याचें अशीं दोन कामें अलग करून तीं स्वतंत्र अधिकाऱ्यांच्या हातीं देण्यांत येणार आहेत. न्याय देणाऱ्या अधिकाऱ्यांच्याच हातीं त्यांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार राहिल्यामुळें कित्येक प्रसगीं त्यांचेकडून त्या अधिकाऱ्यांचा दुरुपयोग होतो ही गोष्ट कोणालाच नाकबूल करतां यावयाची नाहीं. सरकारतर्फेंही ही स्थिति नाकबूल करण्यांत आली नाहीं. पण कोणत्याही अधिकाराचा दुरुपयोग होऊ शकतो येवढ्याच साठीं त्याचे व्यवस्थेंत फेरबदल करणें इष्ट होणार नाहीं, ह्मणून न्याय व अंमलबजावणी हीं कामें एकाच्याच हातीं ठेवल्यामुळें त्या अधिकाऱ्याचा दुरुपयोग होतो हें कारण या अधिकारांच्या विभागणीला घेणें सरकारला योग्य दिसत नाहीं. जेथें हीं दोन कामें एकाच अधिकाऱ्याचे हातीं नाहींत अशा देशांतही या दोन्ही खात्यांतील अधिकाऱ्यांचे हातून अत्याचार घडल्याचीं उदाहरणें आहेत, तेव्हां अधिकाराचा दुरुपयोग या नव्या योजनेनें सर्वतोपरी टळेल असें नाहीं. पण या कारणापेक्षां जास्त महत्वाचें असें कारण सरकारतर्फें ग्राह्य मानण्यांत आलें आहे. जिल्ह्यांतील शांततेसंबंधाची सर्व जबाबदारी ज्या अधिकाऱ्याचे माथीं असते त्यांच्या हातीं फौजदारी न्यायासंबंधीं कामें करणाऱ्या अधिकाऱ्यांवर पैरवी करण्याचा अधिकार असला ह्मणजे आपल्या वरिष्ठाचे धोरणास अनुसरून वागविण्याची कनिष्ट अधिकाऱ्यांची प्रवृत्ति व्हावी हें अगदीं सहाजिक आहे. किंबहुना ज्यांचा जिल्ह्याच्या शांततेशीं संबंध असतो असे फौजदारी खटले ह्मणजे नेहमींच केवळ निःपक्षपाती दृष्टीनें चालविण्यांत येतात असें नाहीं अशी खुद्द सर हार्वे ॲंडामसन यांनीं कबुली दिलेली आहे. स्वदेशी संबंधाच्या आणि राष्ट्रीय चळवळीच्या इतर बाबीसंबंधाच्या खटल्यांत हा अनुभव हिंदुस्थानांतील सर्व भागांत आलेला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या धोरणाची मॅजिस्ट्रेटांना माहिती असल्यामुळें फिर्यादी व न्यायाधीश अशीं दोन्हीं स्वरूपें त्यांच्या ठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येतात. या सर्वांचा परिणाम असा झाला आहे कीं लोकांचा फौजदारी न्यायदानावरील विश्वास पुरता उडून गेला आहे. सरकारच्या ध्यानांत ही गोष्ट आलेली दिसत आहे. न्याय व्हावा इतकेंच नव्हे तर न्याय झाला आहे अशी लोकांची खात्री झाली पाहिजे, असा पूर्वींच्या कोर्ट ऑफ डायरेक्टर्सचें एक वचन आहे, त्याचा अनुवाद व्हाइसरॉय व सर हार्वे ॲंडामसन यांनीं केला. न्यायदान पद्धति निष्कलंक असावी इतकेंच नव्हे तर तिजविषयीं संशय देखील उत्पन्न होऊं नये अशी सरकारची मोठी इच्छा दिसते. स्वदेशी खटल्यांत व नेटिव्ह युरोपियनमधील प्रकरणांत ही इच्छा पूर्ण करण्याची आशा कधीं दिसून येण्याचा संभव नाहीं येवढें मात्र खरें आहे. आतां होत असलेल्या सुधारणेंत ही दुरुस्ती झाली तरच लोकांचा विश्वास पुनः संपादण्याच्या उद्योगाला यश येण्याचा संभव आहे. या नव्या योजनेनें मॅजिस्ट्रेटांची इभ्रत कमी होईल अशी एक सबब सांगण्यांत येत असे. पण बंगाल सारख्या प्रांतांत मॅजिस्ट्रेटांच्या हातीं दुधारी सत्तेची तलवार असल्यानें सरकारी इभ्रतीला भरती येणें अशक्य आहे असें खुद्द सर हार्वे ॲंडामसन यांनाच वाटत आहे हें बरें आहे. न्याय खात्यांतील अधिकाऱ्यांविषयीं संशय घेण्यास जागा असतां एकाच अधिकाऱ्याच्या हातीं कितिही अधिकार ठेवले ह्मणून त्या पासून सरकारची इभ्रत वाढणें तर राहूं पण कायम रहाणें सुद्धां कठिण आहे हें सरकारास उमजून येण्याची सध्यांच्या काळीं तरी विशेष आवश्यकता आहे. न्याय व अंमलबजावणी हीं कामें अलग करण्यासंबंधाची चळवळ प्रथम बंगाल्यांतच प. वा. मनमोहन घोस यांनीं सुरू केली आणि या दुहेरी सत्तेच्या मिश्रणाचे दुष्परिणाम बंगाल्यांतच विशेष अनुभवास आले आहेत. तेव्हां आतां होणारे प्रयोग त्याच प्रांतांत व्हावेत हें सर्वतोपरी योग्य आहे. या प्रयोगांत असें धोरण राखण्यांत येणार आहे कीं सिव्हिल सर्व्हिसमधील अधिकाऱ्यांची व कनिष्ट अंमलदारांची नेमणूक एका खात्यांत कायमची झाली ह्मणजे मग त्यांचेकडे न्याय किंवा अंमलबजावणी यांपैकीं कोणतें तरी एकच काम असावें. एका खात्यांतून दुसऱ्या खात्यांत बदली झाल्यावर मग पहिल्या खात्यांतले अधिकार अंमलदाराकडे मुळींच राहूं नयेत. प्रत्येक जिल्ह्यांत एक मॅजिस्ट्रेट व एक सीनियर मॅजिस्ट्रेट असून त्याचे हातीं गुन्हे न घडूं देण्यासंबंधाचे व इतर अंमलबजावणीचे अधिकार राहतील. आणि सीनियर मॅजिस्ट्रेटकडे दुसऱ्या व तिसऱ्या क्लासचे मॅजिस्ट्रेटांच्या ठरावावरील अपिलें व तपासणी इत्यादि कामें व त्यांचे एकंदर कामावर देखरेख हे अधिकार रहातील. या सर्व व्यवस्थेंत एकच न्यून आहे. या नव्या योजनेंत सीनियर मॅजिस्ट्रेटांवर हायकोर्टाचा ताबा रहाण्याची व्यवस्था नाहीं. त्यांच्या बदल्या वगैरेसंबंधानें हायकोर्टाचा अभिप्राय घेण्यांत येईल असें आश्वासन देण्यांत आलें आहे खरें, पण तेवढें पुरें नाहीं. न्याय खात्यांतील इतर अंमलदाराप्रमाणें यांचेवरही हायकोर्टाची पुरती हुकमत चालावयास हवी होती. या प्रयोगांकडे सर्व लोकांचें लक्ष लागून राहील यांत कांहीं नवल नाहीं. पण त्यांत यश येऊन न्याय व अंमलबजावणी या खात्यांची गट्टी तुटण्याची वेळ सर्व हिंदुस्थानांत येईल किंवा नाहीं या विषयींची चिंता मात्र नाहींशी होणार नाहीं.

---

## राजकीय परिस्थिति.

हिंदुस्थानांतील सद्यकालिन राजकीय परिस्थितीचा निर्देश बजेटावरील वादविवादांत ओघानेंच केला गेला. सध्यांची आपली स्थिति अशी कां असावी असा प्रश्न देशांतील सर्व सुशिक्षित समाज करूं लागला आहे. याची आठवण ना० गोखले यांनीं दिली. त्यांचे शब्द इतके स्पष्ट नसले तरी स्थिति तशी आहे आणि तीच त्यांच्या डोळ्यापुढें होती याविषयीं शंका नको. अशी स्थिति असून आतां भागत नाहीं. ती बदललीच पाहिजे असें लोक उघडपणे बोलूं लागले आहेत. शांततेवरच सर्व प्रगति अवलंबून असणार ही ना० गोखले यांची सूचना अगदीं यथार्थ आहे. मानखंडना किंवा आशाभंग हे प्रकार दुस्सह तर खरेंच; पण खरा प्रश्न नुसत्या मानखंडनेचा किंवा शांततेचा नाहीं. सुव्यवस्थित प्रगतीला सरकार कितीसा अवधी ठेवणारहा मुख्य मुद्दा आहे. सध्यांच्या स्थितींतही कांहींसा मार्ग आहे ही गोष्ट नाकबूल नाहीं, पण हा मार्गही बंद करण्याची प्रवृत्ति वाढत चालली आहे. सर्व कांहीं सरकारच्या धोरणावर अवलंबून राहणार हें निश्चित आहे. अव्यवस्थेंत लोकांचें हित नाहीं हें स्पष्ट आहे. त्यासाठीं थोडीशी नामुष्की सहन करण्यास लोक तयार आहेत, पण अधिकाऱ्यांचें व्यवहार शून्यतेचें आणि सहानुभूतीला सोडून असणारें वर्तन असेंच चालूं राहिलें तर ज्यास्त अडचणी उत्पन्न झाल्यावांचून रहाणार नाहींत. सरकार कडक उपायांनीं अव्यवस्था मोडून टाकूं शकेल हें खरें पण दंडुक्यापेक्षां राजकारणी पुरुषांच्या दूर दृष्टीची, शहाणपणाची आणि धैर्याची उपयुक्तता जास्त आहे आणि त्यांची साक्ष पटणें इष्ट आहे असें ना० गोखले यांनीं बजाविलें लोकांचें हित हाच सरकारी कारभाराचा सर्वस्वी नव्हे तरी मुख्य हेतु आहे हें लोकांच्या अनुभवास आलें पाहिजे आणि तसें होण्याला एकंदर राज्यपद्धतीच्या धोरणांत तात्विक फरक झाला पाहिजे असें ना. गोखले यांनीं सांगितलें. लोकांच्या हिताची जपणूक होत आहे येवढेंच लोकांस समजून उपयोगी नाहीं तर त्या जपणुकींत आपलाही हात आहे हें त्यांच्या प्रत्ययास आलें पाहिजे. वर सांगितल्याप्रमाणें सध्यांचा प्रश्न नुसत्या सुखाचा नसून कर्तृत्वाच्या जबाबदारीच्या लालसेचा आहे हेंच खरें आहे. आणि ह्मणूनच ना. गोखले यांचें सारखें पुढारी सध्यांच्या राज्यव्यवस्थेंत क्रमशः पालट घडवून आणण्याचा प्रयत्न नहमीं करित आहेत. ना. गोखले यांची सद्यस्थितीसंबंधाची वर सांगितली पद्धतिहि लॉर्ड मिंटो यास रुचली नाही. त्यानीं सरकारच्या मार्गे असलेली विवंचना आणि तींतून निभावण्याविषयींची सरकारची खटपट यांचा विचार लोकपक्षीय सभासदांनीं केला नाहीं ह्मणून बराच ताशेरा झाडला. पण तो सर्व अनाठायीं होता हें सांगणें नको. सरकार विवंचनेंत असलें आणि तें आहे हें सर्वांना कबूल आहे पण या विवंचनेंतून मुक्तता करून घेण्यास अवश्य त्या उपायांची योजना करण्याचें धैर्य सरकार दाखवित नाहीं, हा लोकपक्षीय सभासदांचा मुख्य आक्षेप आहे. लोकांच्या हितांच्या आड न येतां त्यांची समजूत घालणें शक्य असेल तर तसें करण्यास लोक पक्षीय पुढारी तयार आहेत, पण आपल्या हिताच्या आड येऊन लोकांना आपल्याकडे वळवून घेण्यास सरकारी अधिकारी तयार नाहींत हा उभयतां मधील मुख्य फरक आहे.

---

## पाटील पटवारी

पाटील पटवारी ह्मणजे गांवचा राजा व प्रधान होय. पाटील पटवाऱ्यांची संस्था फार जुनी आहे. आणि प्रत्येक गांवचा पाटील ह्मणजे त्या गांवचें पांवडण समजत असतात. आणि त्याचा प्रामाणिकपणा, त्याच्या मनाचा मोठेपणा व स्नेहभाव यांचें प्रतिबिंब इतर गांवकऱ्यांच्या वर्तनांत इतकें तंतोतंत पडतें कीं पाटील पटवाऱ्याच्या मुस्थितीवर गांवची अबादानी अवलंबून असते/प्रवात पडला आहे. पण कालांतरानें ही गांवची कामदार मंडळी इतकी मागें पडत चालली आहे कीं त्यांना गांवकरी लोकच काय पण सरकारही फारसें चांगलें लेखीत नाहीं. आणि त्यांस इतर सामान्य महिन्याच्या किंवा वर्षाच्या नौकराप्रमाणें समजण्याचा आलिकडे रिवाज पडत चालला असून पाटील आणि पटवारी यांच्या कायद्याची रचनाही त्याच धोरणावर बनलेली आहे. अशा या स्थितींत आमच्या या जुन्या वाडवडिलांपासून चालत आलेल्या पाटील पटवाऱ्यासंबंधानें जेव्हां कोठें आनंदाचा उल्लेख ऐकण्यांत येतो किंवा त्यांच्या कामगिरीची महति सरकारी रिपोर्टांत वर्णिलेली वाचण्यांत येते तेव्हां सहाजिकच मोठा आनंद वाटतो. रा० रा० रुस्तुमजी फरदुनजी यांनीं गेल्या मुल्की रिपोर्टांत पाटील पटवाऱ्यासंबंधानें असें ह्मटलें आहे कीं या गांवच्या कामदार मंडळींचें काम गोळाबेरजेनें पाहातां फार वर्णनीय आहे वऱ्हाडची ही कामदार मंडळी अत्यंत विश्वासूक, सार्वजनिक कार्यांत पुढें सरसावलेली व राजनिष्ट अशी आहे. अलिशान नामदार चीफ कमिशनर राजश्री क्राडॉक यांनाही या मंडळीविषयीं विशेष अभिमान वाटतो, आणि त्यांनीं आपल्या ठरावांत पुष्कळशा अनुकूल गोष्टी हाताखालील अधिकाऱ्यांच्या नजरेस आणलेल्या आहेत. वऱ्हाडांत एकंदर १२३४ खेडीं असून त्या खेड्याचें काम करणारे १२१८ पाटील व २२०१ पटवारी आहेत. आणि पाटील मंडळींना जो हमूम मिळतो तो १३०७९२ असून पटवारी लोकांस मिळणारी रकम ३२९९९८ आहे. ह्मणजे सरासरीनें प्रत्येक पाटलाला ९३ रुपये साल व पटवाऱ्याला १९० रुपये साल पडतें. हें वेतन पाटील जें काम करितो त्याच्या मानानें फारच अल्प होय. वेतनाच्या दृष्टीनें पाहतां पाटलापेक्षां एखादा रोजचा मजूरदारही बरा ही गोष्ट नामदार चिफ कमिशनर यांच्याही लक्षांत गेल्या दवऱ्याच्या वेळेस आली आणि त्यांनीं हें वेतन वाढविण्या संबंधाचा प्रश्न अंत:करण पूर्वक हातीं घेतला आहे हें कळविण्यास आनंद वाटतो उत्तरोत्तर गांवच्या या कामदार मंडळींचीं कार्यें बहुगुणित झालीं आहेत आणि त्या मानानें त्यांच्या जबाबदाऱ्याही वाढल्या आहेत. पाटील पटवाऱ्यांना दंड खंड वारंवार करण्याचे प्रकार राजश्री क्राडॉक यांस पसंत नाहींत आणि राजश्री राबर्टसन हे कमिशनर असतांना त्यांनीं आपल्या हाताखालील अधिकाऱ्यास असें ही कळविलें आहे कीं पाटील पटवाऱ्यांच्या चुक्या संबंधानें जीं मुल्की प्रकरणें चालतात त्यामध्यें वेळाचा अपव्यय होऊन उगीच कागदावर मोठा बाऊ दिसतो. दुसऱ्या एका महत्वाच्या बाबीसंबंधानें चिफ कमिशनर साहेबांनीं एक चांगला ठराव केला आहे. ती बाब बदली पाटील किंवा पटवारी यांच्या वेतनासंबंधाची होय. आलिकडे साधारण धोरण असें आहे कीं जो बदली पाटील किंवा पटवारी असतो त्याला त्या जागेचा संपूर्ण मुशाहिरा देण्यांत यावा. आणि या धोरणानें मुख्य वतनदार मालकाला कांहींच बाब राहत नाहीं पण फक्त त्याच्या वतनदारी संबधाची जबाबदारी मात्र त्याच्या शिरावर असते. तेव्हां बदली माणसाला कांहीं वेतन ठरवून देऊन मालकाचा हक्क मालकाला देण्याविषयीं पाटील पटवारी कायद्यामध्यें १४ कलमांत जी योजना केली आहे तिचें अनुकरण साधारण नियमाप्रमाणें करण्याविषयीं हाता खालील मुल्की अधिकाऱ्यांस राजश्री क्राडाक यांची शिफारस आहे. वाईट कामाबद्दल जसा दंड तसें चांगल्या कामगिरीबद्दल बक्षीस पाहिजे असें वऱ्हाडचे जुने अंमलदार राजश्री हेअर साहेब यांचें फार आग्रहाचें मत होतें त्यामताचें पुष्टीकरण करण्याचा विचार स्थानिक सरकारचा आहे ही विशेष अभिनंदनाची गोष्ट होय. हें वंशपरंपरेचे हक्क व वतनदारी अव्याहतपणें चालविण्याचा स्थानिक सरकारचा संकल्प आहे असें आश्वासन राजश्री क्राडॉक यांनीं मुद्दाम दिलेलें आहे. आमच्या या वतनदार मंडळी विषयीं इतकी ही सहानुभूती राजश्री क्राडॉक यांनीं दर्शविली आहे याबद्दल आह्मी त्यांचे उपकार मानतों.

---

## जहाल मंडळी

### ( सरकारी अभिप्राय )

रा० रा० रुस्तुमजी फरदुनजी यांनीं वऱ्हाडच्या कमिशनरीचा चार्ज देण्यापूर्वी जो मुलकी रिपोर्ट लिहिला आहे त्यामध्यें प्रस्तुतच्या राजकीय चळवळी संबंधानें एक मुद्दाम अनुक्रम नंबर २२ चा पॅरिग्राफ नमुद केलेला आहे. पुष्कळांचा अनुभव असा आहे कीं आमच्या राजकीय चळवळीसंबंधानें अभिप्राय देण्याचें सामर्थ्य दूरदृष्टी, व मतस्वातंत्र्य जितकें युरोपियन अधिकाऱ्यांच्या अंगीं दिसून येतें तशा प्रकारची पात्रता आमच्या नेटिव्ह अधिकाऱ्यामध्यें नाहीं. या न्यायानें पाहतां राजश्री रुस्तुमजी यांच्या अभिप्रायाकडे फारसें कोणी लक्ष देणार नाहीं आणि तसाच विचार स्थानिक सरकारचा असला पाहिजे असें आह्मास वाटतें. आणि तसें वाटण्याला मुख्य कारण हें कीं या राजकीय चळवळी संबंधाच्या अभिप्रायाविषयीं राजश्री रुस्तुमजी यांचा कोठेंच गौरव केला नसून तत्संबंधी त्यांचा नामनिर्देषाहि कोठेंच नाहीं. स्थानिक सरकारच्या ठरावांतून अगदीं वर्ज केलेला हा अभिप्राय असा कीं वऱ्हाडांतील निरनिराळ्या जाती मधील संबंध व तसाच निरनिराळ्या जाती व सरकार यांच्या मधील संबंध सलोख्याचा व स्नेहभावाचाच आहे. तथापि जहाल ह्मणवून घेणाऱ्या कांहीं थोड्याशा शिकलेल्या लोकांना सरकारच्या धोरणाला दूषणें लावणें आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या कृतीची निभर्त्सना करणें यांतच मोठी प्रौढी वाटते. सरकार व प्रजा यांच्यामध्यें बेभरंवसा उत्पन्न करण्याचे आणि भांडण लावून देण्याचे प्रयत्न शहरें व खेडीं यांच्यांतून पद्धतवार चालू आहेत, जो हल्लीं सार्वजनिकरित्या राजद्रोह व्याख्यानांतून ऐकण्यांत येतो आणि कांहीं वर्तमानपत्रांतूनही प्रकाशित होतो त्याचा परिणाम बहुजन समाजाची राजनिष्ठा व शांतवृत्ति यांच्यावर अद्याप घडलेला नाहीं. तथापि बेसुमाराचीं व संताप उत्पन्न करणारीं व्याख्यानें व अग्रलेख यांच्यामुळें अज्ञ व स्वाभाविक संशयी लोकांच्या मनावर सहाजिकच परिणाम घडतो ही गोष्ट काल्पनिक नसून वस्तुस्थितीच्या खरी आहे आणि हे चळवळे लोक थोडे आहेत ह्मणून या गोष्टीचे वाईट परिणाम कमी मानतां येत नाहींत. या चळवळे लोकांना जी नवी मंडळी मिळतात ती बहुतेक शाळेंतील तरूण मंडळी असतात. नेमस्त विचाराची मंडळी ही गोष्ट कबूल करितात आणि प्रस्तुतच्या व पुढील पिढ्यांना या चळवळी पासून अपाय होईल हीही गोष्ट त्यांना कबूल आहे. पण दुःखाची गोष्ट अशी कीं ही नेमस्त मंडळी आपल्या विचारांना कृतीचें रूप आणीत नाहींत आणि राजद्रोह व भांडण यांच्या प्रवाहाचा प्रतिरोधही करीत नाहींत. या नवीन चळवळीचे परिणाम कांहीं असोत पण ही गोष्ट खरी कीं राज्यकारभाराचें कार्य उत्तरोत्तर संकटमय होत चाललें आहे.

वरील अभिप्राय मुद्दाम आह्मी मराठीमध्यें दिलेला आहे. याचें कारण असें कीं सरकारच्या मर्जींत असलेली उच्चउच्च अधिकारावर असलेली नेटिव्ह मंडळी हल्लींच्या चळवळी संबंधानें अभिप्राय देण्याला किती असमर्थ असतात याची अटकळ वरील प्रकारच्या अवतरणावरून होण्यासारखी आहे. जहाल पक्ष असो किंवा मवाळपक्ष असो फक्त ज्यांच्या त्यांच्या मार्गासंबंधानें निराळेपणा आहे पण राज्यकारभाराच्या संबधानें दोन्ही पक्षांचे अभिप्राय सारखेच प्रतिकूल आहेत किंबहुना सरकारच्या राज्यपद्धतींतील दोष जहालापेक्षां नेमस्तांच्या सूक्ष्म चौकस दृष्टीला अधिक दृष्टीस पडतात. प्रस्तुत राजकीय चळवळीविषयीं राजश्री रुस्तुमजी साहेबासारख्यांत ही अंतर्दृष्टी असणें शक्य नाहीं कारण ही गोष्ट त्यांच्या आजन्म व्यवसायाच्या कक्षे बाहेरची आहे.

---

## आग

आकोल्यास रेल्वे स्टेशनाजवळ एक मोठी गवताची सरकारी गंजी होती तिला गेल्या शुक्रवारीं रात्रीं आग लागून पंधरा लक्ष गवताच्या पेंढींचा चारा जनावरांच्या तोंडांत न पडतां या आगीमुळें भस्म झाला. आग कशी लागली याचा कांहीं अद्याप थांग लागला नाहीं. कांहीं जणांचा तर्क असा आहे कीं रेल्वेच्या इंजिनाच्या ठिणग्यामुळें ही आग लागली असावी किंवा कांहीं जणांच्या मतें कोणीतरी मुद्दाम ही आग लावली असावी अथवा एखाद्या विडीचा जळता भाग निष्काळजीपणानें तसाच इतरत्र पडल्यामुळें हा प्रकार घडला असावा. कांहींही असो तुर्त ही चाऱ्याची हानी मोठीच झाली. रा. रा. काशिनाथ श्रीराम जठार यांनीं चाऱ्याची अत्यंत महर्गता लक्षांत आणून हें इतकें गवत चांदा जिल्ह्यांतून सरकारी खर्चानें मुद्दाम आणाविलें होतें. आणि त्यांचा हेतु ऐन उन्हाळ्याच्या सुमाराला हा चारा योग्य किंमतीला विकून लोकांच्या गरजा भागविण्याचा होता. एवढी मोठी गंजी स्टेशनाजवळ असल्यामुळें आकोल्याचे भावही मंद झाले असून स्थिरावले होते. चाऱ्या संबधानें अशी लोकोपयोगी गोष्ट या जिल्ह्यांत मुद्दाम अनुभव घेण्यासाठींच ह्मणून यंदा करण्यांत आली होती. त्या मुळच्या हेतुचा असा विपर्यास झाला हें पाहून मोठें वाईट वाटतें. अशी चाऱ्याची योजना सरकार मार्फत इतरत्रही अवश्य व्हावी असें आह्मी सुचवितों आणि या पुढें आगीसारख्या धोक्या संबंधानेंही विशेष तजविजी करण्यात येतील असें आह्मी इच्छितों.

---

# वऱ्हाडवृत्त.

हवामान — या सतकात हवेमध्यें फेरपालट एकामागून एक असे पुष्कळ होत आहेत. कार्धी मेघगर्जना गडगडून] सोडतात कधीं मळभामुळें उष्मा अत्यंत होतो व वारा तुफानासारखा सुटून विजा चमकू लागतात. मध्यंतरी थोडा पाऊसही पडला. ताप, खोकला, गोवर, देवी इत्यादि आजार बळावले आहेत. अकोट तालुक्यांतील कांहीं गावांत प्लेगाचा उपद्रव चालूं आहे.

रा. रा. इ. मार्शल एक्स्ट्रा आसि. क. यास चिफ कमिशनरचे तैनातींत असिटंट सेक्रेटरी नेमण्यांत आलें.

खामगांवचे ऑनररी बेंच म्याजिस्ट्रेट रा. रा. पुरणलाल शामलाल, खांसाहेब भोलेखान लालखान, केशवराव मानराव व त्रिंबक केशव खानझोडे, यास सेकंडक्लास म्याजिस्ट्रेटचे अधिकार देऊन त्यांच्याकडे खामगांव तालुक्याचें काम देण्यांत आलें.

रावसाहेब विठ्ठल पुरुषोत्तम पुराणिक वणी यांस तिसरे वर्ग म्याजीस्ट्रेट नेमून त्यांच्याकडे वणी तालुक्याचे काम दिलें आहे. या सद्गृहस्थांवर सरकारची विशेष मेहेरबानी आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय.

रा. रा. ई. एच मिल्नर आसि. क. यांच्याकडे पुर्व वऱ्हाडचा भाग देण्यांत आला आहे.

पुरवणी— आमच्या अंकासोबत रा. रा. कृष्ण शास्त्री पेंडसे वैद्य मुक्काम मुंबई यांची आर्यवनौषधालयाची जाहिरात वाटली जात आहे तिच्याकडे गरजू लोकांनीं लक्ष पोंचवावें.

---

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १००८ |
| सोनें | | २४॥= |
| चांदी | | ७०॥ |
| जवस | | १४० |
| जवारी | ८० — | ८९ |
| गहूं काठे | ६॥ | १३० |
| बनशी | ७॥ | १९० |
| तेल | | ७॥- |
| सरकी | | ११= |
| तुप | | १०॥ |
| कापूस | | ९३ |

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन मानी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनी आमचीं औषधें बरकईनें हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आम्हास दिलें आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देउनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादे औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंभक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जो धातु तो शुद्ध असेल तरच शरिर निरोगी राहुन सर्व सौख्य प्राप्त होतें. तो दोषी असेल तर शरीरांत नाना प्रकारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातु शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी. गर्मी संबंधी सुरलेले विकार मुत्रसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, हात पाय मुत्रमार्ग. व नेत्र याचा दाह, क्षय, पंडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बकंठरोग, मधुमेह जुनाट परमा, मुष्ठमैथूनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचवि लागते त्यांस उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाली आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें, यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपान खर्ची सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्त्यावर मिळतील.

दर:-एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु. ११५ गो ३ रु १६५ गो. ४ रु. २७५ गो० ६ रु. ५५० गो० रु.

२ अपूर्व नेत्रांजनः–यानें वडस, साहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरें होउन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः---कोणताही नवा जुना परमा व उजन्य दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुपस्त्राव, रक्तस्त्राव, इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ १। भार बाटलीस रु. २

४ दंतबलवर्धक पूडः–दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे होतात

५ बिंचूचें विषः–औषध लावतांच उतरतें मुळीं ३ तो. ८ आणे

६ गजकर्णः–खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः–औषध घेताच कशाहि प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुनः उलटत नाहीत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषधः–आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरें झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रह तापावर गोळ्या गाठीस मलम, घात चढू नये ह्मणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ख. सो

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायनें भस्म धाक. गुटिका, आसव, तेलें, सुगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खर्ची सोबत टपाल खर्च वेगळा पडेल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिचें मन कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा कळवूं.

## अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतुन औषधाच्या अनेक जाहिराती सुरूं असुन प्रत्येक आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामुळें एकानें जो धंदा सुरूं केला त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजे त्यानें करावें आमचे जाहिरातीस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिर्ले वगैरे गावांतून तेथें वर्षांतें येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरुं होत आहेत. या जाहिरातींविषयीं किंवा तें लोकांविषयीं आम्हास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत ज्याची योग्यता ज्याचा तो स्वतंत्र आहे आम्हास ग्राहकांस सुचविणें हेंच की त्याचें कारखान आज सतत १६।२० वर्षे अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास चाले डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधीनें कल्याववी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याणकारीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उत्तरोत्तर उर्जितावस्थेंस आणण्याची खटपट करूं. आजपर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरवा, एकवार अनुभव घ्यावे खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्त्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल. नं. १

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

---

## Oriental Government Security Life Assurance Company Limited

*Established* 1874

*HEAD OFFICE* **BOMAY**

Chief Agency for C. P. Berar and Khandesh

*Head—Quarters Nagpur C. P.*

## FUNDS E[illegible] TWO CORRES AND SEVEN[illegible]

Claims [illegible]

**IMMEDIATE SETTEL[illegible]**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating heir clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amou a givensum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay n terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising hroh decease of assured lives, and endowment policies matu

*Government Officers, Professional men, Tradesman and others*,b empoying a portion of their annual income or profits in effecting llife po once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he hs had time to save much, his wife and amily may be in distress. Life Assurance is a means by which this danger is not over. Life being so uncertain, the sooner a man makes is hupmind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained pdilcation to—

M. De SOUZA.
CHIEF AEGNT
Nagpur.

N.-2


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखाण्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

## नोटीस

नोटीस तानी मर्द पुंजाजी लोकडे राहणार मोख ता० बाळापूर इजला:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत कीं तूं मजला दत्तक घेऊन आपली स्थावर जिनगी माझे ताब्यांत दिलीस त्यावरुन मी जिनगीचा मालक झालों आहें. आतां तुझा जिनगीवर कांहीं हक्क राहिला नाहीं. तूं फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहेस. तरी आतां तूं लोकांच्या नादीं लागून जिनगी गहाण व खरेदी करून दिल्यास तो व्यवहार रद्द आहे. आतां तुझा स्थावर जिनगीवर कांहीं हक्क नाहीं. ही नोटीस तारीख २७-३-१९०८ इ०

सही

गणपत वल्द पुंजाजी लोकडे

नं. क. ९७ राहणार मोख नि. खुद्द

## नोटीस

नोटीस तुकाराम वल्द महादु उन्हाळे वस्ती निंब ता० बाळापूर, सदाशीव वल्द जैराम पाटील वस्ती मोख ता० बाळापूर पोष्ट शेगांव व ध्रुपती मर्द गणपत कुणबी वस्ती मोख ता० बाळापूर यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं ध्रुपती मर्द गणपत रा० मोख इनें तारीख ९-१-०८ इ० रोजीं स्थावर मालचें खरेदीखत वरील इसमांपैकीं तुकाराम वल्द महादु यांस करून दिलें आहे. तसेंच तिनें तारीख १९-१-०८ रोजीं वरील इसमांपैकीं सदाशिव वल्द जैराम यांस ताबेगहाणखत सर्वे नंबर ८ यांतील पांचवे हिश्याचे जमीनीचें करून दिलें आहे. सदर्हु दोन्ही दस्तऐवजांतील स्थावर मालावर ध्रुपतीची कांहीं एक मालकी नाहीं. त्याचा मी मालक आहें. शिवाय ध्रुपती इनें दुसरा घरठाव केला आहे. सदर्हू जिनगी तानी मर्द पुंजाजी इचे मालकीची होती. तानीनें मजला ता० १०-४-०७ रोजीं दत्तक घेऊन सर्व स्थावर जिनगी माझे ताब्यांत दिली आहे. तरी आतां जिनगीची वहिवाट करण्यास शेतें वहाण्यास तुह्मी मजला हरकत कराल तर तुमच्यावर फौजदारी फिर्याद केली जाईल. ध्रुपतीचा शेतावर कांहींएक हक्क नसल्यामुळें तिनें करून दिलेलें गहाण खरेदी रद्द आहे. कळावें ता० २७-३-१९०८ इसवी

सही

गणपत वल्द पुंजाजी लोकडे

राहणार मोख नी. खुद्द

नं. क. ९८

## नोटीस

मेघराज बनसीधर मारवाडी दुकान शेगांव तालुके खामगांव यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं संमत १९६३ सालांत तुमची व आमची तक्षीम ठरली त्याचा ठराव असा होता कीं सरकीसंबंधानें नफा, नुकसान, व उधारी न येती बाकी उभयतां मिळून सोसावी असा ठराव उभयतांमध्यें झाला असोन यांत जेव्हांपासून तक्षीम सुरूं झाली तेव्हां या तक्षीमींत रोख पैसे तुह्मी देऊन फक्त दवड आमची या प्रमाणें ठराव होऊन व्यवहार सुरूं केला व त्या- प्रमाणें व्यवहार केल्यानंतर नफा नुकसानीचा हिशोब सालअखेर दिवाळीवर केला तेव्हां उधारी रुपये ८४२।=॥ व व्याजाची आणि सज्याची रकम १८०॥–॥ एकून रुपये १०२३ यांपैकीं निमे तुमचेकडेस व निमे आमचेकडेस असोन तुह्मी मजपासून रुपये १०२३ याजवर माझी सही करून घेतली व मजला समजावलें कीं उधारीची जी रकम येईल ती उभयतां मिळून निमे निमे वाटून घेऊं असा ठराव असोन आणि तक्षिमपैकीं शिलक सरकी राहिली होती ती ८४६। मण २। शेर याची किंमत रुपये ४६९।≈ तो माल तक्षिममध्यें उभयतां पाशीं होता, त्या तक्षीमपैकीं वह्या संमत १९६४ सालचा हिशोब करण्याचा आहे. ह्मणून बोंजराज श्रीकीसन यांचे दुकानावरून माझे परोक्ष घेऊन गेला. तेव्हां त्याजबद्दल मी काम चालवावें तर मी गरीब असल्या- मुळें तीकडेस लक्ष दिलें नाहीं. आजपर्यंत तक्षीमीच्या वह्या मजपाशीं होत्या त्या वह्यावर लिहिण्याचें काम मजकडेस सोंपविलें होतें व वरील शिल्लक सरकीची व्यवस्था विक्री वगैरेची मी केली आहे व त्याचा जमाखर्च संमत १९६४ सालचे वह्यांत काढला आहे. तो असा कीं तुमचे पासून सरकी किंवा रोख रुपये आणले तर सरकी विक्री करून लागलीच ते पैसे सायंकाळीं वहींत जमाखर्च काढून जमा नांवे करीत होतो व नफा नुकसानचा हिशोब साल अखेरीस करीत जावा असा ठराव सावकारी वहिवाट आहे. व हल्लीं तुह्मी ज्या वह्या नेल्या त्यांत जमाखर्च असा आहे कीं तुमची रक्कम जमा आली तर जमे कडेस व दिली ह्मणजे नांवे कडेस लिहिली आहे व तुमचे खानगी वह्यांत ह्मणजे तुमचे दुकानच्या वह्यांत आमचेकडून पैसे येत गेले ते तुह्मी भोजराज शिवजीराम यांचे शीर खाते नावे व जमा असा जमाखर्च तुह्मी आपले दुकानचे वह्यांत केला असेल असें आढून तुह्मी कपट करून माझे पासून वरील सही रकम रुपये १०२३ वर करून घेतली तेव्हां तुह्मी सांगितलें कीं जी उधारीची रक्कम येईल ते निमे निमे वाटून वाटून घेऊं त्याजप्रमाणें सरकीचे रुपये येतील तेही वाटून घेऊं असें बोलून मजकडून सही थुलथाप देऊन करून घेतली आणि आतां वह्याही तुह्मी वरील साहू याचे दुकानावरून माझे परोक्ष घेऊन गेला. तेव्हां मी तुह्मास जी सही करून दिली आहे ती सही मजला कबूल नाहीं कारण कीं ज्या प्रमाणें व्यवहार चालण्याचा त्या- प्रमाणें तुह्मी घडून येऊं दिला नाहीं सबब मजला वरील सही कबूल करितां येत नाहीं. सदर्हू शीर खात्याच्या वह्याचा जमाखर्च मी स्वतः लिहिला आहे आतां तुह्मी माझे परोक्ष वह्या घेऊन गेला आणि आतां शिरखात्याच्या वह्यावर तुह्मी जमाखर्च तुह्मी स्वतःच्या हातानीं किंवा तुमचे गुमास्त्याचे हातानीं जमाखर्च कराल तो मी कबूल करणार नाहीं. ही नोटीस लिहून दिली सही तारीख २८-४-१९०८ इसवी

सही (मारवाडींत)

भोजराज सीवजीराम या नावा- च्या शेगांवच्या दुकानचा मा- लक रामचंद्र भोजराज

नं. क. ९९ दस्तूर खुद्द

## नोटिसीचें उत्तर

मनराखा वल्द सदारखा रा० हिवरखेड ता० आकोट यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मजला वऱ्हाडसमाचार वर्तमान पत्रांतील अंक ८ ता. २४-२-०८ इसवीचे अंकांत नोटिसीनें कळविलें कीं मोराडी येथील शेत सर्वे नंबर ३९ व दिवाणझारी उर्फ कार्तझरी येथील शेत सर्वे नंबर ४ यांतील निमिहस्सा अशीं होन्हीं शेतें तुह्मास खरेदींतील पैशाचा भरणा तुमचे सांगण्या वरून कबुल केला परंतु तो मुळींच पावला नाहीं सबब खरेदीखत रद्द सम- जावें असें लिहून आल्यावरून तुह्मांस कळवितों कीं वरील दोन्हीं शेते सालीम मी तुह्मापासून तारीख ३०।४।०७ रोजीं खरेदी घेतलें असून खरेदींतील रकमेचा भरणा तुह्मास बारशीटाकळी येथें आगाऊ दिला त्या वेळीं आपण एकटेच नसून अर्धांक तेथील लोकही होते. त्यावरून आपण रजिष्टर कचेरींत भरणा पावल्याचें ही कबूल केलें आहे त्याच खरेदीवरून वरील शेत तुह्मी स्वतः आमचे ताब्यांत दिलें असून खरेदी घेतलें दिवसापासून त्या जपर्यंत एक वर्ष होत आलें असून आज पर्यंत भरण्यासंबंधांत कांहींच जीकीर काढ- ली नसून हल्लीं भरणा पावला नाहीं असें ह्मणतो यावरून आपले मनांत बेई- मानपणा आला असून मजला बुडवावें असें आहे जर आपणास भरणा पावला नसतां तर आपण इतके दिवस मुळींच गुपचुप बसले नसतां आणि आपण नोटि- शींत निम्मे शेत खरेदी दिलें असें लिहीतां परंतु तीं तुह्मापासून सालीम शेत खरेदी घेतलें असून त्याप्रमाणें आपण सालीम शेत विकल्याचें कबुलही केलें आहे. या वरून आपण दिलेली नोटीस कितपत खरी आहे व आपले मनांत बेईमानपणा आला आहे असें दिसत असुन तुह्मी मजला विनाकारण खोटी नोटीस देऊन नोटीसीचे खर्चांत घातल्यामुळें या नोटी- सीचा खर्च तुह्मास भरून द्यावा लागेल. कळावें, तारीख १।४।०८

सही

सयद कादर वा सयद मुनीर मुसलमान रा. बारशीटाकळी याची हातची नि. खु.

नं. क. १००

## देशी दवाखाना

### (वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर यांचा

आह्मी आमचा दवाखाना पुन्हा चालू केला आहे. शास्त्रोक्त रीतीनें औषधें तयार केलेलीं असतात. चिकीत्साहि काळजी पूर्वक होत असते हें सर्व श्रुतच आहे. गरजू लोकांनीं अनुभव घेऊन पाहावा. भस्म, मात्रा, पाक, गुटिका, वगैरे विक्रिस तयार आहेत. गरमी, उपदंश, प्रदर, धुपणी, बाळंतरोग, पंडु इत्यादि कष्टसाध्य रोग फार लवकर दूर होतात.

पत्ता— वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर गुलाबराव हरदयाल सावकार यांचे वाड्यांत दुसरे मजल्यावर.

चैत्रशुध प्रतिपदा शके १८३० आकोला

नं० ख० १

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं चंद्रभागा जवजे राधाकिसन मारवाडी राहणार पातुरनंदापुर तालुके आकोले इनें तारीख १४ माहे डिसेंबर सन १९०५ ईसवीं रोजीं रामगोपाळ कनिराम मारवाडी राहणार खारतळेगांव तालुके व जिल्हे उमरावती आणि जगन्नाथ चुन्निलाल मारवाडी राहणार वलगांव तालुके व जिल्हे उमरावती या दोघां इसमांचें नावानें कुल- मुखत्यारपत्र करून दिलें आहे व सदरहु कुलमुखत्यार पत्रांवर माझी खोटी साक्ष घातली आहे. सदरहु कुलमुखत्यार पत्र मला मुळींच माहीत नाहीं व त्याजवर मी आपली साक्षही घातली नाहीं कारितां तिनें जी माझी साक्ष घातलेली आहे त्यावरून असें खास माहीत होईल की सदरहु मुखत्यारांस कुलमुखत्यार पत्र देण्यास मी माझी परवानगी अगर संमती दिली असेल असें लोकांनीं समजून सदरहु मुख- त्यारांशीं माझे तर्फे काणताही व्यवहार करूं नये व केल्यास तो मला कबूल नाहीं- तारीख २६- ३- ०८

सही

नारायणी मर्द चंदनमल राहणार पातुरनंदापूर निशाणी हातची

नं. ख. २ बांगडी

## नोटीस

जेनाई बापानें नांव आइतवारपुरी रा० उगवे तालुका आकोले

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं नोटीस ता. २७।३।०८ रोजीं पावली त्यांतील मजकुर सर्व खोटा आहे. कारण कीं दोन वर्षांचें पूर्वी तुझी आणनेण होत होती. या दोन वर्षांत तूं आली नाहींस आह्मी पुष्कळ वेळ तुला नेण्यास आलो असतां तूं लपून राहतेस आणि तुझे अंगावर लग्नाचे वेळचे सोन्या चांदीचे डागीने होते ते पचविण्याचे तुझे मनांत आहे. तूं शहाणी होण्यास आजमासे दोन वर्षें झालीं असतील त्यांत माझे संसाराचा बिघाड करण्याची तुझी इच्छा आहे. व तुझे मावशानें तीन चार पत्र पाठविलें तीं मजजवळ आहेत. त्यांत काय मजकुर आहे तो तुजला माहीतच असेल. तुझा व माझा तंटा कधींच झाला नाहीं. आठ पंधरा दिवसांनीं चार पंच तुजला नेण्यासाठीं पाठवित आहे. त्यांच्या बरोबर तूं माझे घरीं यावे. या उपर दुसरा घरठाव करशील तर तुझेवर फौजदारी करून तुजला ताब्यांत घेईन या नोटिशीचा खर्च तुझे बापा जवळून घेतला जाईल. कळावें. ता. ३१।३।०८ ईसवी दस्तुर नायणराव रामराव,

सही

हनवंतगीर गुरु राघोगीर गोसावी

नं. ख. ३ नीशानी खुद्द

# वऱ्हाडसमाचार

**BERAR SAMACHAR**

वर्ष ४२ ] आकोला वऱ्हाडसमाचार सोमवार तारीख १३ माहे एप्रिल सन १९०८ इ० [ अंक १३


## वर्गणीचेदर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची बहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन आळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः–– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.


### जाहिरात

मुंबई व्यांकेची सेव्हिंग व्यांक
ह्या बँकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कमीत शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई व्यांक } G. A Phillips
आकोला ९।२।०९ } एजंट
नं ७३



### देशी दवाखाना
### ( वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर यांचा

आह्मी आमचा दवाखाना पुन्हा चालूं केला आहे. शास्त्रोक्त रीतीनें औषधें तयार केलेलीं असतात. चिकीत्साहि काळजी पूर्वक होत असते हें सर्व श्रुतच आहे. गरजूं लोकांनीं अनुभव घेऊन पाहावा. भस्म, मात्रा, पाक, गुटिका, वगैरे विक्रिस तयार आहेत. गरमी, उपदंश, प्रदर, धुपणी, बाळंतरोग, पंडु इत्यादि कष्टसाध्य रोग फार लवकर दूर होतात.

पत्ता— वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर आकोला येथें शहरांत मुलीचे शाळें जवळ
चैत्रशुध प्रतिपदा शके१८३० आकोला
नं० ख० १


### नोटीस

आहमदखां वा युसफखां रा० पींपळगांव राजा तालुके मलकापूर यांसः–

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं तुह्मी ता. १७-२-०८ ची नोटीस वऱ्हाडसमाचार मधून दिली ती मिळाली. नोटिशींतील मजकूर सर्व खोटा आहे. मजला जरूर पडल्यामूळें माझे मालकीचें स्थावर मालपैकीं सदर्हु खरेदी मी माझे खुशीनें व अक्कल हुशारीनें अमल पाणी निशा वगैरे न घेतां खरेदीखत फरोक्त करून दिलें व भरणा सबरजिस्टर साहेबासमोर मोजून घेतला सदर्हु खरेदीखत योग्य रीतीचें असून हा व्यवहार मुळींच लबाडीचा झाला नाहीं, व आपलें ह्मणण्याप्रमाणें सदर्हु व्यवहार आपण खोटा समजतां ही तुमची चूक आहे, असें असतां आपण तो व्यवहार कोर्टांत खोटा ठरवून माझा फायदा इच्छितां ही तुमची बंधुप्रिती होय. परंतु माझी मनोदेवता सदर्हु खऱ्या मनुष्यास फसविण्यास राजी नाहीं. तुमचे लेखावरून माझे मालकीचा राहिलेला स्थावर जंगम माल तुह्मी माझे बिन विचारतां व गैरहाजरीमध्यें कमी किंमतींत फरोक्त करणें कामा नये यावद्दल सावध रहा. इतके उपर आपलेकडून गैर वर्तन घडल्यास कायद्याप्रमाणें तजवीज केली जाईल व झालेली नुकसानी तुमचेकडून भरून घेतली जाईल. कळावें. ९-४-०८

सही
हरुणखा वल्लद युसफखा राहणार पींपळगांव राजा ता. मलकापूर
नं. ख. २३


### जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं माझा बंधु नामे अहमदखा वल्लद युसफखा हा माझी स्थावर जंगम इस्टेट विकण्याच्या इरादांत आहे तर ती इस्टेट कोणी खरेदी गहाण वगैरे घेऊं नये. जर कोणी घेईल तर तो फसेल आणि त्याची जबाबदारी माझ्या इस्टेटीवर राहणार नाहीं.

तसेंच माझ्या नांवानें कोणी खोटी बनावट सही करून माझ्या सहीची ह्मणून १- ४- ०८ तारखेची नोटीस 'वऱ्हाडसमाचार' वर्तमान पत्राच्या तारीख ६- ४- ०८ च्या १२ व्या अंकाच्या चवथे कालमांत छापिली आहे. ती बनावटी नोटीस आहे आणि तीच्या संबंधानें मी पुढें काम चालविणार असून तिच्यांतील मजकूर सर्व लबाडीचा आहे आणि तो अहमदखा वल्लद युसफखा यांच्या फायद्याचा ह्मणून कोणीतरी अनाधिकारी तोतया माणसानें छापविली आहे. तो मला कबूल नाहीं आणि तो कोणत्याहि प्रकारें मी दिलेल्या खरेदिला किंवा स्थावरजंगम इस्टेटीला बांधू शकत नाहीं. या संबंधानें मी सर्व कागदपत्र पोलीसांत दाखल करून फौजदारींत काम चालविणार आहे. कळावें ता. ९- ४- ०८

सही (उर्दुत)
हरुणखा वल्लद युसफखा राहणार पिंपळगांव राजा दस्तुर खुद्द.
नं. ख. २४ तालुके मलकापूर


### नोटीस

बेशमी शेकअमीर वल्लद नुरअमद मुसलमान नौकर कलाली दुकान ह्मातोडी हल्लीं रा० ह्मातोडी ता० जि० आकोला यांस —

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे एक रजिष्टर पाकीट मीळालें तें फोडून पाहतां त्यांत मुळींच कोणतेच प्रकारचा कागद नसतां खालीं पाकीट होतें. त्यांत तुह्मी लीहीलेला कागद ठेवण्यास विसरला असें समजतें, असो दुसरे आह्मी ता० ३०-३-०८ इसवीचे वऱ्हाडसमाचार पत्रांत नोटीस दिली असतां त्याप्रमाणें आपले कडून कांहींच व्यवस्था झाली नाहीं. वरून आह्मी तुमचे वर फौजदारी करणार आहो, परंतु तुमचे रजिष्टर आलेमुळें आह्मी तुर्त थांबून तुह्मासं कळवितों कीं आपल्यास जें कांहीं सांगणें असेल तें नोटीस पावतांच ४ दिवसांचें आंत रजिष्टर पत्र करून कळवावें खुलासा न झाल्यास तुमचेवर कायद्या प्र० फौजदारी वगैरे केली जाईल ही नोटीस दिली कळावें ता० १२-४-०८

सही
महमद बशरोद्दीन तर्फें मुखत्यार
खाजा शरफूद्दीन मक्तेदार
नं. ख. २५ आकेला वगैरे

### नोटीस

रा० रा० रामचंद्र शिवराम ऊर्फ बापुराव गणोरकार हल्लीं वस्ती अकोला यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते तुह्मास आमचे दुकानचे नांवें कोर्टाचीं कामें करण्याबद्दल कुलमुखत्यारपत्र दिलें होतें. तें तुह्मी नोकरी सोडून गेल्यामुळें आह्मी सदर्हू मुखत्यारपत्र कार्तिक शुद्ध ७ संवत १९६४ मुताबीक तारीख १२।११।०७ इ० रोजीं रद्द केलें आहे. आमचे दुकानचे कागद वगैरे तुमच्या जवळ आहेत ते आणून द्यावे व हिशेब समजून द्यावा. याप्रमाणें न केल्यास त्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. कळावें. ता० ८।४।०८ इ०

सही
नं.ख. २६ बीहारीलाल राजाराम द. खु.

### नोटीस

१ सोनी मर्द जानजी धनगर, २ मारुती वल्लद जयराम पाटील, ३ तुकाराम वल्लद यकोजी पाटील, ४ पुंडु वल्लद रोडी पाटील वस्ती नागझरी ता० खामगांव, ५ बापु वल्लद कर्णाजी कुणबी रा० जवळ बुजरूख ता० खामगांव यांस–

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते की सोना मर्द भानजी ही माझी सावत्र आई आहे. तिच्या पोटी एक मुलगा होतो तो एक महिन्यापूर्वी मयत झाला. त्याचे वाटणीस दोन वर्षांपूर्वीं दोन तीफणची जमीन दिली होती. तो मयत झाल्यामुळें सोनीला माझे घरीं रहावे असें सांगितल्यावरून १५ दिवस ती माझे घरीं होती. नंतर ती लोकाच्या चेतावणीनें माझ्या घरांतून निघून गेली व तिचा आतां दुसरा घरठाव करण्याचा विचार आहे असें समजतें. सदर्हू सोनी मर्द जानजी इचा आतां स्थावर जंगम इस्टेटीवर कांहींएक हक्क नाहीं. कायदेशीर जिनगीचा मालक मी आहे. सोनीचा कांहीं हक्क नसून ती फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहे. तरी वरील लोकांस व इतर सर्व लोकांस ह्या नोटिशीनें कळविण्यांत येत कीं तुह्मी सोनीपासून जिनगी गहाण खरेदी पत्र वगैरे करून घेतल्यास तो सर्व व्यवहार रद्द असे. याउपर तुह्मी तिच्याशीं व्यवहार करून मजला जिनगीची वहिवाट करण्यास हरकत केल्यास तुह्मावर फौजदारींत फिर्याद केली जाईल कळावें. ता० २।४।०८ इ०

सही कृष्णा वल्लद जानु काइंगे धनगर
नं. ख. २७ निशाणी खुद्द.

### नोटीस

एलिचपूर सिव्हिल स्टेशन म्युनिसिपाल कमिटीचे हद्दींत राहणार सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं ता. २९ मार्च १९०८ इसवीं रोजी सदर्हु कमीटीनें सन १९०८-०९ साला करितां भंगी पट्टी, घरपट्टी, हौदपट्टी, व पोलीस पट्टीचा ठराव केला आहे. सदहू झालेल्या ठरावाचे तक्ते म्युनिसिपल कमिटीचे ऑफीसचे वेळांत सकाळपासून संध्याकाळपर्यंत कोणाही मनुष्यास पाहण्यास मिळतील. तरी झालेल्या ठरावास जे कोणी नाराज असतील त्यांनीं आजपासून ( नोटीशीचे तारखेपासून ), ३० दिवसांचे आंत कमेटीकडे लेखी अर्ज करावे ह्मणजे त्यांच्या अर्जाचा विचार केला जाईल सदर्हू मुद्दती नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तकरार ऐकली जाणार नाहीं. कळावें ता. ३० माहे मार्च १९०८ इ.

GANESH NAGESH
व्हाइस चेअरमन
एलीचपूर सिव्हिल स्टेशनम्युनिसिपल कमिटी
नं. क. ८३. २

## वर्तमानसार

ता. ७ रोजीं नारायणगंज रेल्वेस्टेशनावर गुरखा पोलीस येऊन दाखल झाले, त्यांनीं असि. स्टेशनमास्तर बाबू आनंदचरण व कित्येक उतारू यांना ठोक दिला. त्या सर्वांनी कॅप्टनपुढें आपली फिर्याद मांडली, परंतु कप्टननें मुळींच लक्ष दिलें नाहीं.

मुंबईच्या तार मास्तरांनी आज ता. ९ रोजीं तिसरे प्रहरापासून संप केला आहे. टेलिग्राफ सुपरिन्टेन्डट ह्यांनीं, कित्येक तार मास्तर संप करून निघून गेल्यामुळें फक्त अर्जंट ताराच स्वीकारण्यांत येतील अशी लोकांस नोटीस दिली आहे. तारा एकसारख्या तुंबत आहेत.

रंगूनच्या तार आफिसांतील बऱ्याच लोकांस बडतर्फ करण्यांत आले आहे. ह्या प्रकरणाचा विचार करण्याकरितां टेलिग्राफ असोसिएश्नची विशेष सभा भरविण्यांत आली होती. लोकांना पुन्हां कामावर घेतल्यावांचून कोणीही कामावर हजर व्हावयाचें नाहीं, असा ठराव असोसिएशननें पास केला. तार मास्तरांनीं संप केला आहे.

पंढरपूरचा सँडोः— या गांवांत एक सँडो उत्पन्न झाला आहे. हल्लीं त्याचे खेळ ठिकठिकाणीं तिकीटें लावून होत आहेत. त्याचें नांव उमा गौळी होय. प्रसिद्ध राम मूर्तीच्या खालोखाल याची कसरत व अंग मेहनत असते. अशाच तऱ्हेचा एक मनुष्य मिरज येथें असल्याचें ऐकिवांत आहे.

जग हायस्कूलमधील कांहीं विद्यार्थी एके दिवशीं मैदानांत आपआपलीं पुस्तकें वाचीत बसले होते. इतक्यांत त्या रस्त्यानें डेप्युटी कमिशनर मि. हारकोर्ट यांची स्वारी आली. चवथ्या इयत्तेतील एका मुसलमान विद्यार्थ्याशिवाय बाकी सर्व विद्यार्थ्यांनीं साहेबमजकुरास सलाम केला नाहीं. सलाम करण्यास चुकलेल्या मुलांचें वर्तन साहेबांस असह्य होऊन त्यांनीं त्या मुलांचीं नांवें व पत्ता टिपून घेतला. दुसरे दिवशीं, साहेबांनीं मुलास बंगल्यावर बोलावून नेलें. झालेल्या चुकीबद्दल मुलांनीं तेथें साहेबांची सपशेल माफी मागितली. त्यावर साहेबांनीं शाळेच्या मुख्य अध्यापकास एक चिठ्ठी दिली. चिठ्ठी हातीं येतांच या अध्यापकानें शाळेंतील सर्व मुला समक्ष या विद्यार्थ्यास ११ फटके लगावले. आपलें वर्तन न सुधारिल्यास या मुलाची स्कॉलरशिप व नादारी दोनही बंद करण्यांत येतील, अशाही मुख्य अध्यापकांनीं त्यास ताकीद दिली आहे.

हरिकिशोर पत्राचे संपादक रा. भावे यांस ता. २ रोजीं डे. कामिशनर यांनीं बोलावले होते. व ‘ राष्ट्रीय स्वयंसैनिक ’ हा लेख राजद्रोहाचा आहे असे सरकारला वाटत आहे तर यापुढें असें लेख न लिहितां पत्राचें धोरण बदलावें अशा समज देण्यांत आला आहे असें समजतें.

ता० ६ रोजीं परेल येथील ग्रीव्हस कॉटन कंपनीच्या ८ गिरण्यांतील दहा हजार मजुरांनीं केलेला संप अद्याप कायम आहे. मजूर ता. ७ रोजीं सकाळीं गिरणीच्या जवळ येऊन हजर झाले व चिंतातुर मुद्रेनें गिरणीजवळ इकडे तिकडे दंगा न करतां फिरले. नंतर रस्त्याच्या बाजूला पुढें काय करावयाचें हें ठरविण्याकारितां त्यांनीं सभा भरविली व आपली गाऱ्हाणीं गिरणीच्या एजंटापुढें मांडण्यासाठीं तीनशे प्रतिनिधींचें एक डेप्युटेशन पाठवावें असें ठरलें.

ब्रिटिश चॅनेलमध्यें रात्रीच्या वेळीं जहाजांच्या हालचाली चालू असतां वरिक क्रुझर व हायगार नांवाचे डिस्ट्रायर यांची टक्कर होऊन डिस्ट्रायर बुडालें.

‘ स्वराज्य ’ पत्राचे संपादक मि. शांति नारायण यांस अलाहाबादचे कलेक्टर मि० मॅक्निर यांनीं बोलाविलें होतें. सदर पत्राच्या ता. २९ फेब्रुवारीच्या अंकांत ‘ दुष्काळा ’ वर लिहिलेला लेख राजद्रोही आहे असें सरकारास वाटत असून यापुढें सदर पत्राच्या संपादकाकडून यत्किंचितृही कायद्याचा मर्यादातिक्रम झाल्यास त्यांनवर तावडतोब खटला करण्यांत येईल असें त्यांस कळविण्यांत आलें आहे.

वऱ्हाडसमाचार

चैत्र वद्य १२ शके १८३०

## नानाचा अधिकार—योग

खुप शर्तीनें राज्य राखण्यांत यशवंत ह्मणून प्रसिद्ध असलेल्या फडणविस नानांच्या यशाचें वर्णन कोणत्याही दिवशीं प्रासंगिकच होईल; मग रा. वासुदेव शास्त्री खरे यांच्या सारख्या व्यसंगी व मर्मज्ञ इतिहासकारानें नानांच्या ‘अधिकार योगाचा इतिहास’ महाराष्ट्र वाचकांपुढें सादर केला असतां त्याची ओळख वाचकांस करून देण्याची सुसंधी साधणें सर्व प्रकोर युक्त होईल किंवा कसें या विषयीं शंका कशाली? एका प्रसिद्ध कादंबरीकारानें मराठ्यांच्या राज्याच्या कारकीर्दीच्या ज्या भागाला मध्यान्ह असें विशेषण दिलें आहे, त्या महत्वाच्या काळांत राज्याचीं सूत्रें चालविणाऱ्या व्यक्तीकडे इतिहास वाचकांचें विशेष लक्ष लागणें अगदीं सहाजिक आहे. त्यांतून पानपतचा धक्का व नारायणरावांच्या खुनासारखें गृहकलहाचें शल्य पेशवाईच्या हृदयांत अंतर्बाह्य पीडा देत असतांही, यांतून निभावून, त्या नंतरच्या कारकीर्दीस पेशवाईचा भरभराटीचा काल असें ह्मणवून घेण्याची कर्तबगारी ज्या पुरुषांच्या अंगीं दिसून आली त्याविषयीं कोणाही सहृदय मनुष्यास साश्चर्य कौतुक वाटल्यावांचून रहाणार नाहीं. मग त्याच महाराष्ट्र साम्राज्याच्या सध्यांच्या काळच्या दुर्दैवी लेकरांस आपल्यामधील अत्यंत श्रेष्ठ अशा मुत्सद्दी राजकार्य धुरंधराविषयीं सप्रेम अभिमान वाटल्यावांचून कसा रहावा! बिस्मार्कपेक्षां आमचा नाना आणि महादाजीची जोडी राजकारणांत किंवा पराक्रमांत रेसभरही कमी होती असें आह्मां मराठ्यांस तर कधींही मानतां यावयाचें नाहीं. ज्या कालांत, ज्या परिस्थितींत आणि ज्या लोकांत ही जोडी अवतरली त्याहून भिन्न अशा किंबहुना त्यापेक्षां जास्त अनुकूल अशा स्थितींत त्यांचा उदय झाला असतां तर जगाच्या इतिहासांत नाना आणि महादजीचें नांव प्रमुख रीतीनें नमूद न करण्याचें साहस इतिहासकारास करवलें नसतें. पण ईश्वरी संकल्प निराळा होता. ग्रे कवीनें ह्मटल्याप्रमाणें, कोणाच्याही दृष्टीस न पडतां कितीतरी अत्युत्तम पुष्पें अरण्यांत कोमेजून जातात अशाच केवळ नव्हे तरी याच प्रकारची स्थिति महाराष्ट्रांतील या अद्वितीय व्यक्तिद्वयींची झाली यांत शंका नाहीं. तशांतून जित समाजाच्या अंगीं कोणताही चांगला गुण कोणत्याही काळीं नव्हतां अशी समजूत पसरविण्यांत ज्यांचें हित आहे अशांच्या हातीं अशा रत्नाची पारख करण्याचें काम पडलें ह्मणजे त्यांचें नशीब पुरेतेंच ओढवलें ह्मणून समजावें! अशा स्वार्थपर एकतर्फी पारख्यांच्या हातून खरी पारख होणें जितकें दुर्घट तितकेंच त्यांच्या पारखीवर विश्वास ठेवून रहाणें अयोग्य आणि निंद्य होय. स्वदेशी रत्नाची पारख करण्याला स्वदेशी जव्हाऱ्या पाहिजे. त्यांत ही नाना फडणविसासारख्या प्रमुख महाराष्ट्रीय मुत्सयाच्या राजकारणांचें पर्यालोचन, मराठी राज्याविषयीं प्रेम, निदान सहानुभूति तरी बाळगणाऱ्यांच्या हातून जसें वठेल तसें तें परकीयांच्या हातून होणें शक्य नाहीं. मागील पिढीला मराठ्यांच्या इतिहासाच्या बाबतींत बहुतेक परक्यांच्या ओंजळीनें पाणी प्यावें लागल्यामुळें ‘शिवाजी बंडखोर होता’ ‘नाना फडणविसांना आपस्वार्थाच्या आकुंचित दृष्टीच्या डावपेंचाखेरीज इतर कांहीं अवगत नव्हतें’ अशा प्रकारचीं विधानें निमुटपणें ऐकून घ्यावीं लागत. परंतु तो परावलंबनाचा काळ जाऊन आतां मराठ्यांच्या राज्याचा खरा इतिहास अस्सल पुराव्यावरून तयार होऊं लागला आहे. स्वजातीयांविषयीं, स्वदेशाविषयीं व स्वराज्याविषयीं अभिमान बाळगणाऱ्यांच्या हातून हें जें ओजोवान व तेजस्वी वाङ्मय तयार होत आहे त्यामुळें परकीयांना आपल्या इभ्रतीची जपणूक करण्याची खबरदारी घेऊन लिहिलेलें कुत्सित विचारांनीं व वस्तुविपर्यासांनीं परिपूर्ण असें वाङ्मय अनीवात मागें पडेल व तें रास्तच होईल. प्रस्तुत आह्मी ज्या ग्रंथाची ओळख आमच्या वाचकांस करून देत आहों तो ग्रंथ वर वर्णिलेल्या प्रकारच्या स्वाभिमानयुक्त वाङ्मयामध्यें श्रेष्ठ जागा पावण्यास सर्वथा योग्य असाच आहे. याचे कर्ते रा. वासुदेव शास्त्री खरे यांनीं पूर्वीच लिहिलेलें नाना फडणीसांचें चरित्र महाराष्ट्रवाचकांच्या आदरास पात्र असें झालेलें आहे. तें पुस्तक लिहिल्यानंतरही त्याच्या कर्त्याचा एकंदर महाराष्ट्राच्या इतिहासाविषयीं व त्यांतही विशेषेंकरून नानांच्या संबंधाच्या भागाविषयीं व्यासंग अव्याहत चालू होता. आणि सध्यांचें त्यांचें पुस्तक याच अभिनंदनीय व्यासंगाचें व अनुकरणीय परिश्रमाचें फल होय. अस्सल कागदपत्र पाहून त्यांवरून इतिहासाची जुळवाजुळव करण्याच्या कामाला जी मंडळी गेल्या वीसपंचवीस वर्षांत पुढें सरसावली त्यांच्यामध्यें रा. खरे यांचें नांव त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या ऐतिहासिक लेख संग्रहावरून प्रसिद्ध असल्यामुळें त्यांचे स्वतःचे संबंधानें विशेष सांगण्याची मुळींच जरूर नाहीं. प्रस्तुतच्या पुस्तकाला त्यांनीं जी सामग्री मिळविली ती तशीच विश्वसनीय आहे. बारभाईच्या कारस्थानांत व त्यानंतर झालेल्या पेशवाईतील उलाढालींत सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांचें अंग किती होतें हें सुप्रसिद्धच आहे. या एका प्रमुख मुत्सद्याच्या व त्याच्या निकट आप्तेष्टांच्या पत्रव्यवहारावरून आणि त्या काळच्या सरकारदप्तरीं असलेल्या अस्सल कागदपत्रांवरून रा. खरे यांनीं आपलें पुस्तक तयार केलेलें असल्यामुळें त्यांतील विधानांसंबंधानें संशय घेण्यास जागा उरत नाहीं.

प्रस्तुत पुस्तकांत नानांकडे पेशवाईच्या व अर्थात एकंदर मराठी राज्याच्या चालकत्वाचे अधिकार येईपर्यंतचा इतिहास लिहिलेला आहे. या काळांपुरतें देखील हें नानांचें चरित्र नसून त्यांच्या एकंदर कारकीर्दीचा इतिहासही नाहीं. नानांचा प्रवेश पेशवाईंत कांहीं थोड्याशा अधिकाराच्या जागीं झाल्यानंतर त्यांनीं क्रमाक्रमानें आपल्या अंगच्या गुणाच्या व चातुर्याच्या बळावर चढत चढत नानांवांचून मराठी दरबारांत पान हालूं नये येथपर्यंत कशी मजल मारली हें दाखविणें कोणाही चरित्र लेखकांस मोठ्या आवडीचें काम वाटलें असतें. पण त्या कामांतील मोह किती अनिवार असतात, हें कोणतेंही एखाद्या ठळक व्यक्तीचें चरित्र घेऊन तें वरवर चाळलें तरी ध्यानांत येईल. पण रा. खरे यांना नानांच्या गुणवर्णनापेक्षां त्यांच्या अधिकार योग कालाचा इतिहास लिहावयाचा असल्यामुळें त्यांनीं तो दोष मोठ्या अभिनंदनीय रीतीनें टाळला आहे. या पुस्तकांत थोरले माधवराव साहेबांच्या कारकीर्दीच्या सुरवातीपासून तो वडगांवच्या लढाईनंतर पेशवाईतील [illegible] मोडून नानांचे हातीं सर्व सत्ता येईपर्यंतचा ह्मणजे सुमारें अठरा वर्षांतील घडामोडींचा इतिहास आहे. हा काल ह्मणजे पेशवाईतील राघोबादादांनीं उपस्थित केलेल्या भाऊबंदकीचा काल होय. बाळाजी बाजीराव यांनीं पानपतच्या अपयशानें हैपत खावून पर्वतीवर देह ठेवल्यापासूनच या भाऊबंदकीला सुरवात झाली. राघोबादादांनीं माधवरावाकडे शिरस्त्याप्रमाणें जात असलेल्या पेशवेपदाचा लोभ धरून उपद्व्याप सुरू केले. या कामांत त्यांचे पहिले मदतगार सखाराम बापू हे होत. बापू मोठे धोरणी व कर्तृत्ववान् मुत्सद्दी पण परशुरामभाऊ यांनीं ह्मटल्याप्रमाणें ‘ खेळत जात,’ त्यामुळें शेवटीं कोणत्याही बाजूनें त्यांनीं यश मिळविलें नाहीं. राघोबा दादांच्या राज्यलोभामुळें माधवराव साहेबांना वारंवार त्रास सोसावा लागला; पण खुद्द रावसाहेब स्वतः खंबीर बुद्धीचे व कर्तृत्ववान् असल्यामुळें राघोबांची डाळ त्यांच्या कारकीर्दींत शिजली नाहीं. या उभयतां चुलत्या पुतण्यांच्या भांडणांतच नानांची फडणिशीच्या जागेवर स्थापना झाली. फडणिशीचें पद पूर्वीपासून भानूच्या घराण्याकडे होतेंच. पण राघोबांच्या राज्यतृष्णेला नानांचे चुलते बाबूराव अनुकूल न झाल्यामुळें माधवराव साहेबांच्या अज्ञानपणांत त्यांना आपल्या पदाला मुकावें लागलें. रावसाहेब सज्ञान होऊन स्वतःच्या मुखत्यारीनें कामकाज पाहूं लागल्यापासून तों त्यांच्या अंतापर्यंत राघोबांना हातपाय हालवितां आले नाहींत. पण माधवरावांना आपल्या पश्चात काय होणार तें कळून

चुकलेंच होतें. 'छंदिष्ट' नारायणरावांच्या हातून पेशवाई निभणें नाहीं ही त्यांची खात्री होती. राघोबांची बकध्यानमूर्ती नारायणाला पेशवे पद पचूं द्यावयाची नाहीं एवंच 'नारायणरावांच्या नशींबीं राज्य नाहीं' हें भाकित त्यांनीं पूर्वींच करून ठेवलें होतें. नारायणरावांच्या कारकीर्दींत नाना किंवा इतर कोणी पोक्त मुत्सद्दी यांचें वजन पेशव्यांजवळ नव्हतें. ते बहुधा उदासीन असत. अशा स्थितींत राघोबासारख्या लोभी मनुष्याच्या व आनंदी बाईसारख्या कृत्याध्या कारस्थानांस चांगलेंच फावलें यांत आश्चर्य कसचें. असला दुधखुळा पेशवा राज्यावर असण्यापेक्षां राघोदासारखा केलेला सवरलेला मनुष्य राज्यावर असणें जास्त इष्ट होतें. पण आनंदी बाईची मसलत फारच विकोपास गेली आणि तसें झाल्यामुळें राघोबाविषयींची आदरबुद्धी दरबारांतील मुत्सद्यांच्या मनांतून पुरती नाहींशी होऊन बारा भाई बाजीरावच्या वंशाखेरीज इतरांस मानावयाचें नाहीं अशा आणाभाका झाल्या. राघोबांना आपली भाऊबंदकी उपस्थित करण्यांत मदतगार झालेला सखारामबापू राघोबाच्याच विरुद्ध झालेल्या या नवीन कूटाचे अग्रणी कसे बनले हें मोठें गूढ आहे. किंबहुना सखाराम बापूंची सर्वच कारकिर्द एक मोठें गूढ होतें. आणि तें गूढ पुरतें उकलून हा सुर्य व हा जयद्रथ असें प्रत्यक्ष प्रमाण जेव्हां हजर करतां आलें तेव्हां सखारामबापूंच्या सद्दीचा जोर सरला आणि तेव्हां पासून नाना पेशवाईचे मुख्य कारभारी झाले. पण त्याला अद्याप सात वर्षें अवकाश होता. गर्भस्थ सवाईमाधवरावासाठीं 'बारभाईचें कारस्थान सूरू झाल्यापासून तें सेनापति बापू व नाना वरिष्ठ व कनिष्ठ अशा नात्यानें पण सहकारित्वाच्या तत्वांवर राज्य कारभार चालवित असत. नानांच्या एकनिष्ठतेच्या व मुत्सद्दीगिरीच्या कसोटीची हीच वेळ होती. या सात वर्षांत राघोबांनीं जे जे खेळ केले त्यांमुळें शेवटीं मराठी राज्याचें उन्मूलन करण्यासाठीं मराठी दरबारच्या राजकारणांत इंग्लिश कंपनीचा प्रवेश झाला ही सर्वांत जास्त महत्वाची अशी घातक गोष्ट झाली पण तिचा प्रतिकार करणें नानांच्या आणि त्यांच्याच सारख्या पेशवेपदाच्या एकनिष्ट सेवकांच्या आंवाक्याबाहेरचें होतें, असेंच त्या काळच्या ह्या घडामोडींचें बारकाईनें निरीक्षण करणारांस वाटेल. स्वतःच्या स्वार्थाकरितां परक्याचें पाऊल आपल्या घरांत आपल्या हातांनीं शिरूं देण्याचा राघोबाचा अपराध तर अगदींच अक्षम्य, पण असें होत आहे हें दिसत असून वेळीं अवेळीं थोडक्याशा लाभाकरितां बारभाईच्या कारस्थानांत केव्हां ढिलेपणानें तर केव्हां बेमुर्वतपणानें वागून अपयशाचे वाटेकरी होणाऱ्या शिंदेहोळकरांकडे दोषाचें मान अगदींच कमी येतें असें ह्मणवत नाहीं. मोरोबादादा तर बोलून चालून पेशवाईच्या चिरस्थाइत्वावर निखारे पसरण्यास तयार झालेला अर्ध्या हाळकुंडानें पिंवळा होणारा खुळचट मनुष्य! पण महादजीबावा शिंदे आणि तुकोजी होळकर हाडाचे खरे एकनिष्ट असूनही अशा आणीबाणीच्या प्रसंगीं त्यांचा शिरगडाविषयींची किंवा सैन्याच्या खर्चाच्या रकमेविषयींची हांव त्यांना दाबून ठेवतां आली नाहीं हें महाराष्ट्राचें केवळ दुर्दैव होय. राघोबा मध्यहिंदुस्थानांत पळत असतां त्याला धरून ठेवण्याचें काम शिंद्यांच्या किंवा होळकरांच्या हातून होऊं नये अशांतला भाग नव्हता! पण अदूरदृष्टी जगांत कैक मोठाल्या कार्यांचा विध्वंस करीत आली आहे! भावितव्यापुढें कोणी जाऊं शकत नाहीं. अखेर राघोबा सुरतकर इंग्रजांच्या जाळ्यांत सांपडले. शत्रूच्या गोटांत स्वकीय घरभेद्या आणि अडाणतट्टू सहायकर्त्यांशीं जोड, अशा स्थितींत आंणखी 'खेळकर' आधारस्तंभांशीं गांठ! असला सुयोग कोणत्या राष्ट्राला अधःपाताला नेल्यावांचून राहील! पण अशाही अडचणींतून मराठेशाहीनें डोकें वर काढलें आणि तें केवळ नानांच्या आणि पटवर्धनादिक एकनिष्ट स्वामीसेवकांच्या कर्तबगारीमुळें! चोहींकडून दर्या तुफान झालेला, क्षणोक्षणीं पाण्यांत अदृश्य असलेल्या खडकांची भीति, नावाडी मंडळींपैकीं विश्वास कोणावर टाकावा याचा निश्चय करवणें कठीण अशा सर्वतोपरी प्रतिकूल परिस्थिति असतांनाही अखेर नौका इच्छित नव्हे तर प्रसंगाचा विचार करतां सुरक्षित अशा कडेला नेऊन लावणाऱ्या सुकाणूवाल्याची तारीफ कोण करणार नाहीं. वर वर्णन केलेल्या अडचणींतून निभावून अखेर मराठे शाहीचें तारूं नानांनीं कसें सुरक्षित जागीं नेऊन लावलें हें पहावयाचें असल्यास रा० खरे यांचें 'अधिकार योग' हें पुस्तक फार उपयुक्त होईल या विषयीं आह्माला बिलकूल शंका नाहीं.

---

## सर हे. कॅं. बॅनरमन व मि. आस्क्विथ.

गेल्या आठवड्यांत घडून आलेली एकंदर ब्रिटिश साम्राज्यासंबंधाची महत्वाची गोष्ट मुख्य प्रधान सर हेन्री कॅंबेल बॅनरमन यांचा राजीनामा व त्यांच्या जागीं मि. आस्क्विथ यांची नेमणूक ही होय. सध्यां जें प्रधान मंडळ अधिकारारूढ आहे त्यांतील निरनिराळ्या प्रकृतींच्या व्यक्तींना एकत्र करून लिबरल पक्षाच्या ठरलेल्या धोरणास अनुसरून काम करण्याची जबाबदारी सर हेन्री यांच्या अंगावर असतां त्यांनीं ती कशी यशस्वी तऱ्हेनें निभावून नेली हें सर्वविश्रुतच आहे. मि. ग्लाडस्टन यांच्यामागें लिबरल पक्ष नामशेष होणार अशी कल्पना उत्पन्न झालेली असतांही प्रतिकूल परिस्थितींतून डोकें वर काढून दोन वर्षें पर्यंत लिबरल पक्षानें आपल्या हातीं साम्राज्याचीं सूत्रें ठेविलीं आहेत. सर हेन्री कॅंबेल बॅनरमन यांच्या वार्धक्यामुळें लिबरल पक्षाच्या व एकंदर साम्राज्याच्या सेवेस ते अंतरले आहेत, पण त्यांचें उदाहरण ज्या ज्या देशांत भिन्नभिन्न पक्ष अस्तित्वांत असून आपल्या दृष्टीनें सर्व कांहीं व्हावें अशी इच्छा बाळगणारे लोक ज्या मागसलेल्या देशांत निर्माण झाले आहेत, त्या देशांत अनुकरणीय होण्यासारखें आहे या विषयीं शंका नाहीं. सर हेन्री यांच्या कारकीर्दींत हिंदुस्थानची स्थिति कशी राहिली याचा आढावा काढला तर तो समाधानकारक नाहीं. बंगालच्या विभागणीचा प्रश्न प्रधान मंडळाच्या रचनेच्या वेळीं लिबरल पक्षाला मोठा अडचणीचा पण महत्वाचा होऊन बसला होता; पण त्याची जी धरसोडीची विल्हेवाट लावण्यांत आली ती हिंदुस्थानांतील लोकांना लिबरल पक्षावरील विश्वास दृढ करण्यास कारण झाली नाहीं. कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षानें केलेली फाळणी आणि तत्पूर्वींच्या अनेक इतर गोष्टी आपल्या पक्षाचें घोडें पुढें ढकलण्यासाठीं सर हेन्री यांनीं हातीं धरल्या. पण या साधनांनीं ब्रिटिश साम्राज्यांत अस्वस्थता व घोंटाळा उत्पन्न केल्याचा आरोप प्रतिपक्षावर लादल्यावर त्यांच्या दुरुस्तीचा योग्य तो मार्ग सर हेन्री यांच्या कारकीर्दींत स्वीकारण्यांत आला नाहीं. सर हेन्री यांच्या मागून लिबरल पक्षाचें व सध्यांच्या प्रधान मंडळाचें धुरीणत्व मि० आस्क्विथ यांचेकडे आलेलें आहे. सर हेनरी यांच्यापुढें असलेल्या अडचणी यांच्याही पुढें आहेतच, पण त्यांतून पार पडण्याची सर हेन्री यांची हातोटी यांना साध्य होईल असें मानावयास आतांपर्यंतच्या अनुभवावरून जागा नाहीं. हिंदुस्थानच्या बाबतींत यापूर्वीं मि. आस्क्विथ यांनीं तोंड उघडलेलें नसल्यामुळें त्यांचे हिंदुस्थानासंबंधाचे विचार कसे काय आहेत हें समजण्यास मार्ग नाहीं. तथापि परिस्थितीचा विचार करतां असें ह्मणतां येईल कीं या नव्या प्रधानांना आपली सहाय्यकारी मंडळी एका ठेंगण्याच्या खटपटींत बरेंचसें लक्ष द्यावें लागणार असल्यामुळें व त्यांच्या कारकिर्दींत त्यांच्या हातून लिबरल तत्वांचा प्रवेश हिंदुस्थानाच्या राज्यकारभारांत ठळक रीतीनें होण्याची आशा नाहीं.

---

## कपाशीच्या विणकरीचा धंदा

मुंबईतील गिरणीवाल्यांचे वार्षिक सभेचे वेळीं ना० विठ्ठलदास ठाकरसी यांनीं केलेलें भाषण हिंदुस्थानच्या सर्व भागांतील कपाशीच्या विणकरीचा उद्योग करणाऱ्यांनीं वाचून मनन करण्यासारखें आहे. पलीकडल्या वर्षीं हिंदुस्थानांतील गिरण्यांची जशी भरभराट झाली तशी ती गतवर्षीं झाली नाहीं. चीनच्या बाजारची हिंदुस्थानी कापडाची व सुताची मागणी अनुक्रमें शे० २० व ३१ या प्रमाणें कमी झाली. चीनच्या बाजारांत जपाननें आपलें घोडें पुढें सरकावल्यामुळें हिंदुस्थानी मालाला कोणी पुसत नाहीं असा लोकांचा साधारण समज होता; परंतु तो खरा नव्हे असें दिसतें. कारण गतवर्षीं एकट्या हिंदुस्थानाचीच चीनच्या बाजारांत कमी विक्री झालेली नसून त्याचेंबरोबरच जपान व इंग्लंड यांचीही तीच स्थिति झालेली आहे; ही गोष्ट ना० विठ्ठलदास यांनीं दाखवून दिली. हिंदुस्थानाला जपान जबर प्रतिस्पर्धी आहे. यांत शंका नाहीं, पण त्या पेक्षांही खुद्द चीनमधील जागृतीमुळें हिंदुस्थानचें गतवर्षीं नुकसान झालेलें आहे. स्वतः लोकांमध्यें चळवळ सुरू झालेली असून विणकामाच्या बाबतींत चीननें वर डोकें काढावें ह्मणून त्यांचे जारीनें प्रयत्न चालू आहेत; तशांत आणखी चीन सरकारची व्यापाऱ्यांस व कारखानेवाल्यांस मोठी मदत होत आहे यामुळें, त्यांच्या खटपटीला दुजोरा मिळाला आहे. सध्यां चीनमध्यें २८ गिरण्या असून त्यांतून तयार झालेल्या मालाचें प्रमाण हिंदुस्थानांतून तिकडे गतवर्षीं गेलेल्या मालाच्या बरोबरीनें होतें. चीनमध्यें पिकणारा कापूस आंखुड धाग्याचा पण रंगानें हिंदी कापसापेक्षां जास्त शुभ्र असतां चीन सरकारनें हिंदुस्थानांतल्याप्रमाणें कारखान्यांच्या व गिरण्यांच्या कामाचें नियमन करणारे कायदेकानू केलेले नाहींत. अशी स्थिति असल्यामुळें दिवसेंदिवस चीनच्या बाजारांत हिंदुस्थानी मालाची डाळ शिजणें अवघड होत जात आहे. आजपर्यंत हिंदुस्थनांत तयार होणाऱ्या भरड सुताचा व तशाच प्रकारच्या कापडाचा खप स्वदेशापेक्षां चीनमध्यें जास्त होत असे. चीनच्या गिऱ्हाइकीच्या भरंवशावर हिंदुस्थानांतील बऱ्याच गिरणीवाल्यांना तलम सूत देणाऱ्या कपाशीची जरूर भासत नसे. पण या त्यांच्या आलस्याच्या निद्रेंतून त्यांना जागें करण्याचें पुण्य चीननें संपादलें हें एका अर्थी बरेंच झालें ह्मणावयाचें. देशी मालाला स्वदेशांत व परदेशांत गिऱ्हाईक शोधून काढण्याचे प्रयत्न अव्याहत चालू आहेत ही संतोषाचीच गोष्ट आहे. चीनच्या भरंवशावर नुसते भरड सूत काढण्याकडील गिरणीवाल्याची प्रवृत्ति कमी होऊन कापड विणण्याच्या मार्गाचा अवलंब करण्याची सद्बुद्धि मुंबईतील बहुतेक गिरणीवाल्यांना होऊं लागली. सुदैवानें व स्वदेशी चळवळीच्या अनुकूलतेनें देशी गिरण्यांत तयार झालेल्या मालाला स्वदेशांत गिऱ्हाइकाची वाण नाहीं. रंगीत सूत व कपडा काढण्याचेंही प्रयत्न प्रगमनशील रीतीनें चालू आहेत, हें सर्व सुचिन्हच आहे. पण देशी गिरणीवाल्यांचें कर्तव्य येथेंच संपत नाहीं. भरड सुताला परदेशीं गिऱ्हाईक शोधून त्यांच्या माथीं आपला माल मारण्यांत मिळकत जास्त असेल. पण त्यांनीं नुसत्या मिळकतीकडे पहाण्यापेक्षां स्वदेशी गिऱ्हाईकांच्या गरजा भागविण्याची तरतूद केली पाहिजे. गतवर्षींच्या प्रतिकूल परिस्थितींत गिरणीवाल्यांना बराच चट्टा बसला. कपाशीच्या लागवडीखालीं असलेल्या क्षेत्राचें मान एकदम कमी झाल्यामुळें कपाशीचा भाव चढला पण परकीयांशीं टक्कर देण्यासाठीं हिंदी व्यापाऱ्यांना त्यांच्या बरोबरीनें आपले दर ठेवावे लागल्यामुळें हें नुकसान आलें आहे. पर्जन्यावर अवलंबून रहाणाऱ्या या व्यवहारांत धोक्याचा भाग किती आहे तें कोणास सांगावयास पाहिजे असें नाहीं. पण या परावलंबी मार्गावर देशाची बरीचशी औद्योगिक व सांपत्तिक अभिवृद्धि अवलंबून असल्यामुळें त्यांतील अडचणी शक्य तितक्या दूर करणें सत्ताधीशांचें कर्तव्य नाहीं असें कोणास ह्मणतां येईल! अनियमीत पर्जन्य वृष्टीमुळें होणाऱ्या नुकसानीची भरपाई करण्यासाठीं देशांत पाटबंधाऱ्यांची व्यवस्था करून ठेवणें सध्यांच्या शांततेच्या काळांत तरी सरकारचें आद्य कर्तव्य असलें पाहिजे. पण जुलमाच्या रामरामाच्या सरकारी धोरणापुढें आतां लोकांनीं हात टेंकण्याची वेळ येत चालली आहे. इजिप्तमध्यें करून पाहिलेले इजिपशियन कपाशीच्या लागवडीचे प्रयोग

यशस्वी झाले ही आनंदाची गोष्ट खरी. पण त्या आनंदाच्या मागोमाग तिसरेंच एक विघ्न उपस्थित होऊं पहात आहे. सिंधमधील शेतकऱ्यांना कपाशीची लागवड शास्त्रोक्त रीतीनें करतां येत नसल्यामुळें आणि त्यांच्या हातून कपाशीवरील कीड मारण्याचीं वगैरे कामें पाहिजेत तशीं होत नसल्यामुळें त्यांच्या जागीं शिकले सवरलेले युरोपियन शेतकरी आणून सिंधच्या आयत्या तयार कुरणांत सोडण्याचा बूट निघाला. देशी शेतकऱ्यांना हातीं नरोटी देऊन देशोधडीस लावणाऱ्या या कृतीचा ना० विठ्ठलदास ठाकरसी यांनीं निषेध केला आणि सिंधमधील शेतकऱ्यांनाच आवश्यक तें शिक्षण देण्याची तजवीज करण्याची सूचना केली. युरोपियन शेतकऱ्यांच्या मागून युरोपियन गिरणीवाले आणि त्यांच्या मागून युरोपियन व्यापारी असें हें शेपूट वाढत जाऊन सिंधमधील सुलभ कपाशीच्या देशी धंद्याच्या गळ्या भोंवतीं पक्का फांस वसविणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. या पुढच्या गोष्टी न कळण्या इतके खुळे आतां कोणी हिंदुस्थानांत राहिले नाहींत हें पक्कें कळलें असून सरकार असल्या वाममार्गाचा स्वीकार करण्यास वाढुंदे तयार होईल तर तें केवळ त्यांच्या विवेकभ्रष्टतेचें स्पष्ट चिन्हें होईल.

## शिष्टागमन
### ( रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांचे भावी आगमन )

रा० रा० बाळ गंगाधर टिळक यांच्या आगमनाचा सुयोग लवकरच येणार आहे हें कळविण्यास आनंद वाटतो. हे मुंबईच्या प्रांतिक परिषदेच्या निमित्तानें धुळ्यास येणार आहेत आणि ती सभा आटोपल्यानंतर त्यांनीं आकोल्यास येण्याचें कबूल केलें आहे. लोकांच्या आग्रहाला व विनंतीला त्यांनीं मान दिला ही गोष्ट त्यांच्या विनयशील स्वभावाला चांगली शोभते. इंडियाच्या राजकीय धर्माचे हे एक प्रवर्तक आहेत. आणि त्यांचे विचार साम्राज्य बहुजन समाजास इतके मनापासून आवडतें कीं त्यांचें नांव राष्ट्रीय संतमालेंत अग्रस्थानीं आहे. त्यांचा नांव निर्देश सभांतून कर्णपथीं आल्या बरोबर सर्वजण आनंदानें व जयघोषानें त्यांचे संकीर्तन करतात. असे हे लोकमान्य गृहस्थ चालू महिन्याच्या तिसावे तारखेला आकोल्यास येतील आणि ता० ३० एप्रिल व ता. १ मे या दिवशीं सायंकाळीं यांचीं जाहिर व्याख्यानें होणार आहेत. अर्थात या व्याख्यानांचा मुख्य विषय प्रस्तुतच्या राजकीय चळवळीला उद्देशूनच घेण्यांत येईल. हीं व्याख्यानें मराठींत होणार असल्या कारणानें सर्वांस त्यांचा फायदा घेतां येण्यासारखा आहे तेव्हां अशा या सुप्रसंगाला पुष्कळ मंडळी हजर राहतील आणि राजश्री टिळक यांच्या बहुश्रमाचें सार्थक होईल अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे.

## व्याख्यानाचा लाभ.

रा० रा० निळकंठ पांडुरंग पाटणकर बी. ए. एलएल. बी. वकील नाशिक यांनीं काल रोजीं सायंकाळीं आकोलेकरांस आपल्या संभाषणाचा लाभ करून दिला. हे गृहस्थ मुद्दाम नाशकाहून येथें आले आणि त्यांनीं आपले प्रस्तुतच्या राजकीय चळवळी संबंधाचे विचार लोकांस सुबोध रीतीनें कळविले. हे गृहस्थ आचार विचारानें नेमस्त—जहाल आहेत आणि हे नुसते बोलण्यापेक्षां आपल्या स्वीकृत गोष्टींना क्रियेचें रूपांतर देण्याच्या खटपटींत मनोभावानें झटत असतात. हे गृहस्थ विद्वान व बाणीदार आहेत. न्यु इंग्लिश स्कूलच्या प्रारंभीं जीं कांहीं शेलकीं विद्वत् रत्नें बाहेर पडलीं त्यापैकीं हे शंकर शेटचे स्कालर असून पुढेंही आपल्या विद्वज्जनानें चांगले नांवालौकीकास चढले आहेत. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर, आपटे, तसेंच राजश्री टिळक यांच्या पहिल्या पाणीदार विचारांच्या मुशींतून निघालेले असे हे त्यांचे शिष्य आहेत. नाशिककडच्या भागाला हे सरकार व लोकपक्ष या दोघांनाही इष्ट दिशेनें घेऊन चालणारे आहेत. यांच्या आगमनानें येथील सात्विक व्याख्यानमालेला बराच जोर आला. त्यांच्या या परिश्रमाबद्दल आह्मी त्यांचे पुनः आभार मानून अशा सन्मीत्राची भेट पुनः पुनः कार्य प्रसंगानें होवो असें आह्मी मनापासून इच्छितों.

## नवें धोरण.
### ( आननरी माजिस्ट्रेटांची योजना. )

राजश्री मोर्ले यांनीं हल्लींच्या राजकीय स्थितीविषयीं बोलतांना असा अभिप्राय दिला होता कीं जी नेमस्त विचाराची मंडळी सरकारला पसंत पडतील ती सरकारनें आपल्या पक्षाकडे वळवून घ्यावी ह्मणजे यांच्या द्वारानें बहुजन समाजावर सरकारचें वजन चांगलें कायम राहून जहाल पक्षाची मंडळी एकलकोंड्याप्रमाणें अलग करून टाकण्यांत येतील. ही राजकृपा आमच्या प्रांतीं ऑनररी म्याजिस्ट्रेट नेमण्याकडे सध्यां बोट दाखवीत आहे, आणि ह्मणूनच ऑनररी म्याजिस्ट्रेट नेमण्याचा क्रम विशेष जोरांत आहे. या नवीन योजनेनें सरकारचें काम बिनखर्चानें होतें अशांतलाच पर्याय नसून प्रत्येक तालुक्यांतील चार सुखवस्तु मर्जीतल्या गृहस्थांची संभावना करण्याची सरकारला चांगली संधी मिळते. आणि आमच्यांतील राजमान्य मंडळींना आपल्या झालेल्या गौरवाबद्दल सरकारचे उपकार फेडण्याला व तसेंच या सार्वजनिक कार्याच्या रूपानें लोकसेवा करण्याला अमूल्य संधी मिळते. बाळापूर, आकोला व आणखी कांहीं तालुके या सन्मानाला सत्पात्र आहेत आणि त्यांच्या त्या योग्यतेचें पारितोषक ह्मणून लवकरच कांहीं प्रमुख शिष्ट शिष्ट गृहस्थ वेगळे काढण्यांत येतील अशी आह्मास उमेद आहे. ज्यांना या निवडानिवडींत अग्रमान मिळण्याचा पुष्कळता संभव असेल त्यांनीं प्रस्तुतचें राजकीय वातावरण पाहून आपला दिशा सुधारावी किंबहुना या मंडळींना त्यांचे मार्ग इतके चांगले माहित असतात कीं आह्मांकडून त्यास निराळी सूचना मिळण्याचें प्रयोजनच नाहीं.

# वऱ्हाडवृत्त.

हवामान— गेल्या सात दिवसांत सात प्रकारचें हवामान नजरेस आलें, प्रखर ऊन, मनस्वी उकाडा, सोसाट्याचा वारा आणि मधून मधून पाऊस यांचें एक चक्रच चालू होतें. प्लेग फार करून नाहीं पण इतर रोगराई बरीच आहे.

तेल्हाऱ्यास चार ऑनररी म्याजिस्ट्रेटांचें एक बेंच स्थापित करण्यांत आलें आहे. या बेंचाला तिसरे वर्ग म्याजिस्ट्रेटचे अधिकार राहून त्यांचेकडे अकोट तालुक्यांतील फौजदारी काम देण्यांत येईल. ज्या चार सद्गृहस्थांची नांवें प्रसिद्ध झालीं आहेत. त्या रा० रा० हरकचंद गुलाबचंद साहू तेल्हारा

श्रीकृष्ण अमृत देशपांडे अडगांव

नारायण रघुनाथ तागडे तेल्हारा

मीर अनवर अली इनामदार पंचगव्हाण

यांचें आह्मी मनापासून अभिनंदन करितों आणि त्यांच्या हातून सन्मानाचें सार्वजनिक कार्य चांगल्या रीतीनें सिद्धीस जाईल असा आह्मांस भरवसा आहे.

इलिचपूर तालुक्यासाठींही तिसरे वर्ग म्या० चें खालील पांच जणांचें बेंच नेमण्यांत आलें आहे—

रा० रा० विठल नारायण पांगरकर

नारायण अन्याजी

गणेश गोपाळ देशमुख

तुकाराम जानोजी देशमुख

मीर हसन अली मीर अहमद अली

एलिचपूर तालुक्यांतील तिसरे वर्ग म्या० चे खटले या बेंचापुढें चालतील. या अधिकार दानानें ज्या गृहस्थांचा सरकारांतून असा गौरव झाला आहे, त्यांच्या हातून उत्तरोत्तर चांगली लोकसेवा होईल असें आह्मी आश्वासन देतों.

रा० रा० कृष्णाजी मल्हार पैठणकर डेपुटी इनस्पेक्टर बुलढाणा हे लवकरच पेन्शन घेणार असून त्यांच्या जागीं रा० रा० जोगदंड बी. ए. यांची नेमणूक होणार असल्याचें कळतें.

रा० रा० दत्तात्रय त्रिंबक भावे बी. ए. यांस विद्याखात्याचे डायेरेक्टरचे आसि० सुपरिन्टेंडंटचे जागीं कायम करण्यांत आलें. आणि त्यांचा पगार १२५ पासून सालानुसाल ५ रुपये प्रमाणें १५० रुपये पर्यंत वाढत जाईल हें कळविण्यास आनंद वाटतो.

रा. रा. सैफुद्दीनखां लालखां सबडिव्हीजनल म्यॅजिस्ट्रेट उमरावती यांस तीन महीन्याची हक्काची रजा देण्यांत आली असून त्यांच्या जागीं बळवंत गंगाधर यांस नेमण्यांत आलें.

रा. रा. दोराबजी पदलजी संजाना तहशिलदार दारव्हा यास तीन महिन्याची हक्काची रजा देण्यांत आली असून त्यांच्या जागीं रा. रा. अबदुल रहेमान डे. क्लार्क यवतमाळ यास नेमण्यांत आलें.

रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. पेनशनर एजुकेशनल इन्स्पेक्टर वऱ्हाड यांस अलहाबाद युनिव्हरसिटीचे फेलो नेमण्यांत आलें आहे. ही नेमणुक फार चांगली झाली. यांचा सर्व काल केवल विद्याव्यासंगांत जातो! आणि हे युनिव्हरसिटीत फेलो झाल्यामुळें यांच्या विद्वत्तेला, अनुभवाला व योजनाशक्तीला एक निराळें क्षेत्र मिळाल्या सारखें असून त्यापासून लोकांचा फायदा मोठा होईल. हल्लीं यांचे परिपक्व व परिणत विचार युनिव्हरसिटीच्या कार्यक्रमांत राज्य करूं लागले ह्मणजे त्यांची गोड फळें आपणांस लवकरच दृष्टीस पडतील. या नेमणुकीसंबंधानें त्यांचें अभिनंदन करण्यापेक्षां आह्मी आमच्या प्रांतांचेंच अभिनंदन करितों आणि सध्यां ते लोणावळ्याच्या शीतल, रम्य व सुखकर हवेंत उन्हाळ्यानिमित्त गेले आहेत तर तेथें त्यांच्या प्रकृतीला विशेष उत्साह व शक्ती येवो असें आह्मी मना पासून इच्छितों.

## माहारांची शाळा

चार अक्षरें निदान लिहितां वाचतां यावींत अशा हेतूनें आमच्या येथील कांहीं सद्गृहस्थांनीं एक माहारांची शाळ गेल्या पाडव्या पासून सुरू केली आहे. या शाळेचा दुसरा एक उद्देश असा आहे कीं महार मंडळीस मद्यपानापासून दूर करून त्यांचें तें व्यसन तोडून टाकावें. मद्यपानामुळें लोक इतके नागावले जात आहेत कीं अबकारीचें उत्पन्न ह्मणजे सरकारला एक सोन्याची खाणच लागली आहे. हें उत्पन्न झाडून टाकणें ह्मणजे लोकांच्या तोंडची भाकर त्यांच्याच तोंडांत पडूं देणें होय.

## हिंदु मुसलमान

आमच्या येथें ही दोन्ही मंडळी अगदीं एक दिलानें वागतात, आणि सार्वजनिक उत्सवांत परस्पर मनोभावानें मिसळत असतात. गुरुवारीं येथील काळ्या मारुतीच्या पटांगणांत उरुसाचा महोत्सव झाला तेव्हां हिंदु लोक मुद्दाम तेथें जमले होते आणि या धार्मिक व्यवहारांच्या द्वारामधूनही नवीन एकी बनत जाऊन अंतःकरणें बहुविध प्रकारांनीं एकवटत आहे ही संतोषाची गोष्ट होय. आतांशा धर्म विषयक मेळ्यांतून देखील आमच्या राजकीय प्रगतीच्या गोष्टी चालता हे भावी कल्याणाचें पूर्व चिन्ह होय. जी एकीची गोष्ट आकोल्यास दृष्टीस पडते ती प्राधान्यें करून सर्वत्र प्रचलित झाली पाहिजे आणि प्रस्तुतच्या गोष्टीचा ओघही तसाच दिसतो.

पुरवणी—आजच्या अंकासोबत पालीवाल आणि कंपनी यांच्या तांबूलरंजनाच्या जाहीर कार्डा वाटल्या जात आहेत. त्या वाचकांच्या ध्यानांत येतीलच.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १००५ |
| सोनें | | २४॥= |
| चांदी | | ७०॥ |
| जवस | | १३ |
| जवारी | ८० — | ८ |
| गहूं काठे | ६॥ | १४० |
| बनशी | ८ | १६० |
| तेल | | ७॥= |
| सरकी | | ११। |
| तुप | | १०॥ |
| कापूस | | १२ |

## जाहिर नोटीस

सर्व शेट सावकार इतर लोक यांस जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, अज्यानी मर्द शिवराम वडतकार वस्ती उमरी ममदाबाद ता० दर्यापूर ही आमची साक्षांत चुलती आहे. तिचे जवळ असलेली वडि लोपार्जीत जंगम व स्थावर इस्टेटीचे तिचे पश्चात आह्मी वारस आहों हल्लीं तिजला कर्ज कोणाचें नाहीं. ती जिवंत आहे तो-पर्यंत जिनगीचा उपभोग घेण्याचा हक्क आहे. तिजला फसवून कोणी तिचेपासून गहाण खरेदी वगैरे घेऊं नये घेतल्यास ते बातल असें. ही नोटीस ता ८-४-०८ इ०

सही

गोविंदा वल्लद गणाजी वडतकार
मु० उमरी द० खु०

नथु वल्लद गणपतजी वडतकार
नं. ख. १० मु० उमरी द० खु०

---

## नोटीस

नोटीस बेशमी सिताबाई जवजे बळीराम कुल्ट रा० पुंड ता० आकोट इस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी भावसून आहेस व माझा भाऊ नामे बळीराम हा मरण्यास सुमारे १५-१६ वर्षे झालीं आहेत. तो जिवंत असतां बायका बायकाचे बेबनाव होत असल्यामुळें आह्मी विभक्त झालों परंतु ते घरचा कर्ता असल्या कारणानें आमची वडिलोपार्जीत जिनगी तिचेपाशीं असे. ती जे हल्लीं शेत नंबर तुझे नांवें आहेत ते वडिलोपार्जीत जिनगीवर मिळविलेलें आहेत. यामुळें तूं जिवंत आहेस तोपर्यंत फक्त अन्नवस्त्र घेण्याचा तुझा अधिकार आहे. इतके असून जर तूं तें कोणास गहाण खरेदी अगर बक्षिसपत्र करून दिलें तर बातल समजलें जाईल. ही नोटीस दिली तारीख ७-४-१९०८ इ०

सही

बाबूजी वल्लद लक्ष्मण कुलट
रा० पुंड ता० आकोट

नं. ख. ११ निशाणी रेघ

---

## जाहिर नोटीस

सर्वत्र शेट सावकार व इतर लोक यांस खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं मौजे पुंड ता० आकोट येथील आमची स्थावर इस्टेट सीताबाई जवजे बळीराम कुल्ट रा० पुंड इचे वहिवाटीस आहे तिचा फक्त अन्नवस्त्र घेण्यापुरता हक्क आहे करितां तिजपासून कोणी तिजला फसवून गहाण अगर खरेदी बक्षिसपत्र वगैरे करून घेतल्यास तें रद्द समजलें जाईल. या उप्पर कोणी गहाण खरेदी घेतल्यास त्याजवर कायद्याप्रमाणें तजवीज केली जाईल. सदर्हू जिनगीला कायदेशीर रीतीनें विकण्याचा हक्क नाहीं या करितां सर्वत्रास जाहिर होण्याकरितां ही जाहिर नोटीस दिली आहे. ता० ७-४-१९०८ इ

सही

बाबूजी वल्लद लक्ष्मण कुलट
रा० पुंड ता० आकोट

नं. ख. १२ निशाणी हातची रेघ

---

## नोटीस

महातपोनिधी महाराज श्रीरतननाथ संस्थान भर जाहागिर तालुके वाशीम जि० आकोला तर्फे वहिवाटदार महंत रामगिरजी आडा माहानिरवाणी वस्ती मौजे भर जाहागिर तालुके वाशिम जिल्हा आकोला यांसी स्वरूपपुरी गुरु उदेपुरी राहणार मौजे खेरडे तालुके खामगांव जिल्हा बुलढाणा यांजकडून नम्रपणें कळविण्यांत येतें कीं माझे परमपूज्य गुरु सत्पुरुष तपोनिधी उदेपुरी गुरु स्वरूपपुरी यांचें निधन होण्यास तीन वर्षे झालीं तेव्हां पासून त्यांचे पश्चात तारीख २७ जून १८९४ इसवीचे माझे सदर्हू गुरुनीं लिहून नोंदून दिलेल्या ट्रस्टडीड (व्यवस्था पत्राच्या) आधारें तुमचे स्वाधीन असलेली मौजे खेर्डे, येकफळ, कुरखेड, गऊळखेड, येथील स्थावर जंगम मिळकती ची व्यवस्था ट्रस्टडीड मध्यें लिहिल्याप्रमाणें चालत नसून बरीच गैर व्यवस्था दिसत आहे. सदर्हू खेरडे मठाचे अधीपति माझे गुरु उदेपुरी यांनीं ज्या उद्देशांनीं ट्रस्ट स्थापन केला तो उद्देश मुळींच सिद्धीस जात नसून सदर्हू जिनगीची अफरातफर चाललेली आहे. माझे सद्गुरु उदेपुरी यांच्या नांवास कलंक लागेल अशीं आचरणें अलिकडे घडून येत आहेत कांहीं कांहीं मुख्य बाबी उदाहरणार्थ मी आपणापुढें मांडतो.

१ वेदमूर्ती राजश्री गोविंद दादाजी तडे गांवकर हे खेर्ड्यास असून त्यांचा खाण्या-पिण्याची व पुराणाची व्यवस्था ज्या प्रमाणें करणें हें तुमचें काम आहे तसी व्यवस्था होत नाहीं इतकेंच नव्हे तर सदर्हू गरीब ब्राह्मणास आपण मठांत येऊं देत नाहीं व त्यांचे खाण्यापिण्याचीही कांहींच सोय करीत नाहीं. त्यांचें पुराणही होत नाहीं बाहेरील हरदास अगर पुराणिक आल्यास त्यांचें किर्तन अगर पुराण केलें जात नाहीं. खुद्द मठांत नित्य नियमाप्रमाणें व्हावयाचें पुजार्चन, नैवेद्य, अतीथी संभावना धर्मादाय वर्षास पुण्यतिथी इत्यादि मुळींच होत नसून केवळ दोन जटाधारी माहा पुरुष मठांत राहून तंबाखु व गांज्या यांचा व्यय करून मठांत येणारे जाणारे भाविक लोक व शिष्य समूह यांना न रुचेल अशी उर्मट भाषणें व कृत्य करण्यांत वेळ घालवितात. सदर्हू माहा पुरुष हे शेतीची देखरेख व मालाची हीपाजत मुळींच करीत नाहींत. सारांश त्याच्या गैर वर्तनानें व जिनगीच्या चाललेल्या निष्काळजी व्यवस्थेमुळें या खेरडे मठाबद्दल या परगण्यांतील व आसपासच्या भागांतील सर्व शिष्य शाखेच्या व इतर भाविक लोकांच्या मनांत श्रद्धा कमी झाली असून सर्वांची नाराजी झालेली आहे. खेरडे संस्थानच्या उत्पन्न व खर्च याबद्दल रोजचे तपासीलवार खात्री लायक पद्धतशीर हिशेब नाहींत इतकेंच नव्हे तर मुळींच उत्पन्न व खर्च यांचें कधीं टिपणही केल्याचें दिसून येत नाहीं सर्व प्रकारें अव्यवस्था व नासाडी चालल्याचा प्रकार दिसत आहे. जमिनीचा उदीम चालण्यासाठीं व जनावरांची अवशकता असतां हि जनावरें विकलीं आहेत व विकत आहात. उदेपुरी यांचा शिष्य यांना त्यानें ह्या सर्व जिंदगीची स्वतंत्र व्यवस्था व वहिवाट मालकाप्रमाणें मजकडेस येऊन मी गुरुची इच्छा लक्षांत आणून तिची अमलबारी पूर्णपणें केली असती परतु नाईलाज आहे कीं दांडगाईनें व्यवस्था माझे हातांत घेण्याची माझी इच्छा नाहीं माझे स्वतः बद्दल आपली मनुष्य किती बेपरवा आहेत व माझे खाण्याची मुद्दां हेळसाण कशी होते हें मी आपण होऊन कळविणे मला उचीत वाटत नाहीं. सबब स्वतःबद्दल मी कांहींच लिहूं इच्छित नाहीं सत्कार्यें सर्व जिंदगी लागावी व त्यांचें नांव अबादीत चालावे व व्यवस्था पत्रांत लिहिल्याप्रमाणें पुजन कथा पुराण व इतर नैमित्तिक कृत्यें सुरळीत चालून मठाचा उत्कर्ष व्हावयासाठीं सर्व जिंदगी उदेपुरी यांनीं तुमचे स्वाधीन केली. परंतु आपलेकडून व्यवस्था होत नाहीं. व्यवस्थेचा मूळ उद्देश सिद्धीस जात नाहीं करितां आतां निरुपाय ह्मणून लेखनद्वारें आपणास सूचविणें भाग पडतें कीं आपण स्वतः खेरडे मुक्कामीं येऊन सर्व प्रकार प्रत्यक्ष पाहून गावचे व आसपासच्या लोकांचें ह्मणणें ऐकून घेऊन कोणत्याही रीतीनें ठेवण्यास जागा राहणार नाहीं अशी ताबडतोब व्यवस्था करावी, येणें प्रमाणें न झाल्यास अगर पंधरा दिवसाचे आंत मजला आपला विचार काय आहे हें उत्तरीं मला न कळवाल तर रीतीप्रमाणें कोर्टांत फिर्याद करून कायद्याप्रमाणें जो इलाज करणें संयुक्तिक दिसेल तसा करणें भाग पडेल. त्याबद्दल होणारा खर्च तुह्मावर पडेल सुचनार्थ अगाऊ लिहिलें आहे सूज्ञास ज्यास्त लिहिणें नको. निर्भिडपणें चार शब्द लिहिण्याचें धाडस करणें भाग पडले याबद्दल माफी करावी.

आपला परम नम्र शिष्य

नं. ख. १३ रामपुरी

---

## नोटीस

नोटीस बेशमी अज्यानी मर्द शिवराम जात कुणबी वडतकार वस्ती उमरी महमदाबाद ता० दर्यापूर इस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी साक्षांत चुलती असून तुजला पुत्र संतान नाहीं. तुझ्या मागें जंगम स्थावर इस्टेटीचें आह्मी मालक आहो तुजला कर्ज वगैरे कोणाचें नाहीं हल्लीं तूं जंगम माल रुपये ५०० किमतीचा गणपत किसन कांबे वस्ती इटकी याचे घरीं घेऊन गेलीस, व स्थावर माल शेत जमीन मळीचे ११ एकर व पेठीचे एकर ७॥ ही वडिलोपार्जीत असून तिचा मेरे पावेतो उपभोग घेण्याचा तुझा हक्क आहे. विकण्याचा तुजला हक्क नाहीं. आह्मी पश्चात सर्व जिनगीचें वारस आहो. तरी तूं सदर्हू जिनगीचे गहाण, खरेदी वगैरे करून दिल्यास ते बातल असे. कळावें. तारीख ८-४-१९०८ इसवी

सही

गोविंदा वल्लद गणाजी वडतकार मु. उमरी
ममदाबाद दस्तूर खुद

नथु वल्लद गणाजी वडतकार मु. उमरी
नं. ख. १४ ममदाबाद दस्तूर खुद

---

## नोटीस

बेशमी मैनाबाई मर्द रुमचंद खत्री राहणार मल्कापूर नवा मोहला ईस:—

खालीं सह्या करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं तुझ्या पासून शेत खर्वे नंबर २३ मौजे खोकोडी येथील भाडेपट्यानें २ वर्षाकरितां घेतलें होतें. पण मागून शेतांत काम करण्यांस गेलो असतां तुझा दिर नामे देवलाल वल्लद बिसनलाल खत्री यांनें मनाई केली व सांगितलें कीं ह्या शेतांवर माझा तांबा आहे ह्मणून ह्या नोटीशीनें कळविण्यांत येतें अतां आमची शेत वहण्याची इच्छा नाहीं. कारण पुढें मागें भांडण तंटा करण्याची वेळ येईल असें वाटतें व आह्मी गरीब माणसें आहोत आतां तुह्मी आमच्या भरवंशावर राहूं नये आपण आपल्या शेताची पाहिजे ती व्यवस्था करावी. आतां आह्मी पच्याच्या कोणत्याहि शेतीचे व पैशाचे जबाबदार नाहीं. आमचा भाडेपट्टा रद्द असे.

सह्या

(१) अबदुलगनी वल्लद शेखमहेबुब द. खु.
(२) मीरहैदर वल्लद मीरजंगु दस्तुर खु
(३) महमदअक्रम वल्लद महमद मुकीम
(४) अब्दुलाबेग वल्लद बंडाबेग
(५) गुलाम मुस्तफा वल्लद महमद मुकीम. नंबर ३, ४ व ५ ह्यांचा दस्तुर करणार अबदुलगनी वल्लद शेखमहबुब दस्तुर खुद राहणार मल्कापूर शिकली पुरा

नं. ख. १५

---

## जाहिरनामा

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं माझा बंधु नामे गणापा वल्लद सोनापा वाणी राहणार कोळंबी हे अमिश्र झाले आहेत. त्यांच्याशीं कोणी कोणत्याही तऱ्हेचा व्यवहार करूं नये. त्यांनीं केलेला व्यवहार ते अमिश्र असल्यामुळें योग्य होणार नाहीं व तुह्मी त्याजला दिलेला पैसा बुडेल. आमची मिळकत अगर मी त्या गोष्टींचा जबाबदार नाहीं. यास्तव कळविलें आहे कळावें तारीख ३- ४- १९०८

सही

जानाआपा वल्लद सोनाआपा वाणी
नं. ख. १६ कोळंबी

---

## जाहिर नोटीस

सर्वत्र शेटसावकार खालीं सही करणार यांजकडून इतर लोकांस जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं अनंत गंगाधर व जयराम सोनभट मुळे पैकीं जयराम आ० पा० आई मंजाबाई मर्द सोनभट राहणार पातुर शेखबाबू सदर्हू इसमापैकीं जयराम हा माझा पुतण्या असून अनंत हा भाऊ आहे. यांनीं वडिलोपार्जीत इस्टेट मौजे माळोद— पातुरशेखबाबु येथील विकण्यास काढली आहे. सदर्हू इस्टेट त्यांजपासून कोणी गहाण खरेदी पट्यानीं वगैरे घेऊं नये घेतल्यास तो सर्व व्यवहार रद्द आहे. कोणाचें नुकसान होऊं नये करितां कळविलें आहे कळावें तारीख ९- ४- ०८

सही

वासुदेव रामचंद्र मुळे राहणार
पातुरशेखबाबू निशाणी खुद

नं. ख. १७

## नोटीस

मातोश्री कपुराबाई मर्द आकाजी राहणार तळपबुजरुक ता० मंगरूळपीर पो० मानोरा यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमच्या मातोश्री आहांत. तरी पण आपला धाकटा मुलगा गोविंदा हा मरण पावले पासून आपण लोकांच्या सांगण्यावरून शेतें विकण्यास काढल्याचें समजतें ह्मणून या नोटिशीनें कळविलें जातें कीं आपण आतां वयोवृद्ध झाला अहां आतां आपली बुद्धी वयाच्या मानानें ठिकाणावर राहत नाहीं व लोकांच्या सांगण्यावरून आपण शेतें व जिनगी विकण्यास काढतां अहां तर तसें आपण करूं नये. आपण स्वस्थ हरी हरी करीत घरीं बसावें. आह्मास देवाच्या दयेनें व आपल्या पायाच्या पुण्याईनें सर्व कांहीं अनुकूल आहे. तर आपण शेतें व जिनगी विकूं, गहाण खरेदी अगर बक्षिस देऊं नयेत. या उपर दिल्यास त्याची जोखीम इस्टेटीवर नसून तुमच्या जातीवर व घेणारावरच राहिल. व सर्व खतें बातल आहेत असें समजूं. कळावें ता० ६-४-०८ इ०

सही

पुंजाजी वलद आकाजी भाकरे
रा. तळप बुजरुक दस्तूर
हनगु वलद पुंजाजी

नं. ख. १८ निशाणी खुद्द

## नोटीस

रा० रा० माधोराम मारवाडी राहणार मानोरा यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मला असें समजतें कीं आपण आमच्या मातोश्री कपुराबाई यांच्या जवळून आमची सर्व जिनगी तिला फसवून खरेदी घेणार अहांत तर नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं माझी आई ही वयोवृद्ध असल्या कारणानें तिच्या बुद्धींत फरक पडला आहे. तर तिच्या जवळून तुह्मी आमची इस्टेट गहाण खरेदी बक्षिस अगर कोणत्या इतर रीतीनें घेऊं नये घेतल्यास आह्मास योग्य कोर्टांत दाद मागवी लागेल व आपले पुर्जे बातल समजले जातील आपणास पुष्कळदा तोंडीं सांगितलें पण आपण ऐकत नाहीं ह्मणून ही नोटीस दिली आहे कळावें. ता० ६-४-०८ इ०

सही

पुंजाजी वलद आकाजी भाकरे
रा. तळप बुजरुक दस्तूर
हनगु वलद पुंजाजी

नं. ख. १९ निशाणी खुद्द

## जाहिरात

सर्वत्र लोक शेट सावकार यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं माझी मातोश्री कपुराबाई या आतां वयोवृद्ध झाल्यामुळें त्यांची बुद्धी ठिकाणावर न राहिल्या कारणानें त्याना लबाडीनें फुसलावून कोणी त्यांच्या जवळून त्याची जिनगी खरेदी, गहाण, बक्षिस अगर अन्य कोणत्याहि तऱ्हेनें घेऊं नये घेतल्यास त्या बद्दलची जोखीम मजवर अगर माझ्या इस्टेटीवर न राहतां जो व्यवहार करणार याजवरच राहिल. व होणारे रोखे बातल समजले जातील. कोणाचें नुकसान होऊं ह्मणून ही सुचना आहे कळावें ता. ६-४-०८ इ.

सही

पुंजाजी वलद आकाजी भाकरे
रा. तळप बुजरुक दस्तूर
हनगु वलद पुंजाजी

नं. ख. २० निशाणी खुद्द

## नोटीस

वेशमी—सजन मर्द रामजी राहणार जांभ ता० आकोला पोष्ट मुर्तिजापूर यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तु आमची भावजयी आहेस. आमचा भाऊ नामे रामजी यास मरून अजमास ६-७ वर्षे झालीं. पण इतके दिवस तूं आमच्या मध्येंच आहेस पण आतां एक वर्ष झालें तूं लोकांच्या फंद फितुरानें शेत विकणार आहेस असें समजतें. तर तुला ह्या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं ही शेतें वडिलोपार्जीतची समाईक इस्टेटींतली आहेत तर तुला विकण्याचा अधिकार नाहीं तूं मरे पर्यंत अन्नवस्त्राची मालकीन आहेस व तें तुला आह्मी आजपर्यंत देतही आहों व पुढें देऊं ही. तर तूं कोणास शेत गहाण खरेदी व बक्षिस पद्धतीनें अगर कोणत्याही कारणानीं देऊं नयेस. जर देशील तर त्या पैशाचा बोजा माझेवर अगर शेतांवर न राहतां तुझ्यावर तुझ्याशीं व्यवहार करणाऱ्याच्या जातीवरच राहील. कोणाचें नुकसान होऊं नये ह्मणून अगाऊ सूचना केली आहे. कळावें. ता. ४-४-०८ इ.

सही

नरसाजी वलद दर्याजी रा०
जांभ निशाणी खुद्द
बापुजी वलद दर्याजी रा. जांभ
नि० खुद्द
द० मारोती वलद झिंगराजी

नं. ख. २१ सुतार द. खुद्द

## जहिरत

सर्वत्र शेट सावकार व इतर लोक यांस या जाहिरातीनें कळविण्यांत येतें कीं सजन मर्द रामजी आमची भावजयी ही आमच्या समाईक इस्टेटींपैकीं शेतें विकणार असल्याचे समजतें. तर तिला कोणत्याच प्रकारे जिनगी विकण्याचा अधिकार नाहीं. ती फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहे. तर कोणी आमच्या जिनगींसंबंधी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करूं नये या उपर जर कोणी केला तर त्या आह्मी अगर आमची इस्टेट जबाबदार नाहीं तर त्याची जोखीम तिच्यावर व घेणारावरच राहिल कोणीचें नुकसान होऊं नये ह्मणून अगाऊ सूचना आहे कळावें ता० ४-४-१९०८ इ०

सही

नरसाजी वलद दर्याजी रा० जांभ
नि० खुद्द
बापुजी वलद दर्याजी रा० जांभ
नि० खुद्द
द० मारोती वलद झिंगराजी

नं. ख. २२ सुतार द० खुद्द

## नवी घटना.


### पैसे कमविण्याची युक्ती

### वाचा व आपलें हित करा.

गजकर्णाचें सोनेरी मलम दर सी. १२ आणे २४ तासांत गजकर्ण इसब बरे करणारें औषध

बक्षीस

१२ कुप्या घेणारास १ बर्मा टाईमपीस बक्षीस
१८ कुप्या घेणारास बर्मा आलारम घड्याळ
२४ घेणाऱ्यास रासकोप सिस्टम ३ रु. वाले खिशांतील घड्याळ बक्षीस.
४८ घेणाऱ्यास संगीत गाणारें ६ इंच उंचींचे टिकाउ व मजबूत घड्याळ बक्षीस



रासकोप सिस्टिम घड्याळ इतके कांहीं मजबूत आहे कीं थोड्या किंमतींत मिळून ६-७ वर्षे खुषीनें चालतें कोणीही कंपनीनीं इतकी स्वस्त घड्याळें विकण्याचो हिंमत केली नाहीं या घड्याळाची किंमत ३। रु. पो. खर्च ।-आणे बक्षीस मिळणारें सामान कांच, कमान पेटी व साखळी इतके प्रत्येक घड्याळा बरोबर इनाम

बक्षीस

वरील सहा घड्याळें एकदम घेणाऱ्यास एक घड्याळ बक्षीस मिळेल ह्मणजे ७ का पो. खर्चासुद्धां रु. २१. सामाना सहीत वरील बारा घड्याळें एकदम घेणारास ३ घड्याळें बक्षीस मिळतील पो. खर्चेसुद्धां रु. ४१ सामाना सहीत

पत्ताः—के. नुरा कं० भेंडीबाजार मुंबई

नं. ४७

त्वरा करा ! त्वरा करा?

## बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्यां वेळांत आणि उत्तम रीतिनें शिकविले जाईल दर माफक असून वक्तशिर काम केलें जाईल आजवर ५०० शे माणसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. बाहेर गांवच्या लोकांकडून रेल्वेभाडें व जेवण खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

जेकब.
सायकल टीचर.

पत्ताः----
अहमद अली कासमजी बोहरा
नं ४८ इं. ७ आकोला ( शहर )

आमचें पेटंट यंत्र लोकांना पसंत आहे.



मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस— रा. रा. वि. वि. तुह्मी कृपाकरून पाठविलेलें कडबा कापण्याचें यंत्र सुरक्षित पोंचलें, त्यानें कडबा फारच चांगला कापला जातो. सदरहु यंत्र इकडील लोकांना फारच पसंत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्यांच मागण्या आपणाकडे येतील. त्या मानाने किंमत ( रु. १०॥१० ) ही फारच कमी ठेवलेली आहे. कळावें ही विनंती ता. ४-२-०८

सही

जहागीरदार सीप रीया काल ( ग्वालेर ) | श्रीमंत नानसाहेब फाळके दफ्तरदार

नं. क. ३२ इं. ९

नहि सत्यात् परोधर्म

# येवल्याचे पितांबर व पैठण्या

आह्मी येवले येथें तयार होणारे पितांबर, पैठण्या व खण वगैरे माल बाहेरगांवीं पाठवित असतो. माल खात्री माफक दरानें व योग्य अडतीनें पाठऊं. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जाईल. माल स्वस्त, सुबक व वक्तशीर पाठविल्याबद्दल आह्मास शेकडों पत्रे आलीं आहेत.

पत्ताः—

श्रीनिवास बाळकृष्ण होले जनरल
नं. ७२ मर्चंट व कमिशन एजंट
इं० ६ यवले.

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.

स्थापना सन १९०७

भांडवल एक लक्ष रुपये.

प्रत्येक भाग २५ रुपयाचा

याप्रमाणें एकंदर भाग ४०००.

भागीदारानें भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबद्दल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रक्कम प्रत्येक महिन्याला रु. ५ प्रमाणें पुरी करून दिली पाहिजे.

सदर्हू कंपनीचें मेमोरेंडम् व आर्टिकल्स ऑफ आसोशिएशन आकोला येथें सदर कंपनीचें आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टसच्या प्रती सदर्हू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील.

बोर्डाच्या हुकुमावरून
पी. सी. जोगळेकर
आणि कंपनी
म्या. एजंटस्

नं. १३ इं ६

# वऱ्हाडसमाचार.

**BERAR SAMACHAR**

वर्ष ४२ ] अकोला वऱ्हाडसमाचार सोमवार तारीख २० माहे एप्रिल सन १९०८ इ० [ अंक १४



## वर्गणीचेदर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन आळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.



### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

ह्या बँकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिलक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिलक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक
आकोला ९।९।०५ } G. A Phillips
एजंट

नं ७३



### देशी दवाखाना

(वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर यांचा

आह्मी आमचा दवाखाना पुन्हा चालू केला आहे. शास्त्रोक्त रीतीनें औषधें तयार केलेलीं असतात. चिकीत्साहि काळजी पूर्वक होत असते हें सर्व श्रुतच आहे. गरजूं लोकांनीं अनुभव घेऊन पाहावा. भस्म, मात्रा, पाक, गुटिका, वगैरे विक्रिस तयार आहेत. गरमी, उपदंश, प्रदर, धुपणी, बाळंतरोग, पंडु इत्यादि कष्टसाध्य रोग फार लवकर दूर होतात.

पत्ता— वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर आकोला येथें शहरांत मुलीचे शाळें जवळ
चैत्रशुध प्रतिपदा शके१८३० आकोला

नं० ख० १


### नोटीस

नोटीस बेशमी गोपाई मर्द जाणु गळी रहाणार मौजे उंद्रि तालुके चिखली यांस— खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं जाणु गळी हा उभयतांचा नवरा असून आपण दोघीही गंधर्वाच्या बायका आहोत. जाणु गळी याजला मरण्याला ५—६ वर्षें झालीं आहेत. तुझ्यापोटची अज्यान नावाची मुलगी आहे. मयत नवऱ्याची ईस्टेट मौजे उंद्री येथील सर्वे नंबर ७८ घर खांब ४८ धाब्याचें कोठ्याची जागा ही आहे. जाणु गळी हा जिवत असतां तुजला त्यानीं वेगळे ठेविले होते कारण तुजला पहिले घरचे नवऱ्याचीं तिन मुलें व दोन मुली आहित ते तुजजवळ पाहिले पासून राहात असल्यानें तुझे व तुझ्या नवऱ्याशी बेबनाव होऊन त्यानीं तुजला वेगळे ठेवले व त्यानीं मजला गंधर्वाची बायको करून तो व मी एकत्र राहूं लागलो व घरचा सर्व कारभार माझे वतीनें चालत असे. पुढें तुझा व माझा नवरा मरतेवेळीं सर्व इस्टेट माझे ताब्यांत होती. मरतेवेळीं त्याचे कडे जें कर्ज होते तें मी जानु गळी मेल्यानंतर मीच देऊन पावत्या घेतल्या आहेत. पुढें जाणु गळी मेल्यानंतर ६—७ महिन्यानीं तूं माझ्याशीं भांडतअसल्या कारणानें तुजला पंचा समक्ष सर्व इस्टेट शेत, घर, कोठा, भांडीं, डागीने वगैरे निमे तूं व मी वाटून घेतले. ते वेळीं आपले उभयताकडें मयत जाणू गळी यांचे हातचे कोणाचेंच कर्ज नव्हतें. ज्या दिवसापासून वाटणी झाली त्या दिवसापासून तूं तुझे हिशाचा व मी माझे हिशाचा उपभोग घेत आहोंत. हिशाचे वेळीं तुझे व माझे असे बोलणें होते कीं तुझा हिस्सा तूं मरतेवेळीं तुझी मुलगी अज्यान इजला द्यावा व मी माझा निमे हिस्सा मयताचे लग्नाचे बायकोला मुलगी होती तिचा मुलगा दवलत नांवचा याजला द्यावा. आतां शेतांतील एक द्वितिआंश हिस्सा तुझे मुलगे पहिले घरचे हे वाहतात व माझे शेतांतील व मी वाहेत. तुझे आपले घरचीं मुलें माझ्याशीं विनाकारण भांडण करतात. त्यामुळें मी माझा हिस्सा दुसरे कोणास लावून काढीन. हल्लीं मी सदर्हू शेताचा $\frac{1}{2}$ हिस्सा १५०० रुपयांत गाहाण दवलत चंद्रभान याजला देऊन त्या रुपयाचें ५०० चे एक शेत खरेदी घेतलें. व बाकीचे काशी यात्रेचें मजकडे कर्ज होतें तें देऊन कांहीं रुपये मजजवळ आहेत. त्या रुपयाचे मी पुन्हा दुसरे शेत मिळाल्यास घेणार व वरील दीड हजार रुपये मीच माझे हिशांतून देणार.

तूं मला नोटीस दिली त्यांत लिहिलें कीं सरवे नंबर ७८ यांत एक द्वितिआंश हिस्सा तुझी मुलगी अज्यान नांवाची आहे तिजला दिला व बाकी राहिलेला एक द्वितिआंस हिश्यांत आपलें उभयताची वाटणी झाली. हें कारण नोटिशींत लिहिणें फार चुकीचें आहे. तुझ्या माझ्या सर्व इस्टेटींत निमेनिमे हिस्सा झाला त्याचप्रमाणें शेताची वाटणी होऊन धूराबांध आहे. आतां एक द्वितिआंशचा हिस्सा तुझी मुलगी अज्यान इजला मी मुळींच कबूल केला नाहीं करितां तूं जे नोटिशीनें कळवितेस तें सर्व खोटें आहे. सरवे नंबर ७८ यांतील एक द्वितिआंश हिस्सा माझा आहे तो मीच वाहते तो हिस्सा तूं आपल्याला मिळण्याचे उद्देशानें तुझे पाहिले घरचे मुलांना किंवा दुसरे बंडखोर मनुष्याना लाऊन देऊन तंटा करशील तर किंवा माझे हिश्यांत येशील तर मी कायद्याप्रमाणें तुझ्यावर फिर्याद करीन. तूं नोटीशीनें कळविलें कीं माझा हिस्सा एक चतुर्थांशचा आहे तर व माझे ह्मणणें एक द्वितीआंशचा आहे. तर तूं कोर्टांत फिर्याद करून तुझें ह्मणणें खरें करून घे. पण विनाकारण तंटा करून मजला खर्च करण्यास लावशील तर मी खर्चाचे रुपये तुझे जवळून घेऊन माझे हिश्याचा मी ताबा सोडणार नाहीं तूं जो नोटीस दिली त्यांतील मजकूर सर्व खोटा आहे. व माझी हकीकत मी तुजला नोटीशीनें कळवीत आहे. कळावें. ता० १२।४।०८ इ०

सही

तुळसाई मर्द जानु गळी राहणार उंद्री ता० चिखली

दस्तुर पुर्णाजी तुकाराम द० खु.

नं. ख. ४१

### नोटीस

रा. रा. मारुती वल्लद परशराम राहणार सस्ती ता. बाळापूर यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं तुमच्या शेतांत तुमची व माझ्या नवऱ्याची व दुसऱ्या इतर हिस्सेदारांची मिळून जवारी आहे. त्यांत माझ्या नवऱ्याच्या हातची २ खंडी जवारी भरलेली आहे. आतां असें कळतें कीं तुह्मी कांहीं लबाड लोकांच्या सल्यानें माझ्या पश्चात तें पेव उघडणार असून त्यांतील जवारी व देवचिठ्ठी ही लांबविणार आहां. तुह्मी ही गोष्ट करूं नये. मी समक्ष हजर असल्या शिवाय पेंव उघडू नये आणि या नोटिशीला न जुमानतां तुह्मी पेंव उघडून जवारी घेऊन जाल तर माझ्या जवारीचा तुह्मी व इतर जवारीवाल्यांनीं मिळून संगमतानें चोरी केली असें समजून तुह्मावर दिवाणी फौजदारी करण्यांत येईल पेंव उघडण्यापुर्वी मला नोटीस देऊन पेंव उघडण्याची तारीख व वेळ ही कळविण्यास चुकूं नये कळावें. ता. १६-४-०८

सही

सावित्री मर्द तुकाराम चेरुळकार वस्ती सस्ती हल्ली मुक्काम अनवि मिरजापूर ता, आकोला निशाणी

नं. ख. ४२ हातची बांगडी.

### नोटीस

नोटीस— कवतीका मर्द निधानजी भेंडे रहाणार हिंगणवाडी ता० मोर्तिजापूर इसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी सून आहेस तुझा नवरा मयत झाल्यानंतर तुझा सासरा आमचा वडील बंधु मयत झाला. त्यास मयत होण्यास सात महिने झाले. मौजे हिंगणवाडी येथील सर्वे नंबर १०-११-३९ हीं ३ शेतें वडिलोपार्जीत असून ताबा आमचा पांचही भावाचा असून आज पावेतों उत्पन्न घेत आलों. सदर्हू शेतांवर तुझा हक्क नाहीं तूं फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहेस. करितां सदर्हू शेतें तूं कोणास गहाण खरेदी बक्षी वगैरे लिहून देऊं नये. दिस्पस बातल असे. तुझा दत्तकपुत्र घेण्याचा इरादा आहे तर आमचे संमतीवाचून दत्तक वगैरे घेऊं नये. कळावें. ता० १४ माहे [illegible] १९०८ इ०

सही

निशाणी सखारामजी [illegible] भेंडे रहाणार हिंगणवाडी

नं. ख. ४३ नि० हातची रेघ.

### जाहिरात

सर्वत्र शेट सावकार व इतर सर्व लोक यांसः—

खालीं सही करणार यांजकडून जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं आमचा वडील बंधु चंद्रभान हा अजमास सात महिने झाले मयत झाला. त्याचे नांवे असलेलीं शेते मौजे हिंगणवाडी येथील सर्वे नंबर १०—११—३९ याचें खोतें कौतीक मर्द निधानजी आमची सून इचे नांवें झालें आहे. सदर्हू शेतें आमचीं वाडिलार्जीत आहेत. व आमचे ताब्यांत आहेत. सदर्हू शेतें विकण्याचा कौतीक मर्द निधानजी इला हक्क नाहीं. ती अन्नवस्त्राची मालकीण आहे करितां कौतीक इजपासून सदर्हू शेतें कोणी गहाण खरेदी बक्षीस वगैरे घेऊं नये. घेतल्यास तो व्यवहार रद्द असे कोणी समजूं नये करितां जाहीर नोटीशीनें कळविलें आहे या उपर कोणी गहाण खरेदी वगैरे घेईल तर त्या रकमेचा बोजा सदर्हू शेतावर रहाणार नाहीं. कळावें. ता० १३—४—०८इ०

सही

सखारामजी वल्लद नथजी भेंडे वस्ती हिंगणवाडी याचे हातची

नं. ख. ४४ निशाणी रेघ.

### वर्तमानसार

गेल्या शनिवारीं चंद्रनगर येथें मेजर टार्डेनस हे आपल्या पत्नीसह तळमजल्यावरील दिवाणखान्यांत खाना खात बसले असतां समोरच्या खिडकीजवळ कोणी उभे असल्याचा त्यांच्या पत्नीस भास झाला इतक्यांत त्या खिडकींतून एक बॉम्ब गोळा फेकण्यांत आला. तो गोळा खाना खावयाच्या टेबलाखालीं पडला व फुटला. तो फुटल्यामुळें झालेल्या आवाजाच्या योगानें सर्व इमारतीस धक्का बसला; मेजरसाहेबांच्या पत्नीस मूर्च्छा आली व त्यांना स्वतःला थोडीशी इजाही झाली. बॉम्ब गोळ्याचे तुकडे चहूंकडे उडाल्यामुळें सामानसुमानाची बरीच नासाडी झाली. टेबलावरील जळता दिवा खालीं पडल्यामुळें त्यांतील तेल सांडून बिछाइतीनें पेट घेतला परंतु नौकर चाकर मंडळीनें मेहनत घेऊन आग तावडतोब विझविली.

तारखात्यांत नवीन सुरूं करण्यांत आलेली पद्धतिचा अनुभव पाहण्यासाठीं विशिष्ट काळपर्यंत अमलांत असावी व तेवढ्या अवकाशांत त्या पद्धतीनें कामकाज कसें चालतें हें पाहण्यासाठीं एक कमिटी नेमावी या दोन सूचना बंगाल चेंबर ऑफ कामर्सच्या कमिटीकडून व्हाइसरायसाहेबांस करण्यांत आल्या होत्या. त्या व्हइसरायसाहेबांनीं मान्य केल्याचें ना. मि. डब्ल्यु. एल. हार्वे यांनीं सदर कमिटीस कळविलें आहे. सदर कमिटींत दोन सरकारी अधिकारी व ठिकठिकाणच्या तारमास्तरांचे प्रतिनिधी यांचा समावेश होणार आहे. सुधारलेल्या तऱ्हेचीं चार जंगी लढाऊ जहाजें बांधण्यास लागणाऱ्या रकमेची तावडतोब मजुरी देण्याविषयीं प्रे. रूझव्हेल्ट यांनीं युनायटेड स्टेटसच्या कांग्रेसला मुद्दाम आग्रहाची सूचना केली आहे.

ते आपल्या निरोपांत ह्मणतात—निरनिराळ्या राष्ट्रांकडून आपआपलें आरमार कमी करण्यांत येईल ही आशा करणें व्यर्थ आहे व शांतता राखण्याच्या कामीं अर्बिट्रेशनवरही विशेष भरंवसा ठेवितां येणें शक्य नाहीं. तेव्हां दरसाल फक्त दोन तीनच लढाऊ जहाजें बांधणें शहाणपणाचें होणार नाहीं. कारण त्या योगानें युनायटेड स्टेट्सचें राष्ट्रीय महत्व कमी होऊन त्यांस अपमानास्पद स्थिति प्राप्त होण्याचा संभव आहे. स्वसंरक्षणाची ताकद अंगीं असणें हाच अत्यंत महत्वाचा राष्ट्रीय सद्गुण होय. स्वतंत्रता यालाच ह्मणतात.

एमेटाबद्दलच जाहिर सभेंत. बाबू बिपिन चंद्र पाल यांचे समेटा संबंधी खालीं अशयाचें भाषण होऊन समेटाचा ठराव सर्वानुमतें पास झाला. ते ह्मणाले समेटाबद्दल आमचा हा थोरपणाचा शेवटचा प्रयत्न आहे. यास जर यश येणार नाहीं तर काय पाहिजे ते झालें तरी ते आह्मी सोसूं पण समेटाबद्दल पुन्हा अक्षरही काढणार नाहीं. पबना, धुळें व पुणें येथील जिल्हापरिषदांनीं जें ऐक्य मान्य केलें आहे, त्या प्रकारचें ऐक्य आह्मांस पाहिजे आहे. या संबंधांत आह्मी आपलें तत्व कधींही सोडून देणार नाहीं. समेटाचा हा प्रयत्न जर निष्फळ झाला तर आह्मी आपली निराळी राष्ट्रीय सभा भरवूं; मग त्या कामीं आमचा कितीही छळ झाला तरी त्याची आह्मी पर्वा करणार नाहीं.

भावे व देशपांडे या दोन स्वयंसेवकांवर इं. पी. कोडच्या १५१ (गर्दी मोडण्याचा हुकूम अमान्य करणें) कलमान्वयें खटला चालू होता. त्या खटल्याचा निकाल ता. १४ रोजी पुणें येथील सिटी मॅजिस्ट्रेट्नीं दिला. दोन्हीं आरोपीस प्रत्येकीं १०० रुपयांचा दंड किंवा दंड न दिल्यास १। महिन्याच्या साध्या कैदेची शिक्षा फर्माविण्यांत आला. यानंतर गोडसे, तळवळकर व भावे या तीन स्वयंसेवकावर इं. पी. कोडाच्या १५३ (दंगा होईल असें माहीत असतांही चीड येण्यासारखें वर्तन करणें) कलमान्वयें करण्यांत आलेल्या खटल्याची काल रोजी सुनावणी झाली. खटल्याचा निकाल काय होतो पहावा.

मौलवी लियाखत हुसेन व अबदुल गफूर यांच्यातर्फे हायकोर्टाकडे अपील करण्यांत आले असून हायकोर्टानें त्या जामिनावर मोकळे केलें आहे.

ता. ४ एप्रिलच्या "युगांतर पत्राच्या अंकांत "इंग्रजांचा जुलूम" ह्या विषयांवर एक लेख प्रसिद्ध झाला होता त्यावरून, सदरहु पत्राच्या आंफिसाचा झाडा घेण्याबद्दल व मि. फणींद्रनाथ मित्र, प्रिंटर व पब्लिशर, यांना पकडण्याबद्दल वारंट मिळण्याविषयीं पोलिसनें प्रासडेन्सी मॅजिस्ट्रेटसाहेबांकडे अर्ज केला अर्जाप्रमाणें वारंटे काढलीं गेल्या शनिवारीं म्याजिस्ट्रेटांनीं वारंटाअन्वये 'युगांतर' आफिसचा झाडा घेण्यांत आला. कित्येक कागदपत्र व रजिस्टरें जप्त करण्यांत आलीं. आफिसच्या बाहेर लोकांची गर्दी झाली होती व पोलीस झाडा घेतल्यावर परत निघाले तेव्हां लोकांनीं त्यांना शिव्या दिल्या मि. फणिंद्रनाथ मित्र यांना वारंटाची बातमी पूर्वीच मिळाल्यामुळें ते पळून गेले आहेत.

---

॥ वंदेमातरम् ॥

**प्रांतिक स्वदेशी संमेलन धुळें.**

वि. वि.- धुळें येथें चालू महिना अखेर होणाऱ्या प्रांतिक सभेच्या संधीस ता. २९ एप्रील १९०८ रोजीं **मुंबई स्वदेशीवस्तुप्रचारिणीसभा** व **खानदेश जिल्हा स्वदेशी संस्था** यांचे विद्यमानें धुळ्यास **प्रांतिक संमेलन** भरणार आहे. त्यावेळीं सर्वांनीं अगत्य येण्याची मेहरबानी करावी, अशी विनंती आहे.

**विनायक परशराम भागवत,**
**वासुदेव विष्णु शिदोरे,**
**गणेश लक्ष्मण पांगे,**
सन्मान्य चिटणीस प्रांतिक स्वदेशी संमेलन धुळें,

**सुचनाः—** सदरहु संमेलनासंबंधी सर्व पत्रव्यवहार रा. रा. विनायक परशुराम भागवत वकील धुळें, धुळें येथील प्रांतिक स्वदेशी संमेलनाचे सहकारी सन्मान्य चिटणीस यांशीं करावा.


# वऱ्हाडसमाचार

चैत्र वद्य ४ शके १८३०


## सरदार मोर्ले

मि मोर्ले यांनीं हाउस ऑफ कामन्सचें सभासदत्व सोडून देऊन सरदारी पतकारिली हें ऐकून हिंदुस्थानांतील कोणास विशेष आश्चर्य वाटावयाचें नाहीं. लिबरल पक्ष साधारण जनांच्या हक्कासाठीं तत्पर असलेला पक्ष आहे बडया लोकांचें राज्यकारभारांतील वर्चस्व नाहींसें करण्याच्या बाण्यानें वागण्याची त्यांची वहिवाट आहे असें असतां मि. मोर्ले यांच्या सारख्या बुढ्या लिबरलानें शेवटीं लॉर्डाच्या मालिकेंत जाऊन बसण्याला तयार व्हावें हा काय चमत्कार आहे असें कोणी ह्मणतील. पण हिंदुस्थानांतील लोकांना तसें ह्मणण्याला कांहीं कारणच नाहीं. लिबरलपक्ष अधिकारारूढ झाला तेव्हां ग्लाडस्टन साहेबाच चरित्रकार व मिलबर्क यांचे भक्त मि. मोर्ले हे हिंदुस्थानाच्या वाट्यास येणार हें ठरल्यामुळें हिंदुस्थानांतील लोकांना त्यांच्या विषयीं जी आशा वाटत होती ती सर्वस्वी निष्फळ झाल्यामुळें हिंदुस्थानांत मि. मोर्ले यांचें कौतुक होण्याचें कधींच बंद पडलें आहे मि मोर्ले यांना त्यांच्या पक्षाकडून कोठलाका सरदार मिळालेली असो हिंदुस्थानांतील लोक यांना सदैव 'लॉर्ड मोर्ले ऑफ मंडाले अँड रावळपिंडी' याच नांवानें ओळखतील. ज्या नांवाचें शेपूट त्यांच्या नावांपुढें जोडण्यांत येईल त्यांच्यांत जर कांहीं अन्वर्थकता आणणें शक्य असेल तर वर दिलेलीं मंडाले व रावळपिंडी या दोन शहरांच्या नांवांमुळेंच होईल. लालालजपतरायासारख्या देशभक्ताची चौकशीवांचून हद्दपारी व केवळ निरपराधी अशा अब्रूदार वृद्ध गृहस्थांची सुमारे पांच महिने कैदेंत कुचंबणूक या दोन बहादरीच्या कामामुळें कोणाही स्टेट सेक्रेटरीस सरदारांचीं वस्त्रें मिळालींच पाहिजेत! मि. मोर्ले यांच्या हाताखालचे सद्धांचे पार्लमेंटरी अंडर सेक्रेटरी दुसरीकडे बढतीवर जाऊन त्यांचे जागीं मि. बुचानन यांची नेमणुक झाली आहे. हिंदुस्थानांत प्रतक्ष फिरून स्वतः सर्व कांहीं पाहून आलेल्या इसमाची तजविज दुसरीकडे होते आणि हिंदुस्थानाच्या पदरीं एखादा नवशिका मनुष्य येतो यावरून मि. आस्किथप्रभृति प्रधान मंडळाला हिंदुस्थानाच्या कारभाराविषयींची काळजी कीती आहे हें उघडच दिसत आहे. मि. मोर्ले यांना पार्लमेंटांतील कॉटन प्रभृति मंडळींचे प्रश्न व त्याबरोबरच टोमणे ऐकून घेणें आतां असह्य झाले असो किंवा मि. मोर्ले यांच्या उडवाउडवीच्या व प्रसंगी उद्दामपणाच्या उत्तरांमुळें संतापलेल्या लिबरल सभासदांस आवरून धरण्यासाठीं मि. मोर्ले यांना हाउस ऑफ कॉमन्समधून दूर केलें असो, मि. मोर्ले यांच्या सद्दीला उतरती कळा लागली यांत संशय नाहीं.

## कर्झन पुराण.

हिंदुस्थानाचे खरेखरे हितकर्ते माजी व्हाइसरॉय लार्ड कर्झन यांची युनियनिस्टपक्षाच्या भावी प्रधानमंडळांत आपला शिरकाव व्हावा एतदर्थ मोठ्या नेटानें खटपट चालूं आहे. हिंदुस्थानांत सात वर्षपर्यंत पातशाही गाजविणाऱ्या या राजश्रीस प्रथम असें वाटलें कीं लिबरल किंवा युनियनिस्ट यांपैकीं कोणता तरी एक पक्ष एखाद्या प्रधान पदाची माळ आपल्याला घालण्याकरितां अगदीं सज्ज होऊन बसेल. पण आपलें महत्व आपणच विशेष मानणें निराळें आणि दुसऱ्यांनींही आपल्या मताप्रमाणें मत बनविणें निराळें. व्हाइसरॉयापेक्षां दुय्यम दर्जाच्या सेनापतीची कड घेऊन युनियनिस्ट पक्षानें त्यांना पदच्युत केलें आणि तो पक्ष इतका निष्ठुर कीं त्यांनीं लार्ड कर्झन यांना हाउस ऑफ लार्डसमध्यें शिरता येण्यासाठीं सरदारीचीही वस्त्रें दिलीं नाहीं तेव्हां प्रतिपक्षीयांकडे सरदारीकरितां तोंड वेंगाडण्याला त्यांनीं मार्गे पुढें पाहिलें नाहीं. तेथेंही त्यांची योग्य संभावना झाली. हाउस ऑफ कॉमन्समध्येंही कटकट केल्या खेरीज शिरकाव होण्याचा मार्ग दिसेना. हिंदुस्थानच्या मार्जी व्हाइसरॉयांचें एक कौन्सिल स्थापना होऊन त्यांत अध्यक्षाचे जागीं मिरविण्याचीही आशा निष्फळ झाली. तेव्हां लार्ड कर्झन यांनीं आड वाटेनें तोंडावर बुरखा घेऊन हाउस ऑफ लार्डसमध्यें शिरण्याचा मार्ग पसंत केला. त्या सभागृहांत पाय टेकल्याबरोबर रशियाशीं सरहद्दीसंबंधाचा तह आशियाटिकासंबंधाचा दक्षिण आफ्रिकेंतील प्रश्न इत्यादि बाबतींत सर एडवर्ड ग्रे किंवा लार्ड एल्जिन यांच्यापेक्षां आपण खात्रीनें अधिक चांगलें काम केलें असतें असें त्यांनीं आपल्या विनयपूर्ण वाणीनें बाहिर केलें. आपल्या कर्तबगारीची ओळख या रीतीनें पटवून दिल्यानंतर मि० बाल्फर यांच्या भावी अधिकार योगाचे वेळीं आपली हुंडी शिक्यावर पटावी ह्मणून आतां पासूनच त्यांचेवर छाप बसविण्याचे प्रयत्न सुरूं करणें लार्ड कर्झन यांना भाग पडलें. लोकांना आपली अर्जीजी करण्याची संवय पडल्यानंतर स्वतःला देखील ती कला कशी अवगत होते याचें उदाहरण अगदीं ताजें आहे. मि० बाल्फर यांनीं व्यापारी जकातीच्या संबंधांत जें धोरण स्वीकारलें आहे त्याची री ओढण्याला लार्ड कर्झन यांच्या सारख्या तरबेज व ताज्या दमाचा पादिपार्श्वक मिळण्याबद्दल त्यांनी ईश्वराचे आभारच मानले पाहिजे. हिंदुस्थानांत परदेशी मालावर जी जकात घेण्यांत येते ती उत्पन्नाकरितां आहे. हिंदुस्थानच्या उद्योग धंद्यांच्या संरक्षणाकरितां नव्हे हें हिंदुस्थानांत सर्वांना ठाऊक आहे. पण त्याच्या विरुद्ध बोलण्यांत मि० बाल्फर यांचे शद्ब झेलण्यासारखे असल्यामुळें लार्ड कर्झन यांना तसें केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. एवंच अधिकारधारणाकरितां लार्ड कर्झन यांचे आतां पासून आटोकाट प्रयत्न चालू आहेत. त्यांची धोंड वसाहतींच्या किंवा परराष्ट्रांच्या गळ्यांत अडकून हिंदुस्थान त्यांच्या तावडींतून सुटला ह्मणजे खैर होईल.

## जंगल खात्याचा रिपोर्ट.

मध्यप्रांतांतील जंगल खात्याच्या सन १९०६—०७ च्या रिपोर्टावरून असें दिसतें कीं या वर्षी बावीसहजार चौरसमैल जमीन जंगल खात्याच्या ताब्यांत गेली. तीपैकीं शें. ९० लागवडीस अजीबात मुकली आहे. एकंदर उत्पन्न रु. २४४७५०६ व खर्च रु. १३४३७९० झाला. ह्मणजे सरकारच्या पदरीं अकरा लक्ष रुपये शिल्लक राहण्यासाठीं रयतेचे तेरा लक्ष रुपये खर्च झाले. खर्चाचा बराचसा भाग जंगलांची सुधारणा, व त्यांत दळणवळण ठेवण्याचे मार्ग व जंगलखात्याचे कामाला उपयोगी पडणाऱ्या मजुरांचा संग्रह या कामीं खर्च झाला आहे. जंगलखात्याचे अधिकारी जंगलच्या संरक्षणाचे कामीं किती दक्ष आहेत व जंगल खात्याच्या नियमांचें उल्लंघन होऊं नये ह्मणून न्यायाधीशही किती आतुर आहेत हें पहावयाचें असल्यास या वर्षांतील खटल्यामध्यें शिक्षा झाल्याचें प्रमाण शें. ९८ आहे. येवढेंच पहाणें पुरें आहे. गुन्हेगारांस पुरेशी शिक्षा झालेली नाहीं अशी तक्रार करण्याला जबाबदार अधिकाऱ्यांनीं जागा कां राहूं दिली हें कळत नाहीं. साडेपांच हजार खटल्यांपैकीं पांचहजारांपेक्षांही जास्त खटल्यांत खरे आरोपी सांपडून त्यांच्यापासून दंडखंड घेऊन जंगल खात्यानें आपली नुकसान भरून घेण्यांत कसूर केली नाहीं. पण पांचशे खटल्यांत गुन्हेगारांचा पत्ताच लागला नाहीं; हें लोकांचें नशीब ह्मणावें किंवा जंगलच्या अधिकाऱ्यांची कर्तबगारी ह्मणावी तें समजत नाहीं. गुरांपासून जंगलाचें संरक्षण कसें केलें याची माहिती रिपोर्टांत दिली आहे पण जंगल मुलूक असतां त्याचे आधारानें गुरांचें संरक्षण कसें होत आहे याचा खुलासा समाधान कारक नाहीं. यावर्षीं १९६४२० चौरस मैल जंगलांत ४६४५६६७ गुरे चरत असून वनचराईबद्दल जंगलखात्याला रु. १००५२९८ उत्पन्न झालें. बाळाघाट येथें एप्रिल १९०७ पासून फॉरेस्ट स्कूल सुरू झालें असून तें बांधण्याचे कामीं रु. १०००० खर्च झाले आहेत. जंगलाला आग लावण्यासंबंधाच्या गुन्ह्यांतील आरोपी बिनचूक ठरविण्यांत आणि त्यावर गुन्ह्याची शाबिती करण्याचे कामांत जंगल खात्याचे अधिकारी बहुधा टेकीस येत असतात. गुन्हा घडत आहे व तो अमुक माणसांचे खेरीज दुसऱ्याचे हातून होणें शक्य नाहीं असें धडधडीत दिसत असूनही जंगलचे अधिकाऱ्यांस कांहीं करतां येत नाहीं. अशा स्थितींत गुन्हा रजिस्टरांत दाखल करून शाबीत ना शाबीताचे सव्य अपसव्य करीत बसण्यापेक्षां पक्या खात्री खेरीज गुन्हा रजिस्टरावर घेतला जाऊं नये अशी प्रांतिक सरकारची इच्छा दिसते ती बरीच सोईची व कामाच्या दृष्टीनें फायद्याची होईल.

---

## विलायती धोत्र्याचा एक उपयोग

( ले. एक शेतकीचा पदवीधर. )

दिवसानुदिवस हिंदुस्थानांतून गळीताच्या धान्यांची निर्यात वाढत्याच प्रमाणावर जात आहे ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. त्यांतच अवर्षणांची भर पडत असल्या कारणानें हिंदुस्थानांतील गळीतांच्या धान्यांचें उत्पन्नही कमी होत आहे. अशा स्थितींत हिंदुस्थानांत तेलाचे भाव सारखे चढत जात आहेत यांत आश्चर्य तें कोणतें? परंतु आतां आश्चर्यचकित होऊन स्वस्थ बसण्याची वेळ नाहीं. आपल्याला शक्य त्या उपायांनीं ही स्थिती आपण सुधारली पाहिजे. आपल्याकडे तेलाचा जो हा दुष्काळ पडत चालला आहे तो थांबविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. हे प्रयत्न दोन प्रकारें करतां येणें शक्य आहे. एक ही परदेशांतील निर्यात कमी करणें आणि दुसरें तेल गाळण्याच्या उपयोगी पडतील अशीं नवीन साधनें शोधून काढणें या पैकीं पहिला मार्ग जास्त महत्वाचा आहे हें सांगणें नकोच तथापि दुसऱ्याही मार्गानें आपणें थोडें बहुत कार्य होण्यासारखें आहे आपल्या देशांत अद्याप अशीं कित्येक झाडें रानोमाळ उगवत आहेत कीं त्यांचें बीं गळिताचे कामी आपल्यास उपयोगी पडेल. अशा प्रकारच्या झाडांत विलायती धोत्र्याचा प्रमुखत्वानें उल्लेख करतां येईल.

विलायती धोत्रा ( यालाच कित्येक नुसतें 'विलायत' असें ह्मणतात ) हें झाड बहुतेकांनीं पाहिलेंच असेल. रब्बीचें पीक काढून घेतल्यावर पुष्कळ शेतांतून याचें प्रचंड पीक पसरतें. याचीं पिवळ्या फुलांनीं आच्छादलेलीं हिरवीं गार झुडपें लांबून फार सुंदर दिसतात. याला धोत्र्यासारखेंच काटेरी बोंडे येतात आणि त्यांत मोहरीसारखें काळें बीं असतें. याचें पाश्चात्य शास्त्रीय नांव Argemone Maxicana असें असून त्याला इंग्रजींत Maxiean Poppy किंवा Gamboge thitle ह्मणतात. वनस्पति शास्त्रवेत्त्यांच्या मतें या झाडाचें मुळस्थान जमेका व कॅरिबिन बेटें व मेक्सिको हें आहे. तेथून स्पानियर्ड लोकांनीं प्रथम तें युरोपांत आणिलें आणि त्याला Ficodel inferno ( ह्मणजे पाताळांतलें उंबर ) असें नांव दिलें. हिंदुस्थानांत तें सुमारें तीनशे वर्षांपूर्वी याच लोकांनीं आणिलें असावें असा अंदाज आहे. आतां हें झाड सर्व प्रांतांत पसरून हिमालयांत ९००० फुटापर्यंत गेलें आहे. हें कोणत्याही हवेंत आणि साधारणतः कोणत्याहि जमीनींत उगवतें. कांहीं कांहीं प्रांतांत तर शेतकऱ्यांना याचा इतका त्रास झालेला आहे कीं याचें निर्मूलन कसें होतें या विवंचनेंत ते आहेत १८९९ सालीं सिंध प्रांतांतील कांहीं जंगलांतून या झाडाचा इतर झाडांना अतिशय उपद्रव होऊं लागल्यामुळें जंगल खात्यानें त्याचा नाश करण्याची पुष्कळ खटपट केली.

अशा या झाडाचा कांहीं उपयोग करतां आल्यास फार फायदा होईल हें उघड आहे. याचा औषधी कामीं होणारा उपयोग आपल्याकडे पुष्कळ दिवसापासून माहीत आहे. ऊन लागून जो मस्तक शूळ उत्पन्न होतो त्यावर याच्या तेलाचा हकीम लोक पुष्कळ उपयोग करतात. तसेंच त्रासदायक व चिघळणारी बेंदें, खरूज नायटे, आणि साधारणतः त्वचेचें रोग यांवरही याचा उपयोग होतो. याचें बीं वांतिकारक आणि सारक आहे. याचें तेल १ पासून ३० थेंबापर्यंत घेतलें असतां चांगलें सारक ह्मणून उपयोगी पडतें. जास्त घेतल्यास अपाय करतें. ताज्या तेलाचा उपयोग जून तेलापेक्षां जास्त त्वरित होतो. एकंदरींत याचा उपयोग एरंडेल सारखाच आहे; परंतु हें मोठ्या प्रमाणांत पुरें हा एक याच्यांत फायदा आहे. याचे बीं जास्त प्रमाणांत पोटांत गेल्यास विषारी परिणाम होतो असा अनुभव आहे. सन १८७८ सालीं अशा तऱ्हेची एक गोष्ट मुंबईंत घडलेली आहे. गोड्या तेलांत या बियाचे तेल मिसळून पोटांत गेल्यामुळें कित्येक लोक जुलाब व वांत्या होऊन आजारी पडले कोणत्याहि तेलांत या तेलाचें मिश्रण आहे कीं काय हें ओळखण्याची एक युक्ती आहे अशा मिश्रणांत थोडेंसें शुद्ध नैत्रिक असिड टाकलें असतां गर्द नारिंगी-तांबडा रंग येतो. याचे तेल औषधाशिवाय इतर कामींही उपयोगी पडण्यासारखें आहे. कोंकणांत पुष्कळ ठिकाणीं याचें तेल जाळतात. हें तेल लांकडाला रोगण देण्याचे कामीं चांगलें उपयोगी पडतें दक्षिण अमेरिकेंत अशा तऱ्हेचा या तेलाचा पुष्कळ उपयोग करितात. हें तेल वाळतें आणि लांकडाला चांगली झिलई देतें. याच्या तेलांत थोडा आंबटपणा असल्यामुळें लांकडाला कीड किंवा उधई लागत नाहीं याचा साबण तयार करण्याच्या कामीं उपयोग होण्यासारखा आहे. हें विषारी असून चवीला वाईट असल्यामुळें खाण्याचे कामीं मुळींच उपयोगी नाहीं याची पेंडही गुरांच्या उपयोगी पडणार नाहीं. तथापि वारनिश ह्मणून आणि जळण्याकरितां या तेलाचा चांगला उपयोग करतां येईल, पेंड खताचे कामीं चांगली उपयोगी पडेल.

बियांत तेलाचें प्रमाण ३५ पासून ३८ टक्के आहे आपल्या साध्या घाण्यानीं २५ पासून २८ टक्के पर्यंत तेल काढतां येतें. इतर गळितांच्या मानानें हें प्रमाण फारसें वाईट नाहीं. याची पैदास सर्वत्र होण्यासारखी असल्यामुळें याला किंमतहि फार पडणार नाहीं. साधारणतः १॥ रु. ला एक मण ( साडेबारा शेर ) या प्रमाणें हें पुष्कळ ठिकाणीं मिळतें. परंतु याला बाजारांत खप नसल्यामुळें कोणी गोळा करून फारसें बाजारांत आणित नाहींत. तथापि कांही उद्योगी गृहस्थांनीं खटपट केल्यास हा एक चांगला धंदा होणार आहे. इकडे आमच्या देश बांधवांचें लक्ष जाईल काय?

---

## खात्री करणारीं प्रमाणें पाहिजेत!

बंगालची विभागणी व तीवरून उत्पन्न झालेली चळवळ या संबंधाचा प्रश्न नेहमीं ताजा ठेवण्याच्या कामीं सर हेन्री कॉटन हे जितके पुढें आहेत तितकेंच मि. मोर्ले हे ठराविक पवित्र्यावरून एक इंचभरही मागें न हटण्याचा निश्चय करून बसले आहेत. विभागणीच्या एकंदर प्रकरणाचा सांगोपांग तपास करून बंगाल प्रांत गव्हर्नर व कौन्सिल यांच्या अंमलाखालीं येईल अशी तजवीज सुचविण्यासाठीं एक बादशाही कमिशन नेमण्याची विनंति नुकतीच सर हेनरी कॉटन यांना मि. मोर्ले यांनीं केली. मि. मोर्ले अलीकडे टाळाटाळीचीं उत्तरें देण्यांत तरबेज झालेलेच आहेत. याही प्रसंगीं आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें उत्तर दिलें. राजेसाहेबांच्या प्रधानमंडळानें स्वतःच्या जबाबदारीवरच ज्याचा निकाल लावावयाचा अशा प्रकारचा प्रस्तुतचा प्रश्न आहे याची आठवण मि. मोर्ले यांनीं आपल्या जबाबांत शब्दशः करून दिली. मि. मोर्ले स्वतः प्रधानमंडळांतील एक सभासद आहेतच. पण त्यांनीं आपल्या गळ्यांत घोरपड अडकवून न घेतां एकंदर प्रधानमंडळाच्या मागें दडण्याची खाशी तोड दिली! प्रधानमंडळांत हे सांगतील तें प्रमाण आणि ह्मणतील ती पूर्वदिशा असा प्रकार हिंदुस्थानासंबंधानें असावयाचा हें आतांच्या काळाचें हिंदुस्थानांतीलदेखील एखादें पोर सांगेल. सर हेन्री कॉटन यांचे अर्थात् या उत्तरानें समाधान झालें नाहीं; किंबहुना अशी उडवाउडवी करून मुद्दा दडपण्याचा मि. मोर्ले यांचा प्रयत्न सिद्धीस जाऊं देण्यास ते तयार नव्हते. नवीन कांहीं प्रमाणें पुढें आलीं तर या प्रकरणाचा पुनः विचार करूं असें आश्वासन माजी मुख्य प्रधान सर हेन्री कॅंबेल बॅनरमन यांनीं दिलें होतें त्याची आठवण देऊन तसें करण्याची आपली इच्छा आहे किंवा नाहीं असें स्पष्टपणें विचारलें. पण मेंचट झालेले मि. मोर्ले अशा सरळ प्रश्नाला थोडेच बधतात. ते आश्वासन अद्यापि पुरें करण्यास आह्मी तयार आहोंच असें पुनः त्यांचें ह्मणणें आहेच. ते मागतात तशा प्रकारचा पुरावा व तशीं प्रमाणें आपण लवकरच पार्लमेंटापुढें सादर करणार आहोंत अशी नोटीस सर हेन्री कॉटन यांनीं दिली आहे. याही नोटीशीचा परिणाम काय होणार तें ठरलेलेंच आहे. निजलेल्यास जागें करतां येईल; पण जागा असून निजलेल्याचें सोंग आणणारास सामोपचारानें उठून कसा बसवितां येणार?

---

## नसती उठाठेव कशाला?

मद्रासच्या कायदेकौन्सिलांत ना. श्रीनिवासराव यांनीं सद्यस्थितीला अनुलक्षून जे उद्गार काढले ते जरा जास्त विचारपूर्वक काढले असते तर बरें झालें असतें. 'पोरकट, विक्षिप्त, सारासारविचारशून्य व भयंकर' हीं विशेषणें त्यांनीं सरसकट कोणत्या मतांना लावलीं आहेत हें समजणें जरी कठीण नाहीं, तरी त्या मतांच्या संबंधानें आपण कोणता कार्यभाग साधणार व तो कसा साधणार या विषयीं ना. श्रीनिवासराव यांना स्वतःलाच विशेषसा भरंवसा वाटत नसावा असें दिसतें. 'पोरकट मतांना' समाजांत थारा मिळत नाहीं हें ते कबूल करतात; आणि त्या मतांसंबंधानें लोकांत अनुकूलता उत्पन्न होऊं नये ह्मणून विचारी ह्मणविणाऱ्यांनीं स्वतःच्या हिंमतीवर अद्याप कांहीं केलेलें नाहीं असा त्यांनीं कबुलीजबाब दिला आहे. मग समाजांतील 'जबाबदार' ह्मणविणाऱ्यांना जीं मतें पसंत नाहींत किंवा समाजास मुद्दां जीं रुचत नाहींत त्यांच्या प्रतिकारासाठीं

समाजांतील श्रेष्ठांचें वजन पुरेसें नाहीं, त्या करितां सरकारच्या नैतिक पाठबळाची जरूर आहे असें कसें ह्मणतां येईल हें निदान आह्मांस तरी समजत नाहीं. सारासारविचारशून्य व भयंकर मतांपासून होणारे दुष्परिणाम सरकारच्या पाठबळावांचून टळावयाचे नाहींत असें ह्मणण्यापूर्वी ना. श्रीनिवासराव यांच्यासारख्यांनीं जर कांहींच केलें नाहीं तर समाजांतील या 'जबाबदार' ह्मणविणाऱ्यांच्या जबाबदारीचा उपयोग काय? 'राजकीय प्रगतीविषयीं अधिक शहाणपणाच्या कल्पना लोकांपुढें मांडण्याचा प्रयत्न 'जबाबदार पुढाऱ्यांकडून होणार' असल्याचें आश्वासन ना. श्रीनिवासराव यांनीं दिलें आहे. पण या कामीं सरकारचें पाठबळ मागतांना त्यांनीं स्वतःलाच पेचांत अडकून घेतलें आहे त्याची वाट काय! सरकार मदत करणार नाहीं तर जबाबदारांकडून कांहीं होणार नाहीं, उलट त्यांच्यामध्येंही निराशा उत्पन्न होईल असें ते ह्मणाले. जबाबदारामध्यें निराशा उत्पन्न होईल ती कोणासंबंधानें याचा खुलासा झाला असतां तर सध्यांच्या संदिग्धतेमुळें त्यांच्या उक्तीचा जो अर्थ करतां येत आहे त्याला जागा उरली नसती. ज्या दत्ताला हे भितात त्यांतच हे शिरणार असा जर अर्थ असेल तर सध्यांच्या लोकांना 'पोरकट, विक्षिप्त सारासरविचारशून्य, इत्यादि विशेषणें कां लावावींत? अशा विचारांचा उगम निराशेंतून आहे तर मग दुसऱ्यांनीं ते स्वीकारण्यापूर्वीं त्यांची निराशा झालेली नव्हती असें ह्मणण्यास ना. श्रीनिवासराव यांच्यापाशीं काय पुरावा आहे?

## संमेलन

यंदांचें वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाजाचें वार्षिक संमलेन पूर्व संकेताअन्वयें गेल्या शुक्रवारीं व शनिवारीं कै. शेट मुलजी जेठा यांच्या बंगल्यावर भरलें होतें. अध्यक्ष रा. गणेश नागेश सहस्त्रबुद्धे वकील एलिचपूर हे होते. वार्षिक मामुली प्रमाणे यंदाचा हा समारंभ फार चांगला झाला. एकंदर मित्र मंडळी ३०० वर जमलेली होती. अलिकडे ही संस्था यापुढें चालवावी किंवा नाहीं या संबंधानें तिच्या चालकामध्ये वादविवाद पडलेला आहे. याच वादाला अनुलक्षून शनिवार सायंकाळीं रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांनीं सुश्राव्य व्याख्यान दिलें. विद्यार्थी दशा सुटल्यानंतर पुन्हा त्या त्या वेळच्या मंडळीच्या भेटी व्हाव्यात, पुन्हा दोन दिवस आनंदानें हासण्यांत खेळण्यांत घालवावेत व अशा आनंदाच्या प्रसंगांत जी थोडी कां होईना पण उपयुक्त अशीं कार्यें विवेचनद्वारा करितां येतील तीं सहजरित्या करण्यांत यावीं असा हेतु हें संमेलन स्थापण्याचा आहे. या स्थळीं आनंदाच्या व करमणुकीच्या गोष्टी चालूं असतांना विद्यार्थी दशेंतल्या प्रेमाच्या परिपोष करावयाचा आहे. पूर्वील प्रेमबंधनें नव्या सांच्यांत घालून अधिक दृढतर व्हावींत असा संकेत मुळचा आहे आणि या संकेतान्वयें लोभवृद्धि होईल अशाच गोष्टी सर्वांनीं तनमनधन अर्पण करून केल्या पाहिजेत. ही संस्था ह्मणजे प्रेमाचीं मूळस्थानें होत आणि येथील आनंदवृत्तीनें दोन दिवस प्रत्येक जण प्रेमरसांत जितका अधिकाधिक तल्लीन होईल तितकी या संस्थेची अधिकाधिक भरभराटी होत जाईल. प्रेमरज्जू एकत्र करण्यासाठीं ही संस्था आहे आणि याच दृष्टीनें यंदा दोन तीनशेवर लोक जमले ही त्या अंतर्वर्ती प्रेमाची खुण होय. अध्यक्षांनीं एलिचपूर येथील आगकाडीच्या कारखान्याची माहिती सप्रयोग करून दिली. ही माहिती मनोरंजक असून यांत्रिक कले मध्यें विश्वकर्म्याची कृती कशी ओतप्रोत भरली आहे याचें दिग्दर्शन अध्यक्षांनीं आपल्या संभाषणांत चांगल्या प्रकारें केलें. कांहीं दांड, पट्टे, बोथाटी वगैरे खेळही खेळून दाखविण्यांत आले. एकंदरीनें सर्व मंडळी प्रेमोत्साहानें वागली आणि कोठेंही सभ्याचाराचा किंवा शिष्टसंप्रदायाचा परिपाठ तोडण्यांत आला नाहीं. ही गोष्ट आह्मी मुद्दाम नमुद करितों आणि तसेंच समाजातील बहुविध पेषांच्या लोकांच्या सोयी लक्षांत घेऊन वादग्रस्त विषय–विशेषतः राजकीय विषय सभेच्या वादविवादामध्यें न येऊं देण्याविषयीं अत्यंत खबरदारी घेण्यांत आली होती. यंदाचें संमेलन अकोल्यास भरविण्या संबंधानें रा. माधव गोपाळ शिरसाळकर वकील यांनीं आग्रह धरला होता आणि त्यांनीं तें कार्य मोठ्या नेटानें इतर मंडळीच्या मदतीनें चांगलें सिद्धीस नेलें हें त्यांस भूषणावह होय.

## लोक जागृती

जन समुहामध्यें प्रस्तुतच्या चळवळीसंबंधानें जागृती उत्पन्न करावी, लोकांना भावी मार्ग इषद् इषद् दाखवून द्यावा आणि लोकांची प्रवृत्ति उन्नतीकडे होत जाईल असे सद्विचार लोकापुढें मांडावे एवढ्यासाठीं रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांनीं जणूं काय विडाच उचलला आहे. त्यांनीं आपला आयुष्यक्रम असा बदलून सोडला आहे कीं पूर्वीचे खापर्डे आणि प्रस्तुतचे खापर्डे यांच्या मध्यें जमीन अस्मानाचें अंतर दृष्टीस पडतें. सार्वजनिक कार्यासंबंधीं त्यांचा उत्साह, त्यांची आस्था व धिमेपणा हीं वर्णनीय आहेत. त्यांच्या कल्पना इतक्या पालटून गेल्या आहेत कीं त्यांची या वयांतील वीरश्री पाहून मोठा आनंद वाटतो. लोकसेवा ही त्यांच्या हृदयांत अगदीं खेळती आहे. या आठवड्यांत ते आकोटकडे जाऊन आले. तेथें पांच पांच सहा सहा हजार लोकांच्या सभा दोन तीन दिवस भरत असत. त्यांचें अलौकिक वक्तृत्व त्यांच्या स्वीकृत कार्याला अत्यंत उपकारक आहे. त्यांच्या भाषणानें श्रोतृजन तल्लीन होऊन जातो इतकेंच नाहीं तर मोठमोठे राजकीय सिद्धांतही ते अत्यंत सुलभ रीतीनें लोकांस समजाऊन देतात. आकोटास त्यांच्या कार्याला मोठेंच यश आलें आणि पूर्वीं कधी एवढे मोठे जनसमाज भरले नसतील असें अपूर्व समाज त्यांच्या व्याख्यानानिमित्त तीन दिवस आकोटास भरत होते यांच्या संभाषणाची लोकांस इतकी गोडी लागली आहे कीं जो तो हें संभाषण ऐकून स्वतःस पुनीत मानी ह्या आकोटच्या सफरीमध्यें उमरावतीच्या शाळेकरितां त्यांनीं सुमार तीन हजार रुपये वर्गणी गोळा केली आहे.

## नवा शोध

( सर्व व्यापी इथरचें साम्राज्य )

इथर हें एक प्रवाही द्रव्य आहे. हें सर्वत्र व सर्व पदार्थ गत आहे. कोणतीही रासायनिक क्रिया इथर शिवाय होऊं शकत नाहीं. सर्व प्राणशक्तीचें इथर मूल स्थान आहे. इथरलाच प्राण वायु ह्मणतात कांकीं त्याच्याच शक्तीमुळें प्राणी सृष्टी व वनस्पतीची सृष्टी इथरमय आहे. पृथ्वी, आप, तेज हीं माहाभूतें देखील इथरमय आहेत. आणि ह्मणूनच तीं विद्यमान स्थितींत दृग्गोचर होतात. प्रवाही द्रव्यें व वायूरूपीं द्रव्यें यांच्या सूक्ष्म परिमाणूची जी घटना होते ती इथर मुळें होते. इथर कमी झाली ह्मणजे त्या वस्तूंतील प्राणशक्ती नष्ट होऊन ती वस्तु मृत होते ह्मणजे थडच थंड होते. विद्युत, उष्णता आणि इथर हीं एकच प्रवाही भिन्न भिन्न द्रव्यें होत. हें नवें प्रकारचें द्रव्य प्रकाशाच्या तेजानें सामान्य दृष्टीलाही दिसून पडतें. इथर दाखविण्याचा प्रयोग राजश्री फ्रेड्रीक हावे डेन यांनीं गेल्या महिन्यांत लंडन येथें करून दाखविला. या इथरची शक्ती लक्षांत आणली आणि ती आपल्या ताब्यांत आणली ह्मणजे त्यामानानें आपल्या हातीं प्राति विश्वकर्माची क्रिया साध्य होईल. हा नवा शोध ह्मणजे मनुष्य सृष्टाची नवी कल्याण संपदाच होय. हा इथर पदार्थ ह्मणजे पंचप्राण वायूच्या अंतर्गत असलें आदितत्व होय.

## सत्संग

( रा. टिळक यांचें अकोल्यास भावी आगमन )

चालूं महिन्याच्या अखेरीला धुळ्याच्या प्रांतिक परिषदेचें काम आटोपून राजश्री टिळक व आणखी कांहीं सभ्य गृहस्थ आकोल्यास ता. ३० रोजीं येणार आहेत आणि या सन्मान्य मंडळींचा मुक्काम येथें २-३ दिवस होईल. प्रस्तुतच्या राजकीय चळवळीला आमच्या प्रांतांत सोज्वल स्वरूप यावें, इकडच्या भागांतील नेमस्त व जहाल या पक्षप्रतिपक्षांचें युद्ध बंद करावें आणि राजकीय प्रगतीला सरकारची अनुकूलता होता होईल तितकी साध्य करून घ्यावी या हेतु त्र्यींकडे दृष्टी देऊन राजश्री टिळक प्रभृति मंडळीच्या भेटीचा सुयोग घडवून आणण्यांत आला आहे. सार्वजनिक कार्यामध्यें ज्यांनीं आपलीं आयुष्यें वेंचलीं आहेत आणि आपल्या सत्कृतींनीं आपल्या देशास ऋणी करून ठेवलें आहे अशा पैकीं राजश्री टिळका सारखी मंडळी अग्रपूजेला सत्पात्र होत पुढील अंकीं आह्मी सविस्तर प्रोग्राम प्रसिद्ध करूं पण गांवोगांवच्या व दूरदूरच्या लोकांनां आकोल्यास येतां यावें ह्मणून आह्मी ही दहा दिवसांची अगाऊ सूचना दिली आहे. शिव जयन्तीचा उत्सवहि तेव्हांच होईल.

## वऱ्हाडवृत्त.

रा. रा. बिडन इन्सपेक्टर ऑफ स्कूल्स नागपूर यांस तीन महिन्याची हक्काची रजा मिळाली असून त्यांच्या रजेंत रा. निजामुद्दीन अहमद डेप्युटी इन्सपेक्टर हिंदुस्थाजी शाळा वऱ्हाड यांस इन्सपेक्टर नेमण्यांत आलें.

बेंच म्यॅजिस्ट्रेट—वाशीम तालुका, यवतमाळ जिल्हा आणि चांदूर तालुका यांच्या साठीं अनररी म्यॅजिस्टेटचीं तीन बेंच स्थापित करण्यांत आलीं आहेत. आणि ह्यांच्याकडे अनुक्रमें वाशिम तालुका, यवतमाळ जिल्हा व चांदूर तालुका यांच्या परिसीमेंतील तिसरा वर्ग म्यॅजिस्ट्रेटचे खटले चालतील. या नवीन सन्मान्य म्यॅजिस्टेटांची नामावली अशी.–

वाशिम तालुका

रा. रा. लक्ष्मण त्रिंबक देशपांडे रिसोड
बिहारीलाल बागडेसावकार रिसोड
पंढरीदास फकीरदास पाटील कवठा

यवतमाळ जिल्हा.

रा. रा. जी. व्ही. द्रवीड
ब. रा. लांडगे
जे. ए. रॉडरीक
ए. जी देशपांडे
वाय् डी देशमुख

चांदूर तालुका.

रा. रा. शेठ फतेलाल शालिग्राम
शेठ मागचंद जयरामदास
इब्राईम भाई मुल्ला इस्मायलजी
गणपत कृष्ण देशमुख
सदाशिव बाळकृष्ण पाटील
गुलाब हुसेन खेरुमिया

इंडियन इंडस्ट्रीयल कॉन्फरन्सच्या वार्षिक खर्चासाटीं दहाहजार रुपये पाहिजे आहेत. या रकमेची वाटणी करितांना वऱ्हाडावर ५०० रुपये बसले आहेत. आणि त्या पैकी आकोल्याच्या वाटणीला ५० रुपये आले आहेत ही वर्गणी वसूल करण्याकरितां रावसाहेब देवराव विनायक यांनीं यादी फिरवण्याचें काम कालपासून सुरूं केलें आहे.

**अजब गोष्ट**—यवतमाळ कडील पोलिस इन्स्पेक्टर रा० देवीदास पं। यांनीं एका डाक्याच्या प्रकरणांत असें बाहेर काढलें कीं बंजारी लोकांच्या बायका व पुरुष चोरलेले दागिने फार विलक्षण रितीनें लपवून ठेवतात. ही रीत अशी कीं सोन्या चांदीचे मोत्याचे दागिने पोटामध्यें लावून ठेवतात. इतर अन्न जसें आपण गिळतों तसें ते गिळून टाकतात. आणि त्यांच्या जवळील कांहीं औषधानें ते पोटांत गिळलेले पदार्थ पुन्हा बाहेर काढून देतात. हें औषध ह्मणजे बोरकूट होय. या युक्ती पुढें मात्र शर्थ झाली.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १००।– |
| सोनें | | २४॥= |
| चांदी | | ७१ |
| जवस | | १३६ |
| जवारी | ८२ — | ८९ |
| गहूं काठे | ६॥ | १४० |
| बनशी | ७॥ | १५० |
| तेल | | ७॥= |
| सरकी | | ११॥ |
| तुप | | १० |
| कापूस | | ९२ |

आमचें पेटंट यंत्र लोकांना पसंत आहे.



मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस— म. न. वि. वि. तुम्ही कृपाकरून पाठविलेलें कडबा कापण्याचें यंत्र सुरक्षित पोचलें. त्यानें कडबा फारच चांगला कापला जातो. सदरहु यंत्र इकडील लोकांना फारच पसंत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्याच मागण्या आपणाकडे येतील. त्या मानानें किंमत ( रु. १०।१० ) ही फारच कमी ठेवलेली आहे. कळावें ही विनंती ता. ४-२-०८

सही

जहागीरदार सीप रीया । श्रीमंत नानसाहेब काल ( ग्वाल्हेर ) ∫ फाळके दस्तरदार

नं. क. ३२

---

नहि सत्यात् परोधर्म

# येवल्याचे पितांबर व पैठण्या

आम्ही येवले येथें तयार होणारे पितांबर, पैठण्या व खण वगैरे माल बाहेरगांवीं पाठवित असतो. माल खात्रीबंद माफक दरानें व योग्य अडतीनें पाठऊं. माल रोखीनें अगर व्हे. पी. नें पाठविला जाईल. माल स्वस्त, सुबक व वक्तशीर पाठविल्याबद्दल आम्हास शेकडों पत्रें आलीं आहेत.

पत्ताः—

श्रीनिवास बाळकृष्ण होले जनरल

नं. ७२ मर्चंट व कमिशन एजंट येवले.

---

# जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.

स्थापना सन १९०७

भांडवल एक लक्ष रुपये.

प्रत्येक भाग २५ रुपयाचा याप्रमाणें एकंदर भाग ४०००.

भागीदारानें भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबद्दल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रक्कम प्रत्येक महिन्याला रु. ५ प्रमाणें पुरी करून दिली पाहिजे.

सदर्हू कंपनीचें मेमोरँडम् व आर्टिकल्स ऑफ आसोसिएशन आकोला येथें सदर कंपनीचें आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टसच्या प्रती सदर्हू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील.

बोर्डाच्या हुकूमावरून


पी. सी. जोगळेकर आणि कंपनी म्या. एजंटस्

नं. २३

---

दोन घडयाळें एकदम घेणाऱ्यास पोस्ट खर्च माफ.

गजकर्णाच्या २४ शिशया घेणाऱ्यास रा. सिस्टम घडयाळ बक्षीस सखळी मुद्दां दर शिशीस ।.



रासकोप सिस्टम किं. रु. ३। स्वदेशी पेटेंट वाच किं. रु. ५। सहा हिरे वाली रु. ४। आठ दिवसाच्या कीलीचें खिसातील घडयाळ रु. १४ सोलजर वाच मजबुत रु. ५। स्वदेशी सेकंड वाली रु ६ पोस्टखर्च ।-

क. नुरा आणि कं.

मुंबई पोस्ट न. ९

नं. ४७

---

त्वरा करा ! त्वरा करा?

## बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्यां वेळांत आणि उत्तम रीतिनें शिकविले जाईल दर माफक असून वक्तशिर काम केलें जाईल आजवर ५०० शे माणसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. बाहेर गांवच्या लोकांकडून रेलेभाडे व जेवण खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

जेकब.

सायकल टीचर.

पत्ताः----

अहमद अली कासमजी बोहरा

न ४८ इं. ७ आकोला ( शहर )

---

## नोटीस

वेशमी गोविंदा वल्द पांडू सोनार रा. पेठ औरंगपूर ता. आकोट जि. आकोला यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही माझा लेक नथू वल्द मुकाजी याजपासून मौजे मनात्री येथील शेत निशाणी बागाचें शेत एक रु. १४०० यास विकत घेतले असें समजतें. करितां या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं नथू हा उमर वर्षे १७ चा अज्ञान असून शिवाय तो गैर वलीगुफ कणारा आहे. त्याची चाल चांगली नाहीं करितां तुम्ही त्याजबरोबर शेताचा सवदा केला असल्यास तो रद असून आम्हास कबूल नाहीं तरी तुम्ही त्याजबरोबर कोणतेही प्रकारचा व्यवहार करूं नये. कळावें. ता. १३।४।०८ इ.

सह्या

तुळशी मर्द मुकाजी कुणबी नि. बांगडी

कृष्णाजी वल्द लक्ष्मण द. खु.

सखी मर्द किसन कुणबी नि. बांगडी

नं ख. २८

---

## जाहिरत

तमाम शेट सहूकार व इतर लोक यांस— खालीं सही करणार याजकडून कळविण्यात येतें कीं नंबर १ चा मुलगा नामे नथू वल्द मुकाजी व नंबर २ चा पुतण्या व नंबर ३ चा दीर नथू हा उमर वर्षे १७ चा अज्ञान असून शिवाय त्याची वर्तणूक चांगली नसून तो हलकट लोकांचे संगतीमुळे घरांतील स्थावर जंगम जिनगी आणि शेती वगैरेची नुकसानी करणार असें त्याचे वर्तनावरून दिसतें, करितां जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं सदर्हू नथू याजपासून कोणी साहू सावकार अगर इतर कोणीही कोणताही व्यवहार करूं नये. व गहाण खरेदी अगर दुसरे कोणतेही प्रकारचा लेख करून घेऊं नये घेतल्यास तो या नोटिशीनें रद समजला जाईल. करितां जाहिर केलें आहे. कळावें ता. १३।४।०८ इ.

सह्या

तुळशी मर्द मुकाजी नि. बांगडी

कृष्णाजी वल्द लक्ष्मण द. खु.

सखी मर्द किसन नि० बांगडी

नं. ख. २९

---

## नोटीस

सर्वत्र लोकांस खालीं सह्या करणारे रा० फतेखेडी ता० मेहकर जि० बुलडाणा यांजकडून

नोटीस देण्यांत येते कीं तुळसाबाई मर्द पेमसींग जात बुंदेली चमडे राहणार फतेखेडी ता० मेहकर जि० बुलडाणा ही आमचे गोत्रजापैकीं असून नात्यानें चुलती आहे तीचा नवरा मेला असून तिला आमचे शिवाय जवळील कोणी वारस नाहीं. तिचे नवळ व नांवानीं वडिलोपार्जीत कमावलेली स्थावर जंगम जिनगी आहे. व वडिलोपार्जीत व प्रत्यक्ष नवऱ्याचें हातचें कांहीं कर्ज कोणाचें देणें नाहीं. सदर्हू जिनगी म्हणजे स्थावर जिनगीची तिनें विक्री करणें व गहाण ठेवणें सुरु केलें आहे सदर्हू जिनगी गहाण ठेवण्याचा किंवा खरेदी देण्याचा वरील तुळसाबाईस कांहीं अधिकार नाहीं व कारणही नाहीं कारण सदर्हू बाई जवळ तिचे नवऱ्याचे हातची रोकड व दागदागीनें मिळून अंदाजा २००० रुपयाची जिनगी आहे शिवाय तिचे नांवें फतेखेडी येथील ३ तीन नंबर असून त्याचें स्वामीत्व सरकारी सारा जातां १३० रुपयाचें आहे त्यांत तिचा चरितार्थ उत्तम प्रकारें चालून शिवाय बचीतही राहते असें असतां तिजला स्थावर जिनगीची विक्री अगर गहाण ठेवण्याचा अधिकार नसून गाहाण वगैरे ठेवण्याचें कारण नाहीं कारण फक्त अन्नवस्त्रीची मालकीण आहेस व त्या पुरती रोकड उत्पन्नाची बाब पुरेसी आहे करितां स्थावर जिनगी शेतें ३ व घरें वगैरे जि कोणापाशीं गाहाण ठेऊं नये व खरेदी देऊं नये दिल्यास आम्हाला सदर्हू गाहाणखत अगर खरेदीखत कबुल होणार नाहीं व ते खोटें समजतें जाईल तसेंच जो कोणी या ( तुळसाबाई ) जवळून गाहाण अगर खरेदी घेईल त्याचा तो दस्तऐवज खोटा समजला जाईल व तो आम्हाला मुळींच कबुल नाहीं करितां सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं तुळसाबाई जवळून कोणी गाहाण अगर खरेदी घेऊं नये कळावें ता० २४-३-१९०८ इसवी

सह्या

धेनसींग, व रामसींग वल्द रामचंद्रसींग बुंदेली

नं. ख. ३० रा० फतेखेडी

---

## जाहिर नोटीस

विद्यमान सबजज्ज साहेब बहादूर कोर्ट अकोला यांचे कोर्टांतून

सा० स० नंबर १ ( पुन्हाफैल ) सन १९०८

या नोटिशीचे द्वारा सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येते आहे कीं अर्जदार जनाबाई मर्द काशिराम मारवाडी रा. अकोला ता. व जि. मजकूर इनें आपला नवरा काशिराम पुरणमल मारवाडी रा. अकोला हा ता. २०-९-०५ रोजीं मरण पावल्यामुळें मयताचें लोकांकडे येणें असलेलें कर्ज वगैरे रकम रुपये २९८०।४।८ वसूल करण्याकरितां सकसेशन सरटिफीकिट आकट ७ सन १८८९ चे कलम ६ प्रमाणें सरटिफीकीट मिळण्याकरितां दिलेला अर्ज आमचेकडे चौकशी करितां ता. २०-६-०८ रोजीं नेमला आहे तरी सदर्हू बद्दल कोणास कांहीं तक्रारी वगैरे करणें असल्यास त्यांनी आमचे कोर्टांत अकोले येथें वरील तारखेस सकाळीं १० वाजतां हजर व्हावें. सदर्हू तारखेस हजर न झाल्यास पुढें कोणताही सबब ऐकली जाणार नाहीं.

आमच्या सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस दिली असे आज ता० ६-४-१९०८ इसवी

N. G. Sabhedar

Sub Judge AKOLA

नं. ख. ३१

---

## जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येतें कीं माझा नवरा नामे हुरुणखा हा दारूच्या धुंदींत असून वेडा झालेला आहे. त्यास जर कोणी फसवून त्याच्या कडून खरेदी वगैरे घेईल तर तो व्यवहार इस्टेटीला व मला बांधून शकणार नाहीं. कळावें. ता. १२।४।०८

सही

हुरुणखा वल्द इनायतखा बेटा पालनकरणार बायको रेशमबी राहणार पंचगव्हाण नि०

साक्षी

शेखईमाम वल्द बहादर अली

सयद रहिमान वा। सयद मनु रा०

नं. ख. ४० पंचगव्हाण.

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गर्व्हनर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन नामी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोलें यांनी आमची औषधें व रकाईनें हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आह्मास दिले आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शेंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देउनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, वीर्यपुष्टीकर, धैर्य स्तंभक, रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सूर्ण माक्षीक मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शारीरिक सुदृढ राखणारी धातू ती शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होते ती दोषी असेल तर शरीरांत नाना प्रकारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारीरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पहिजे त्या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होते. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नमेह व इतर धातुगत उष्णतेचे इंद्रियशिथलता, कडकी गर्मीसंबंधी मुलांचे विकार मुत्रसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, हात पाय मुत्रमार्ग. व नेत्र याचा दाह, क्षय, पंडुरोग, घशाची खर, नीणज्वर, आम्रमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. व कंठरोग, मधूमेह सुनाट पामा, मुष्टीमैथूनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त यांची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपक होते व मनास उत्साह देतात. दुध व अन्न पचु लागते त्यांना उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल अनेक सर्टिफिकीटें मिळाली आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें, यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर किंतीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपान खडीसाखर किंवा व्ही. पीनें खालील पत्यावर मिळतील.

दरः-एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु. १२५ गो ३ रु १६५ गो. ४ रु. २७५ गो० ६ रु. ५५० गो० रु.

२ अपूर्व नेत्रांजनः-यानें पडळ, साहर, फुल, खुपऱ्या, चिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सव विकार त्वरीत बरें होउन दृष्टी तीव्र व पंढगार राहते. या रोगांस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः--कोणताही नवा जुना परमा व उजन्य दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुयस्त्राव, रक्तस्त्राव, इत्यादि विकार पहिल्या सात दिवसांत जातात तिडिक एका पटकेंत जाते असें रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ १। मार बाटलीस रु. २

४ दंतबलवर्धक चूर्ण:-दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे होतात

५ विंचूचें विषः-औषध लावतांच उतरतें मुळीं ३ तो. ८ आणे

६ गजकर्णः-खरूज, नायटे वगैरे सर्व विकार दिवसांत जातात रु. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः-औषध घेतांच कशाहि प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुनः उलटत नाहीत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषधः-आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरें झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रह तयावर गोळ्या गाठीस लावण, वात चढू नये ह्मणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणि खर्च सो

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल अनेक सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषधें यथोक्त रसायनें भस्म धातु. गुटिका, आसव, तेलें, सुगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खडीसाखर टपाल खर्च वेगळा पडेल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतीचें मन कळविल्यास रोगाचो निदान चिकीत्सा कळवूं.

आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामुळें एकानें जो धंदा सुरू केला त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजें त्यानें करावें आमचे जाहिरातीस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिठें वगैरे मात्रांतून तो पराकाष्ठेस येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपापली थोरवी गाण्याचा ज्याचा तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांच्या कारखाना आज सतत १५।२० वर्षे अव्याहत सुरू असून ज्यांच्या औषधास बोलें डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधीनें कित्यकवेळी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रितीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याणकारीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उन्नतावस्थेस आणण्याची खटपट करूं. आजपर्यंत आमचे खटपटीस यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्य बंधूस ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्याकरितां आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरावें, एकवार अनुभव घेतल्यानें खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकूण व त्वरित आरोग्य येईल. नं. १

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य**

**पत्ताः—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.**


## Oriental Government Security Life Assurance Company Limited

*Established* 1874.

*HEAD OFFICE*—**BOMAY**

Chief Agency for C. P. Berar and Khandesh

*Head—Quarters—Nagpur C. P.*

## FUNDS EXCEED TWO CORRES AND SEVENTY FIVE LAKHS

Claims paid for over two Crores

**IMMEDIATE SETTEL MENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating heir clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amou a givensum, but it is essential to know how such Funds are invested— if in miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising hrough decease of assured lives, and endowment policies matu

*Government Officers, Professional men, Tradesmen and others,* b employing a portion of their annual income or profits in effecting life po once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is not over Life being so uncertain, the sooner a man makes is upmind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained pdilcation to—

M. De SOUZA.
CHIEF AEGNT
Nagpur.

N. 2


## अत्यंत आगत्यची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरू असुन प्रत्येक

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखाण्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

## जाहिरखबर

सर्वत्र सावकार व इतर व्यापारी आणि देवघेव करणारे गांवचे अगर परगांवचे यास कळविण्यांत येतें कीं, मला तीन मुलें नामें—संपत व दिपचंद आणि रूपचंद असें असोन एकाच कुटुंबांत राहत आहेत. हल्लीं यांचा मी जी स्वसंपादित इस्टेट मिळविली आहे याजवर अगर इचे भागावर कोणतेच प्रकारचा हक्क नाहीं, असें असून यांच्यापैकीं रूपचंद हा उनाड लोकांचे संगतीस लागून वाटेल त्याचें कर्ज काढतो, आणि वाटेल त्यास वाटेल त्या रीतीचा दस्तऐवज लिहून देतो, हें याचे करणें कायद्याविरुद्ध आहे. लोकांनीं त्याच्याशीं व्यवहार करून फसूं नये यासाठीं कळवितों कीं, याच्याशीं कोणीही कोणतेच प्रकारचा व्यवहार करूं नये. केल्यास त्याची जोखीम मजवर अगर माझ्या मिळकतीवर राहणार नाहीं. मुलांना इस्टेट वाटून देणें अगर न देणें हें माझ्या खुशीवर आहे. माझा मनोदय निराळा आहे ह्मणून माझे पुत्राशीं व्यवहार केलेल्या इसमांनी, आपली रक्कम गमावूं नये करितां मी आपलें कर्तव्य बजाविलें आहे. यापूर्वी अगर या उपर जो देईल त्याची जबाबदारी स्वतः त्याचे जातीवर राहील. माझे ऐकण्यांत असें आलें आहे कीं, शेखदुला वल्लद वजीरमहमद मुक्काम बिस्वाचांदूर यांनीं त्याचे पासून रक्कम रुपये ३०० तीनशाचा दस्तऐवज लिहून घेतला परंतु त्याजला भरणा दिला नाहीं. हें चांगलेंच झालें. यापुढें न दिला जाईल अशी तजवीज केल्यास त्यांचाच फायदा आहे. कळावें [illegible]-४-१९०८ इसवी दस्तूर गोविंद बापुजी पी० रा० आकोला

सही

उदेभान वल्लद गंगाजी पाटील

नं ख. ३२ दस्तूर खुद्द

---

## नोटीस

बेशमी— हरचंद वल्लद सिताराम रंगारी राहणार कुरणखेड यांस—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझ्या मालकीचें घर तुह्मी सोमवार ६-४-०८ रोजीं फोडून पाडून टाकले व मी हरकत घेत असतां मारावयाला उठला. तुमच्या व माझ्या बापाची वाटणी झालेली आहे व वाटणींत तें घर माझ्या हिश्यावर आलेलें आहे. ह्मणून नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं आपला माझे घरावर कोणतेच प्रकारचा हक्क नाहीं. तर तुह्मी आतां घर बांधणें बंद करावें व आपण घर पाडले मुळें माझें नुकसान झालें तेंही ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे भरून द्यावें. व आपण जेव्हां घर फाडले तेव्हां माझ्या घरांत माझ्या मालकीचा दागदागीना व इतर सर्व सामान अंदाजा रुपये २[illegible] होता तोही आपण नेला. तर मुदतींत आणून द्यावा. असें जर मुदतींत केलें नाहीं तर मला योग्य कोर्टांत दाद मागावी लागेल व मग आपणा जवळून कोर्ट वगैरे सर्व खर्च भरून घेईन. आपण मला व माझी चुलती माझें पालन करणारी हीला [illegible]र पाडण्यास हरकत करीत असतांना मारले या बद्दल कोर्टांत दाद मागितलीच आहे. कळावें ता. ९-४-१९०८ इसवी

सही

जानकीराम वल्लद गोपाळसा अज्ञान

पालन करणार चुलती ध्रुपताबाई

जवजे रूपचंद रा कुरणखेड

निशाणी खुद्द

नं. ख. ३३

---

## नोटीस

सर्वत्र सावकार व्यापारी आणि इतर लोकांस खालीं सही करणार सारजो मर्द रावजी वल्लद सोनाजी रहाणार कुंभरी आणि ठुनकी मर्द शिवराम वल्लद सूर्यभान रहाणार कान्हेरी ता० अकोला याजकडून कळविण्यांत येते कीं बायजी मर्द इष्णाजी वल्लद बाळाजी रहाणार तांदळी बुजरुख ता० बाळापूर जि० अकोला ही आमची सावत्र आई आहे आणि मयत इष्णाजी वल्लद बळाजी हा आमचा बाप होता आणि तो खालीं लिहिलेली स्थावर मिळकत मागे ठेवून अजमासे तीन वर्षे झालीं मरण पावला आहे. मिळकतीचें वर्णन मौजे तांदळी बुजरुक येथील शेत सर्वे नं० ९१ व ३ आणि घर १ यामधील निमे हिस्सा आमचे कबज्यांत असून आह्मी ते रुंजाजी व पुंजाजी वल्लद नागोजी यांना विकले आहे आणि शेत सर्वे नंबर मौजे दादुलगांवचें परंतु आह्मी असें ऐकतों कीं सदर्हू आमची आई ही तीचे नवऱ्याची सर्व मिळकत अफरातफर करूं लागली आहे. आणि ती सर्व मिळकत गहाण ठेविली आहे आणि खरेदी देण्याचा तिचा विचार आहे. परंतु ती मिळकत गहाण ठेवण्याचा अगर विकण्याचा तिला कांहींच हक्क नाहीं ह्मणून कोणीही तिचे पासून सदर्हू मिळकत गहाण अगर खरेदी घेऊं नये जो कोणी घेईल तर त्याचे रकमेची जबाबदारी सदर्हू मिळकतीवर रहाणार नाहीं. हो नोटीस ता० ११।४।०८ इ०

सही

सारजी मर्द रावजी दस्तुर

ठिकाराम वल्लद पुंजाजी द. खु.

ठुनकी मर्द शिवराम दस्तुर

टिकाराम वल्लद पुंजाजी. द. खु.

नं. ख. ३४

---

## नोटीस

नोटीस बेशमी -- माधोजी वल्लद भगवानजी सुतार रहाणार सावरे मंचनपूर पैकीं सावरे तालुके अकोट यांस:—

खालीं सही करणार यांजकडून कळविलें जातें कीं संमत १९५६ सालचे दुष्काळांत तुह्मास खंडीभर जवारी खाण्यास देतो, तुह्मी आपली जमीन मला खरेदी द्यावी, माल झाल्यावर तुमची जमीन तुह्मास वापस देऊं. मी आपली जवारी घेईन अशी थाप देऊन आमची चेंडकापुरची जमीन तुह्मी आमचे जवळून खरेदी घेतली किमतीचे रुपये ३०० घरीं घेतले असें रजिस्टर साहेबांसमोर सांगितलें पुढें घरीं आल्यावर तुह्मी आह्मास जवारी किंवा रुपये दिले नाहींत सबब तुह्मास नोटीस व आजपर्यंत पुष्कळ लोकांकडून समजाविलें पण आपण ऐकत नाहीं सबब कळविले जातें कीं

नोटीस पावल्या पासून ८ दिवसांचे आंत आमची जमीन व ८ वर्षांचे स्वामीत्वाबद्दल रुपये आह्मास ६०० देऊन पावती घेऊन जावी असें न केल्यास कोर्टांत दावा करून खर्चा सुद्धां रकम भरून घेतली जाईल कळावें

सही

आकाजी व जैयराम उभता बधु

वल्द बाळाजी राहणार आकोट

नं. ख. ३५ निशाणी रेघ

## नोटीस

मामूजी वल्द शेकोजी काळे कुणबी रा० कामरे ता० मुर्तिजापूर यांसः-

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे डोंगरगांव येथील शेत सर्वे नंबर २२ रजिष्टर पट्टेखतांवरून सन १३२० पर्यंत वहितीस आह्मी केलेल्या पैकीं अद्याप ४ वर्षे भरण्याची असून सदर्हू शेत तुह्मी दुसऱ्यास विकल्यामुळें चार वर्षांचे नुकसान अजमास रुपये दोन हजार झालें. तारीख २४-६-०७ च्या आकोला वऱ्हाड-समाचारातून तुह्मी मजला जी नोटीस दिली ती अगदीं खोटी आहे. ही नोटीस पाव-ल्यापासून ८ दिवसांत सदर्हू रकम आह्मास देऊन आमची पावती घ्यावी तसें तुमचेकडून मुदतींत न झाल्यास सर्व खर्चासुद्धां सालीम रकम वसूल करण्यास तुमचेवर दिवाणींत दावा करणें भाग पडेल कळावें ता. १५-४-०८ इसवीं

टीपः-- शिवाय विश्वास घात केल्याबद्दल तुमचेवर फौजदारींत काम चालेल.

सही

मटाजी वल्द आकाजी खाटीक

रा. बेलखेड ता. मुर्तिजापूर

द. खु. पोट कामरगाव

नं. ख. ३६

## नोटीस

मे. हरूणखा वल्द इसबखा राहणार पिंपळगांवराजा ता. मलकापूर यांस.—

खालीं सही करणार इजकडून कळवि-ण्यांत येतें कीं तुह्मी लबाड लोकांच्या नादानें व निपेच्या धुंदीनें नेहमीं शुद्धींत नसतां इतकेंच नाहीं तर तुमचे डोकें ठिकाणावर नसल्यामुळें तुमच्या वेड्याच्या लहरींत तुह्माकडून लोक इस्टेटीच्या खरिदी लिहून घेतात असें कळलें. इसबखा जीवंत असतांना तुह्मी विहिरींत उडी टाकली होती तेव्हांपासून जिनगीची व्यवस्था तुमच्या हातून होण्यासारखी नसल्यामुळें मी तुमचाच भाऊ अहमदखा वल्द इसफखा यांच्याकडे जिनगीची व्यवस्था सोंपविली आहे. तुह्माला जिनगी विकण्याची मनाई पूर्वींच केली असूनही जर कोणी तुमच्याशीं व्यवहार करील तर तो कायद्यानें बातल आहे. कळावें. ता० १२-४-१९०८ इ०

सही

रेशमबी मर्द हरुणखा रा. पंचगव्हाण

निशाणी.

साक्षी

१ देवाआपा सखारामआपा वाणी

दुकान पंचगव्हाण द. महमद

२ सेखदाऊत वल्द सेखचांद राहणार

पंचगव्हण निशाणी हातची

नं. ख. ३९ काठी असे

## नोटीस

नोटीस वेशभी— भिकू वल्द मारुती पाटील आ. पा. आई रुखमाबाई मर्द मारुती पाटील मौजे तपोन परगणे रोहिण-खेडे ता० मलकापूर यांस— नोटीशीनें कळवि-णार गणपत एकनाथ देशमुख राहणार हल्लीं कसबे मलकापूर ता० मलकापूर जि० बुलढाणें यांस कळविण्यांत येते कीं तुमचे वडील मारुती पाटील हे वारले असून त्यांनीं आह्मांस मौजे खामखेडे येथील सर्वे नंबर ९३ एकर गुंठे ३९८३४ आकार रुपये ९९ यातील १९ एकर जमिनींत बगीच्या करण्याचा मता आह्मास दिला असून त्याप्रमाणें गुदस्त सालीं आह्मी कांहीं झाडें लावलीं आहेत व बाकी लावणें राहिलेलीं सर्व झाडें लावण्या करितां त्याच ठिकाणीं तयार आहेत. सदर्हू ठराव १२ वर्षांचा आहे ह्मणजे निमे माल तुह्मी घ्यावा व निमे आह्मी घेऊं. असा करार ठरला आहे. तुह्मी जर करारनाम्याचे शर्तीविरुद्ध वागले तर आह्मांस तुमचेवर कोर्टांत जावे लागेल व खर्चाबद्दल तुह्मी जबाबदार राहाल. लावण्यास तयार असलेलीं व विक्रीस तयार असलेलीं झाडें पाणी नसल्यानें व सर्व तऱ्हेनें त्यांची खराबी होत आहे. त्याबद्दलही तुह्मी जबाबदार आहां सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं वरील नंबर भिकू पाटील वल्द मारुती पाटील यानीं विक्रीस काढल्याचें आह्मी ऐकतों. वरून कळवितों कीं ह्या निमे जामि-नीवर १२ वर्षे निमे माल घेण्याचा आमचा हक्क आहे तो विकत घेणारास कबुल नसल्यास त्यानीं विकत घेऊं नये. घेतल्यास तेही जबाबदार राहील असें समजावें. ता० २५।३।०८ इ०

सही

गणपतराव एकनाथ देशमुख

दस्तुर अमृत गोविंद मलकापूर

नं. ख. ३७

## नोटीस

तीर्थरूप रा. रा. लक्ष्मणसिंग शामसिंग रजपूत राहणार बाळापूर

यांसः—

साष्टांग नमस्कार वि. वि. आपणाज-वळ जी जिनगी आहे ती सर्व वडिलो-पार्जित असून तिच्यावर माझी मालकी आहे. आपणास तिच्या संबंधानें मृत्युपत्र वगैरे करण्याचा अधिकार नाहीं. आणि आपण समोंवार जो इतर मुलांचा परिवार आहे तो परिवार कायद्यानें बेवारस असून त्यांचा जिनगीवर कांहींच हक्क पोचत नाहीं. आपला वृद्धापकाळ असल्यामुळें व आपल्या बुद्धीला भ्रम होत असल्यामुळें ही मुद्दाम सूचना केली आहे. या उपर जी कोणी शेती, घर वगैरे जिनगी संबंधानें तुह्माशीं व्यवहार करील त्याचा तो व्यवहार कायद्यानें बातल समजण्यांत येईल. ता० १५।४।०८

सही

कीसनासींग लक्ष्मणसिंग रजपूत

नं. ख. ३८ द० खु०

आमचें पेटंट यंत्र लोकांना पंसत आहे.



मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस— स्ना. न. वि. वि. तुह्मी कृपाकरून पाठविलेलें कडबा कापण्याचें यंत्र सुरक्षित पोंचलें. त्यानें कडबा फारच चांगला कापला जातो. सदरहु यंत्र इकडील लोकांना फारच पसंत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्याच मागण्या आपणाकडे येतील. त्या मानाने किंमत ( रु. १०॥१० ) ही फारच कमी ठेवलेली आहे. कळावें ही विनंती ता. ४-२-०८

सही

जहागीरदार सीप रीया काल ( ग्वालेर ) } श्रीमंत नानसाहेब फाळके दफ्तरदार

नं. क. ३२

---

नहि सत्यात् परोधर्म

## येवल्याचे पितांबर व पैठण्या

आह्मी येवले येथें तयार होणारे पितांबर, पैठण्या व खण वगैरे माल बाहेरगांवीं पाठवित असतो. माल खात्रीबंद माफक दरानें व योग्य [illegible] पाठऊं. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जाईल. माल स्वस्त, सुबक व वक्तशीर पाठविल्याबद्दल आह्मास शेंकडों पत्रें आलीं आहेत.

पत्ताः—

श्रीनिवास बाळकृष्ण होले जनरल मर्चंट व कामिशन एजंट येवले.

नं. ७२

---

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.

स्थापना सन १९०७

भांडवल एक लक्ष रुपये.

प्रत्येक भाग २५ रुपयाचा

याप्रमाणें एकंदर भाग ४०००.

भागीदारानें भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबद्दल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रकम प्रत्येक महिन्यांला रु. ५ प्रमाणें पुरी करून दिली पाहिजे.

सदहू कंपनीचें मेमोरँडम् व आर्टिकल्स ऑफ आसोशिएशन आकोला येथें सदर कंपनीचें आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टसच्या प्रती सदहू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील.

बोर्डाच्या हुकूमावरून

पी. सी. जोगळेकर आणि कंपनी


म्या. एजंटस्

नं. ११

---

दोन घड्याळें एकदम घेणाऱ्यास पोस्ट खर्च माफ.

गजकर्णाच्या २४ शिश्या घेणाऱ्यास रा. सिस्टम घड्याळ बक्षीस सखळी सुधां दर शिशीस ।.



रासकोप सिस्टम किं. रु. ३। स्वदेशी पेटेंट वाच किं. रु. ५। सहा हिरे वाली रु. ४। आठ दिवसाच्या कीलीचे खिशातील घड्याळ रु. १४ सोलजर वाच मजबुत रु. ५। स्वदेशी सेकंड वाली रु. ६ पोस्टखर्च ।-

के. नुरा. आणि कं.

मुंबई पोस्ट न. ९

नं. ४७

---

त्वरा करा ! त्वरा करा?

## बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्यां वेळांत आणि उत्तम रीतिनें शिकविले जाईल दर माफक असून वक्तशिर काम केलें जाईल आजवर ५०० शे माणसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. बाहेर गांवच्या लोकांकडून रेल्वेभाडे व जेवण खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

जेकब.

सायकल टीचर.

पत्ताः----

अहमद अली कासमजी बोहरा

आकोला ( शहर )

नं ४८ ई. ७

---

## देशी दवाखाना

( वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर यांचा

आह्मी आमचा दवाखाना पुन्हा चालू केला आहे. शास्त्रोक्त रीतीनें औषधें तयार केलेलीं असतात. चिकीत्साहि काळजी पूर्वक होत असते हें सर्व श्रुतच आहे. गरजू लोकांनीं अनुभव घेऊंन पाहावा. भस्म, मात्रा, पाक, गुटिका, वगैरे विक्रिस तयार आहेत. गरमी, उपदंश, प्रदर, धुरणी, बाळंतरोग, पंडु इत्यादि कष्टसाध्य रोग फार लवकर दूर होतात.

पत्ता— वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर आकोला येथें शहरांत मुलीचे शाळें जवळ

चैत्रशुध्द प्रतिपदा शके१८३० आको.

नं० ख० १

---

Oriental Government Security Life Assurance Company Limited

*Established 1874.*

*HEAD OFFICE*—**BOMAY**

Chief Agency for C. P. Berar and Khandesh

*Head—Quarters—Nagpur C. P.*

## FUNDS EXCEED TWO CORRES AND SEVENTY FIVE LAKHS

Claims paid for over two Crores

**IMMEDIATE SETTEL MENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating heir clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amou a givensum, but it is essential to know how such Funds are invested— if in miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay n terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising hroh deceaee of assured lives, and endowment policies matu

*Government Officers, Professional men, Tradesmen* and *others*,b empoying a portion of their annual income or profits in effecting llife to once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and amily may be in distress. Life Assurance is a means by which this danger is not over. Life being so uncertain, the sooner a man makes is hupmind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AEGNT
Nagpur.

N. 2

---

## नोटीस

नोटीस द्रौपदाबाई भ्रतार भवानराव आणि लळीताबाई भ्रतार संपतराव आंभेरे राहणार उभयता मौजे येकांब प्रगणें सिरपूर ता० वाशीम जिल्हा आकोला यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी माझ्या साक्षांत भावजया आहात. इस्टेट स्थावर जंगम सर्व एकत्र आहे. अलिकडे असें समजतें कीं, तुह्मी स्थावर व जंगम इस्टेटीची अफारातफर करणार आहा असें समजतें तुह्मी अन्नवस्त्राचे मालक आहात. स्थावर व जंगम वगैरे सर्व इस्टेटीवर तुमचा कोणतेही प्रकारे हक्क संबंध नाहीं. तरी तुह्मी कोणतेही प्रकारे स्थावर जंगम इस्टेटीसंबंधानें कांहींएक व्यवस्था करूं नये. व लोकांचें कर्ज तुह्मी काढू नये असें जर तुह्मी वर लिहिलेप्रमाणें वर्तन न केल्यास व इस्टेटीची आफरातफर केल्यास त्याची जबाबदारी तुह्मास व तुमचे पासून घेणारास भरावी लागेल. आणि तो व्यवहार कायदेशीर रद्द समजला जाईल. तुमचे जवळ आनामत ह्मणून रुपये १७० एकशें सत्तर व आंगावरील डागडागीनें सोन्याच्या पुतळ्या ९ मासे नथ ७ मासे बाळ्या ६ मासे व चांदीचे डागिनें ४० तोळे भार याप्रमाणें तुमचे पाशीं ठेविलेले आठ दिवसांत आणून द्यावे. त्याप्रमाणें तुह्मी वर्तन न केल्यास व आफरातफर केल्यास रुपये व डागिनें माझे ताब्यांत देई पावेतो तुमचे अन्नवस्त्र मजकडून बंद करण्यांत येईल. कळावें ता. १६-४-०८ इ.

सही

गणपतराव वल्लद खंडेराव आंभेरे

द. खुद

नं. ख. ५३

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखा[illegible] नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

## नोटीस

रा० रा० किसनसींग वल्दद सरदारसींग रजपुत राहणार पातुर शेखबाबु तालुके बाळापूर यांसः—

खालीं सही करणार यांनकडून नोटीस देण्यांत येते कीं मी व शंकरसींग यांनीं जयराम काशीनाथ व शिवरतनसींग या दोन इसमावर मे० सहस्रबुद्धे साहेब यांचे कोर्टात सन १९०६ सालांत फौजदारींत फिर्याद केली होती तिचा निकाल आमचे विरुद्ध झाल्यावरून सदर्हू ठरावावर अपील करण्या करितां ३ कोरे कागदावर माझ्या सह्या करून दिल्या होत्या. शंकरसींग यांच्या सल्यावरून मी तुमच्याशीं एक विचारानें वागलो व सहीचे कोरे कागद तुमच्या स्वाधीन केले. सदर्हू कागदाचा कांहींच उपयोग न पडल्यामुळें तुमचेजवळ तसेंच पडून राहिले. मी पुष्कळवेळां सदर्हू सह्या केलेले कागद तुमचे जवळ मागितले असतां तुम्ही दिले नाहींत करितां या नोटिशीनें कळवितो कीं सदर्हू कागदाचा तुम्ही व तुमचे बंधु शंकरसींग यांनीं कोणत्याही प्रकारें माझे संमतीवांचून त्याचा उपयोग करूं नये व सदर्हू कागद मला ही नोटीस पावल्या पासून ४ दिवसांत परत देऊन माझी पावती घ्यावी असें न कल्यास योग्य तजवीज केली जाईल कळावें. ता० १९।४। ८ इ०

सही

महादू वल्दद पुंजाजी रहाणार पातुर

नं. ख. ४५ द० खु०

## नोटीस

रा. रा. मंगणीराम टिकमदास मारवाडी साहु दुकान अडगांव यांसः—

नोटिस देणार गणेशदास गुलाबचंद साहुदुकान तेल्हारा यांचेकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमचे कडे आमची रकम घेणें आहे त्या बद्दल आम्ही तुम्हांस पुष्कळ वेळां मागणी केली आणि पत्रें पाठविलीं शिपाई पाठविले परंतु तुम्ही तीकडे कांहींच लक्ष देत नाहीं तर आतां ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत रकम व्याजासुद्धां आणून द्यावी नाहींतर रिती प्रमाणें तजवीज केली जाईल व या नोटिशीचा खर्च तुम्हांस द्यावा लागेल ही नोटीस दिली सही आज तारीख १४-४-०८

सही

गणेशदास गुलाबचंद त. मु. सिताराम खंडोब्राह्मण रा. तेल्हारा दस्तुर खुद.

नं. ख. ४६

## नोटीस

रा. शेख महिताप वल्दद शेख महिबूब राहणार पाथर्डी ता. अकोट यांस—

नोटीस देणार गणेशदास गुलाबचंद दुकान तेल्हारे यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचेकडे आमची गाहाण खतावरून व चालूं खात्यावरून रकम घेणें आहे त्याबदल तुमचे कडे पुष्कळवेळ मागणी केली परंतु तुम्ही अद्याप रकम पटली नाहीं तर कळवितों कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत आमची रकम व्याजासुद्धां आणून द्यावी नाहीं तर रितीप्रमाणें तजविज केली जाईल. व या नोटीशीचा खर्च तुम्हांस भरून द्यावा लागेल ही नोटीस लीहून दिली सही आज तारीख १४-४-०८

सही

गणेशदास गुलाबचंद त. मु सिताराम खंडो ब्राह्मण राहणार तेल्हारा तालुके अकोट द. खुद

नो. नं. ख. ४७

## नोटीस

नोटीस बेशमी शेखमनु वल्दद शेखपनु देशमूख २ शेख मिठू वल्दद शेखबापु देशमुख ३ बालुसा वल्दद येदूसा वाणी, ४ यादवजी वल्दद हरबाजी हाळी. ५ सिताराम बकाल, हे सर्व पंच राहणार लोहारे ता० बाळापूर यांसः—

खालीं सही करणार ईजकडून नोटीस देण्यांत येते कीं, आज दोन वर्षें झालीं मी आपलें शेत, श्रीमहादेवास बक्षिस दिलें आहे. त्यांत वरील पंच साक्ष आहेत. व त्यांत अशी शर्त लिहिली आहे कीं मी जिवंत आहे तोपर्यंत त्यांतील मला खाण्याकरितां फक्त ६० रुपये द्यावे. असें असून तुम्ही पंचांनीं कबुल केलें आहे तरी त्या शेताचीं दोन पिकें आपण घेतलीं व मजला खाण्याकरितां कांहींच दिलें नाहीं. करितां या नोटिशीनें कळविलें जातें कीं ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसांचे आंत माझे दोन सालाचे खावटीचे मिळून मिळून १२० रुपये आपलेकडे आहेत ते देऊन टाकावे कारण मला खाण्यास कांहीं नाहीं. मी आजपर्यंत लोकांचें कर्ज काढून खातें तर ते देण्यास मजजवळ पैसे नाहीं. व माझे फार हाल आहेत. तर वरील पैसे माझे मजला द्यावे न द्याल तर मी कोर्टांत फिर्याद करून रुपये वसूल करीन. व यापुढें तुम्ही पंच मला मुळींच कबूल नाहींत. कारण मी तें शेत देवाला दिलें असून तुम्ही त्या शेतांतील माल देवाला व मला कांहींच दिला नाहीं. करितां ते शेत माझे स्वाधीन करावें कारण तुमच्या हातून कांहींच व्यवस्था होत नाहीं. करितां पंच म्हणून मी तुम्हास या नोटिशीनें रद्द केले आहे. कळावें ता० १७-४-१९०८ इ०

सही

कोंडाई मर्द बाळु पटोकार रा० लोहारे नि. हातची

नं. ख. ४८ बांगडी

## नोटीस

बेशमी अंबादास वल्दद उकर्डा मानकर व निंबाजी वल्दद उकर्डा मानकार राहणार जवळखुर्द ता० खामगांव यांसः—

खालीं सही करणार ईजकडून या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, मी तुम्हास कार्तिक शुद्ध १२ शके १८२५ रोजीं बक्षिसपत्र लिहून दिलें होतें. त्यांत मला मी मरे पर्यंत अन्नवस्त्र पुरवण्याचा तुम्ही करार केला होता व त्याप्रमाणें एक वर्षभर तुम्ही मला अन्नवस्त्र दिलेंही. पण आज दोन वर्षें झालीं तुम्ही मला अन्नवस्त्र पुरविलें नाहीं. त्या संबंधानें आपणास पुष्कळ वेळां बजाविले असतां आपण त्यास न जुमानतां मला खाण्यास दिलें नाहीं. बरें असो. मला एकंदर ४ मुली व एक सखा पुतण्या आहेत. असें असतां तुम्ही मला बरेंच दिवस आपल्या गांवीं व आपल्या जवळ ठेऊन घेऊन बक्षीसपत्र सर्वांच्या नावानें सारखें वाटून करतो अशी थाप देऊन मजजवळून आपल्या दोघाच्यांच नांवानें करून घेतलें. मी आशिक्षीत असल्यामुळें मला तुम्ही अशा रीतीनें बक्षीसपत्र लिहून घेतलें असेल असें वाटलें नाहीं पण आतां मला जेव्हां तुम्ही अन्नवस्त्र देईनासे झाल्यामुळें मला बक्षीसपत्राची नक्कल घ्यावी लागली त्यावेळीं मला सर्व गोष्टीचा उलगडा झाला. व आपण मला फसवून व गोडगोड बोलून बक्षीसपत्र लिहून घेतलें करितां या नोटिशीनें तुम्हास असें कळविण्यांत येतें कीं, बक्षीस पत्राच्या शर्तीप्रमाणें आपण मला दोन वर्षें पर्यंत अन्नवस्त्र न दिल्यामुळें आतां बक्षीसपत्र रद्द असे. आतां कोणतेही प्रकारें बक्षीस पत्रांतील हिश्यावर आपला कोणतेच प्रकारचा हक्क नाहीं. आणखी मला असेंही समजतें कीं तुम्ही बक्षीस पत्रांतील इस्टेट गहाण दिली आहे. तर त्याजवर गहाणाचा कोणतेच प्रकारें बोजा नाहीं. आपण मला अशा प्रकारें फसवून बक्षीसपत्र लिहून घेतलें याजबद्दल मी योग्य कोर्टांत दाद मागणारच आहे. व दोन वर्षाचें मला अन्नवस्त्राचे २०० रुपये खर्च आला तो ही नोटीस पावले पासून आठ दिवसाचे आंत मजजवळ आणून द्यावा व माझी पावती घ्यावी असें जर मुदतींत केलें नाहीं तर मला कोर्ट मार्फत व्यवस्था करावी लागेल व मग सर्व खर्च ह्या नोटिशीच्या खर्चासुद्धां आपणाकडून घेतला जाईल. व या नोटिशीनें आपल्याला दिलेलें बक्षीसपत्र बातल केलें आहे. आतां मी तीं शेतें वहीतीस लावणार आहे. तर तुम्ही कोणत्याही प्रकारें मी ज्या इसमाला शेतें लावून काढीन त्याला हरकत करूं नये व इतक्या उपर जर तुम्ही शेतें वाहण्यास हरकत कराल तर तुमच्यावर फौजदारी केली जाईल. कळावें. ता० २०।४।०८

सही

झाऊ मर्द संभु झाडोकार स. जानोरी (निपाणी) नि. खुद

दस्तुर—बिंदालाल कालीदीन परदेशी

नं. ख. ४९ द. खुद

## नोटीस

सर्वत्र लोकांस जाहिर नोटिशीनें कळविलें जातें कीं, माझ्या भावजया द्रोपताबाई भ्रतार भवानराव व लळीताबाई भ्रतार संपतराव आंभोरे उभयतां राहणार मौजे येकांब प्रगणें सिरपूर तालुका वाशीम जि. आकोला ह्या उभयताही माझ्या एकत्र कुटुंबातील असून अन्नवस्त्र त्या मजकडून घेत आहेत. आतां असें समजलें कीं त्या स्थावर जंगम इस्टेटीची अफरातफर करणार आहेत. त्यावरून ह्या जाहिर नोटिशीनें सर्वत्र लोकांस कळविलें जातें कीं, सदर्हू द्रोपदाबाई आणि लळीताबाई यांचेशीं कोणीही कोणते प्रकारे स्थावर आणि जंगम इस्टेटीसंबंधानें व्यवहार करूं नये. व त्यांना कर्ज देऊं नये याप्रमाणें कोणी केल्यास तो बोजा स्थावर व जंगम इस्टेटीवर व मजवर लागूं होणार नाहीं. तो व्यवहार रद्द होईल. ता. १६-४-०८ इ.

सही

गणपतराव खंडेराव आंभोरे

नं ख. ५० द. खुद

## जाहीर नोटीस

विठोबा वल्दद शिदाजी तेली भीसे राहणार गोठखेड तालुका व जिल्हा आकोला यासी खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमची बहीण नामे भुली ईला तुम्ही लग्न झालेल्या दिवसा पासून टाकून दिले ते आजपर्यंत आम्ही पोशित आहो करितां आतां तुम्ही तुमचे खीस घेऊन जावें तुम्ही तीजला पंधरा दिवसांचें आंत न नेल्यास कायद्या प्रमाणें तजविज केल्या जाईल कळावें. ता० २०-४-०८ इ०

सही

पुंजाजी वल्दद सखाराम तेली

नं. ख. ५१ रहाणार बटवाडी बुजरूख

## नोटीस

सर्व शेट सावकार व इतर यांस खालीं सही करणार इजकडून जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं कसबे कासार खेड तालुका बाळापूर येथील शेत सर्वे नंबर ७२ एकर ८८२१ व घर विटेबंदी अशी स्थावर मिळकत वडिलोपार्जित आहे माझा नवरा आदितवारपुरी हा अजमास १। वर्ष झालें मयत झाला माझे पोटी १ मुलगी व २ मुली आहेत. सदर्हू शेताचे खातें माझा सासरा नारायणपुरी याचें नांवे होतें तो मयत झाल्यावर माझा नवरा यात्रेस गेल्या मागे खाते माझा हरकिसनपुरी नारायणपुरी यावे नावें झालें आहे. सदर्हू शेत माझा नवरा व हरकिसनपुरी या दोघाचे हिशास आलें असून आजपावेतों समाईक वाहून उत्पन्न वाटून घेत आलो. सदर्हू शेत मारुती माळी व राघोजी माळी कासारखेडकर यांस पांच वर्ष दर साली ६० रुपये स्वामित्वानें माझे नवऱ्यानें लावून काढलें आहे. सदर्हु शेतावर व घरावर किसनपुरी याची एकट्याची मालकी मुळींच नाहीं. शेतांत माझा निमे हिस्सा असून घरांत एक त्रितिआंश हिस्सा आहे व माझा लहान दीर पुंडलिक याचा सदर्हु शेतांत कांहीं हिस्सा नसून त्यास दुसरें शेत दिलेलें आहे. तरी या जाहीर नोटिशीनें कळवितें कीं माझा दीर किसनपुरी याजपासून सदरहु शेतांतील व घरांतील माझा हिस्सा गहाण खरीदी कोणी लिहून घेऊं नये. घेतल्यास त्या रकमेचा बोजा माझे हिश्यावर राहणार नाहीं या उपर जो घेईल तो नुकसानीस पात्र होईल. कळावें. ता. १९-४-०८ इ.

सही

भामाबाई मर्द आदितवारपुरी गोसावी राहणार कासारखेड तालुका बाळापूर इच्या हातची

नं० ख० ५२ नि० बांगडी.

... दडवून, आणणें, एकराष्ट्रीयत्वाची ... करणें, सार्वजनिक कामें करण्याच्या इच्छेला उत्तेजन देणें आणि देशाच्या मानासिक, नैतिक, सांपत्तिक व औद्योगिक अंगांची अभिवृद्धि करणें व त्यांना सुव्यस्थित स्वरूप देणें, या गोष्टींचा समावेश होतो. राष्ट्रीय सभेचे हे हेतु आणि तिचें कामकाज चालविण्या संबंधाचे ठरलेले नियम याबद्दलची आपली मान्यता प्रत्येक प्रतिनिधीनें लेखी प्रदर्शित केली पाहिजे असें ठरलें आहे. या कमिटीच्या अध्यक्षांनीं व सेक्रेटरींनीं निरनिराळ्या प्रांतिक कमिट्यांच्या सल्यानें येत्या नाताळांत राष्ट्रीय सभेची बैठक भरविण्याची व्यवस्था करावी असा ठराव झाला आहे. राज्यकारभारांत लोकांचा जास्त प्रवेश होण्यासंबंधानें सरकारदरबारीं राष्ट्रीय सभेकडून जें कांहीं कामकाज चालेल त्यांत अल्पसंख्याक जातींच्या हितसंबंधाची जपणूक योग्य तितकी केली जाईल हें राष्ट्रीय सभेचें तत्व आहे असें नमूद करण्यांत आलें आहे. अलाहबाद येथें भरलेल्या कमिटींत ज्या कांहीं मुद्याच्या गोष्टी निश्चित झाल्या त्यांतील ठळक ठळक वर दिलेल्या आहेत. या ठरतांना कोणी तरी एकानें आपल्या मर्जीस येईल ती सूचना केली व इतरांनीं नुसत्या माना तुकावल्या असा भाग नाहीं. राष्ट्राच्या भावी कार्य क्रमाच्या निश्चयाचा महत्वाचा प्रसंग असल्यामुळें अशा सर्वांनीं जितका जास्त खल निर्भिडपणें व स्पष्टपणें व्हावयास पाहिजे तितका तो झाला हें सर्वतोपरी बरें झालें. पण सुरतेस ज्या ... कॉन्व्हेन्शन भरविण्यांत आलें किंवा ज्या हेतूनें कमिटी नेमण्यांत आली त्या संबंधानें शेवटीं एकवाक्यता झाली आहे. हें कोणाच्याही लक्षांत येईल. कांहीं कारणावरून ज्यांना नुसती टवाळीच करण्याचा मार्ग मोकळा असेल त्यांनीं पाहिजे तर ही गोष्ट ध्यानांत आली नाहींसें दाखवावें.

---

## पुढील कार्यक्रम

कॉन्व्हेन्शन कमिटींत जें कांहीं ठरलें त्यासंबंधानें सर्व बाजूंनीं मतैक्य असणें शक्य नाहीं. वास्तविक दरवर्षी राष्ट्रीयसभा भरत असतांना तिच्या जागीं कॉन्व्हेन्शन कडून राष्ट्रीयसभेची नियमबद्धरचना होण्याचा प्रसंग यावा हें चमत्कारिक तर खरेंच! पण नेमानेम टळत नाहीं. या प्रसंगीं पुनः सुरतेचा वाद उकरून काढण्याची आमची इच्छा नाहीं. तथापि कॉन्व्हेन्शनच्या कामाचा विचार करतांना सूरतेचा बखेडा स्मरणांतून नाहींसा होत नाहीं, याला इलाज नाहीं. सुरतेस राष्ट्रीयसभेचें काम तहकूब राहिलें नसतें तर कॉन्व्हेन्शनचें नांवही निघालें नसतें. राष्ट्रीयसभेच्या कामांत व्यत्यय उत्पन्न झाल्यामुळें असा व्यत्यय येण्यासारखी स्थिति असत्य होऊन सुरतेस आलेल्या राष्ट्रीयसभेच्या प्रतिनिधींच्या बहुतानें कॉन्व्हेन्शन कमिटीची नेमणूक झाली आणि त्या कमिटीवर पूर्ण विश्वास ठेवून राष्ट्रीयसभेची नियमबद्धरचना करविण्याचें ठरलें यांत कांहीं गैर झालें असल्यास त्याचा दोष निदान कन्व्हेन्शनमध्यें सामील झालेल्या लोकांकडे येईल असें आम्हांस वाटत नाहीं. कॉन्व्हेन्शन कमिटीनें प्रथम राष्ट्रीयसभेच्या नियमबद्धरचनेचें काम हातीं घेतलें हें परिस्थित्यनुरूप योग्यच झालें असें म्हणावयास हरकत नाहीं. राष्ट्रीय सभेसारख्या लोकमतनिदर्शक सभांचें काम सर्वस्वी पुढाऱ्यांवरील विश्वासाच्या आणि भिन्नमताच्या लोकांमधील परस्पर आदराच्या व सहिष्णुतेच्या आधारावर चालवें हें सर्वाशीं श्रेयस्कर आहे. पण या दोन्ही आधारांतील जोम कमी होत जाऊन त्याचे जागीं अन्य कांहीं कृत्रिम बंधनाचें ठाणें बसविण्याची वेळ आली म्हणजे पुढचा मार्ग पूर्वींच्या इतका निष्कंटक असा राहावयाचा नाहीं हें ठरलेलें आहे. गेलीं कित्येक वर्षें राष्ट्रीय सभेची रचना नियमबद्ध असली पाहिजे अशी ओरड चालू होती. राष्ट्रीयसभेच्या उत्पादकांविषयीं व जुन्या पुरस्कर्त्यांविषयीं ज्यांच्या मनांत बेभरंवसा निदान अश्रद्धा उत्पन्न झाली होती अशा कांहीं लोकांकडून ही तक्रार प्रथम पुढें आली. पण वर सांगितलेल्या कारणासाठीं नियमबंधनाचा प्रसंग आजवर पुढें ढकलण्यांत आला. सुरतेच्या बखेड्याचें कारण कांहीं असो पण राष्ट्रीयसभेचे कांहीं ठराविक नियम असते तर तिचें काम अजीबात बंद पडलें असतें किंवा नाहीं या विषयीं थोडीशी शंका आहे. कोणतेही मनुष्यनिर्मित नियम विकारवश मनुष्याकडून मोडले जाणार नाहींत असें नाहीं. पण आपल्याकडून नियम केले असते तर या इच्छेप्रमाणें कन्व्हेन्शनच्या कारभारांत जास्त कांहीं नाहीं. असें मानलें तर या पुढें वादाला कांहीं जागा उरेल असें वाटत नाहीं. नियमांची रचना होतांना कांहीं तरी घातकी ... तरीच ती आत होईल तर उपयुक्त होणार नाहीं असें नाहीं; पण यापुढें तरी हें प्रकरण पुन: विरळून प्रथम पदापासून वाद घालीत बसणाराला आणि त्याला उत्तर देणाराला दोघांनाही एकबाजूस सारून राष्ट्रीयसभेच्या कार्यास सर्वांनीं एकबुद्धीनें आरंभ करणें आवश्यक आहे.

---

## एक शिक्षण विषयक प्रश्न

हिंदुस्थानांतील शाळांतून देशी भाषांच्या ऐवजी परकी भाषांतून शिक्षण दिलें जातें तसें न करतां जपानांतल्याप्रमाणें तें देशी भाषांतूनच देण्याची तजवीज करण्यास सरकार तयार आहे काय, असा प्रश्न मि० रीस यांनीं विचारला असतां त्याला मि० मोर्ले यांच्याकडून निराशेचेंच उत्तर मिळालें. पण त्यांतल्या त्यांत त्यांनीं मध्यमप्रतीचें बहुतेक शिक्षण देशी भाषांतूनच दिलें जातें असा जबाब देऊन पार्लमेंटांतील सभासदांना चकविण्याचा जो प्रयत्न केला तो मात्र अत्यंत असाध्य होता हायस्कूलांतील वरच्या चार वर्गांत अंकगणीत, भूगोल, हिंदुस्थानचा इतिहास या विषयांचा जो आभ्यासक्रम आहे तो देशी भाषांतून झालेल्या आभ्यासाची नुसती इंग्रजी भाषेंत उजळणी असते ही गोष्ट सर्व विश्रुत आहे. या विषयांचा अभ्यास पुनः इंग्रजींतून करतांना नुसत्या इंग्रजी परिभाषेखेरीज जास्त काय शिकविलें जातें याचा खुलसा करण्यास कोणी पुढें येईल तर फार बरें होईल. मॅट्रिक्युलेशन परिक्षेला कोणती तरी एक प्राचीन भाषा नेमलेली आहे. तिचें शिक्षण देखील सर्कारनें इंग्रजी भाषेंतून दिलं जातें ही गोष्ट विशेषत: ध्यानांत घेण्याजोगी आहे. संस्कृत किंवा पार्शियन या सारख्या प्रौढ भाषांचें व्याकरण शिकवितांना तें जितक्या सोप्या रीतीनें होईल तितकें चांगलें या विषयीं कोठें मतभेद असेल असें निदान आम्हास तरी वाटत नाहीं. पण दुर्दैवानें वस्तुस्थिति अशी आहे कीं संस्कृत भाषेंतील संधी संबंधाचे किंवा इतर व्याकरणसंबंधीं नियम शिकतांना नवशिक्या मुलांना इंग्रजी कठीण शब्दांचे व शब्द समूहांचे अर्थ ध्यानांत ठेवतांना कोण त्रास पडतो याचा अनुभव प्रत्येक सुशिक्षितास असलेच. शास्त्रीय विषयांची तीच स्थिति आहे. बीजगणित व विशेषत: भूमिति या विषयांत देखील देशी भाषांचे द्वारें सुरवात झाल्यास या विषयांचीं मूलतत्वें व त्यांचें व्यावहारिक महत्व विद्यार्थ्यांना जास्त चांगल्या रीतीनें समजेल असें आम्हास वाटतें. आतां राहिला इंग्लडचा इतिहास. तो हिंदुस्थानाच्या इतिहासा प्रमाणें पूर्वी एकदां झालेला नसतो खरा, पण सध्यां या विषयाकरितां जीं पुस्तकें नेमलीं जातात त्यांतील कठीण भाषेच्या व क्लिष्ट प्रतिपादन पद्धतीच्या मानानें इतिहासाचें वास्तविक जेवढें ज्ञान विद्यार्थ्यांच्या जवळ शिल्लक रहातें तेवढें देशी भाषांतून या विषयाचें शिक्षण दिल्यास खास राहिल. जें शिक्षण देशी भाषेंत दिलें जात असतें असें धडधडित खोटें विधान मि० मोर्ले यांनीं केलें आहे त्याची स्थिति अशी आहे! या विषयांवर लिहितांना अकोला हायस्कूलच्या संमेलनाचे वेळीं रा० फडके यांनीं केलेल्या सूचनेचा निर्देश अप्रासंगिक होणार नाहीं. हायस्कूलच्या अभ्यासक्रमांतून कांहीं कांहीं विषय घेणें न घेणें विद्यार्थ्यांच्या पसंतीवर रहावें ही कल्पना अंकगणित, हिंदुस्थानचा इतिहास इयादि विषयांची इंग्रजींतून नुसती घोकपट्टी उजळणी करण्याकडे विद्यार्थ्यांचा जो काळ व्यर्थ जातो त्याला अनुलक्षून नसेल असें नाहीं. आमच्या वऱ्हाडप्रांतांत शिक्षण व्यवसाय केलेली अनुभववृद्ध वयोवृद्ध मंडळी आहेत; त्यांनीं या संबंधांत आपला अभिप्राय प्रकट केल्यास फार उपयुक्त होईल.

---

# वऱ्हाडवृत्त.

हवामान — यंदाचें उन्हाळ्याचें प्रा. प्रखर दिसतें. उन्हाच्या प्रखरतेपेक्षां झळा सोसणाऱ्याच्या वाऱ्यामुळें फार बाधा करितात. प्रस्तुत रोगराई विशेष म्हणण्यासारखी नाहीं पण किरकोळ दुखणी वाढली आहेत. चाऱ्याची महर्गता विशेष आहे.

रा० ग० स्ट्रेसी ए. असि. क. सब डिव्हि जनल म्या० वाशीम यांस तीन महिन्याची हक्काची रजा मिळाली आहे.

## ✓ श्रवण सुख

(सुश्राव्य व्याख्यानांचा महापूर आकोल्याकडे येत आहे.)

येत्या गुरुवारीं राजश्री बाळ गंगाधर टिळक ह्यांचें पहिलें व्याख्यान होईल आणि त्या नंतरचे दोन्ही दिवस शिवजयंतीचा उत्सव व व्याख्यानें ह्यांच्या क्रमामध्यें कसे निघून जातील हें कळणार देखील नाहीं. राजश्री टिळकासारखे थोर गृहस्थ आपल्या नगराला येतात म्हणून त्यांच्या स्वागताच्या गडबडींत देखील राजश्री देसाई प्रभृती मंडळी अगदीं गोंधळून गेली आहेत. हा सुयोग घडवून आणविण्याच्या प्रयत्नाबद्दल राजश्री खापर्डे इत्यादि मंडळीचे नागरिक लोक आभारी आहेत.

✓ व्याख्यान:— रा. रा. मोरेश्वर गोविंद पुरोहित ह्यांनी गेल्या १९ व्या तारखेला स्वदेशीवर व्याख्यान दिलें. ह्यांची विषयाची मांडणी फार सुबोध, भाषा अगदीं साधी आणि विचारही स्वतंत्र असून यांचें व्याख्यान लोकांस फार आवडलें. ह्यांनीं आपल्या स्वीकृत उपदेशाच्या कार्यांकरितां भगवीं वस्त्रें परिधान केलीं आहेत आणि या नवीन कार्याच्या तोलास तोल देण्याइतका यांचा व्यासंग असून बोलण्याची शैली वर्णनीय आहे. कालरोजीं पुन्हा त्यांनीं राजा व प्रजा यांच्यामधील नात्यासंबंधानें आपल्या व्याख्यानांत विवरण केलें. यांचें कौतिक सर्वांस ... असे राजमान्य असतात.

आम्हांस कळविण्यास फार दुःख ... कीं रा० रा० मल्हार खंडेराव चिटनीस बी. ए. एल. एल. बी. वकील उमरावती यांस सातारा जिल्ह्यांत भेटगांव मुक्कामीं एकाएकीं देवाज्ञा झाली ह्यांच्या मृत्युमुळें त्यांच्या वृद्ध पितास, पत्नीस, मुलाबाळांस व इतर आप्त मित्र मंडळीस तर पराकाष्ठेचें दुःख होईलच पण त्यांच्यासारखा सुधारणा प्रिय विद्याव्यासंगी गृहस्थ त्याच्या सत्तेचाळीस अट्ठेचाळीसाव्या वर्षीं कैलासवासी व्हावा हा समाजाचें मोठीच हानी होय. आपला वकीलीचा धंदा संभाळून हे विद्याविवेचनच्या मंदिरांत नेहमीं आपला कालक्षेप करीत. अंतरिक्षांतील चमत्कार म्हणून जें एक छोटें पुस्तक यांनीं जगापुढें आणलें तें त्यांच्या बहुविध व्यासंगाची चांगली साक्ष देतें यांच्या अंगी कवीचा प्रसादही असे. आणि म्हणूनच कित्येक प्रसंगानुरोधानें त्यांनीं केलेलीं रसिक व स्फुट काव्यें ह्यांच्या मानासिक स्फूर्तीची दिशा दाखवितात अलिकडे यांना अध्यात्मकविचा फार नाद लागला होता. आणि ह्या नादामुळेंच ते वकीलीचा व्यवसाय सोडून आपल्या मूळच्या गांवीं राहण्यास गेले होते. लोककल्याणाचीं कार्यें आपल्या हातून घडावीं या उद्देशाला अनुसरून त्यांनीं आपल्या आयुष्याचा सर्वच प्रोग्रामही बदलला होता. पण आकस्मिक अंतकालामुळें हा प्रोग्राम भावी अनुयायाकडे सोपविण्यांत आला ही दुःखाची गोष्ट होय. हे गृहस्थ स्वभावानें फार प्रेमळ मैत्रीला फार योग्य आणि नवीन पिढीस चांगलें वळण लावणारे असे होते. परभु जातीचे सुधारणें करितां यानीं पुष्कळ परिश्रम घेतले आहेत. शिवाजी महाराजांचे चिटणवीस बाळाजी आवजी यांच्या घराण्यांतील हे एक किर्तीमान वंशज होत. वऱ्हाडांत वकीली करण्यास येण्यापुर्वी हे कोल्हापुरास मुनसब होते. आमच्या महाराष्ट्राचें दुर्भाग्यच कीं राजेश्री दादासाहेब चिटणीस सारखे गृहस्थ ऐन देशकार्याच्या उपयोगी पडण्याच्या वेळींच मृत्युंगत होतात.

---

अगदींच कमी दिसतो. पण ना. मि. बेकर यांस ना. गोखले यांच्या प्रतिपादनांतील सत्यता कळून आली नाहीं किंवा ती त्यांना मान्य करवली नाहीं. फडणिशीच्या कामांतील अर्वाचीन पद्धतीवर एक व्याख्यान झोडून त्यांनीं ना. गोखले यांस असें सांगितलें कीं, चालू खर्च चालू उत्पन्नांतूनच भागाला पाहिजे. आरोग्यारक्षणाचें काम चालू खर्चानें असल्यामुळें तें चालू उत्पन्नांतून झालें पाहिजे. अनिश्चित उत्पन्नावर तें अवलंबून ठेवतां येत नाहीं. हें जें अर्वाचीन फडणिशीमधील मुख्य तत्व ना. मि. बेकर यांनीं सांगितलें त्याला अपवादात्मक अशा गोष्टी त्यांनीं तावडतोब सांगून टाकल्या हें बरें झालें; नाहींपेक्षां त्यांचीच तत्वें त्यांच्याच कृतीला नडण्याची वेळ आली होती. ते म्हणाले, अगदीं अनपक्षित अशा मोठ्या शिलकेचा उपयोग वारंवार ज्यावर खर्च करावा लागत नाहीं अशा कामांकडे करणें केव्हां केव्हां फायद्याचें व सोईचें असतें. अशा वेळीं हिंदुस्थान सरकार मुख्य तत्वाला चिटकून बसलें नाहीं. पण अनियमित उत्पन्नावर कायमचें व ज्यावर वारंवार खर्च करावा लागतो असें एखादें लोकोपयोगी काम हातीं घेणें हें योग्य होणार नाहीं. ना. मि. बेकर यांनीं जी वस्तुस्थिति म्हणून धरली आहे ती तशी असती तर त्यांची टीका बरोबर होती. याच त्यांच्या तत्वाच्या दृष्टीनें रेल्वे बांधणी व त्यांची दुरुस्ती या कामाकडे शिलकी रकमेचा विनियोग करण्याच्या पद्धतीचें परीक्षण केलें म्हणजे काय दिसतें तें पहा! रेल्वे बांधणी हा चालू खर्च खास नव्हे. तेव्हां तो चालू उत्पन्नांतून भागविला जाऊं नये. या कामाकडे होणारा पैसा कर्जाऊ रकमेंतून खर्ची पडला पाहिजे. शिलक अनिश्चित स्वरुपाची आहे किंवा नाहीं आणि तिचा उपयोग कर्ज करण्याकडे किंबहुना कर्ज टाळण्याकडे व्हावा किंवा रेल्वे बांधण्याकडे व्हावा हा प्रश्न अगदीं निराळा आहे. चालू उत्पन्नांतून बरीचशी मोठी रक्कम रेल्वे बांधणीवर खर्ची पडत आहे या विषयीं वाद नाहीं. यंदाच्याच वर्षीं सतरा लक्षांचा खर्च रेल्वेबांधण्याकडे करावयाचें ना. मि. बेकर यांनीं ठरविलें आहे. या कृतीचा अर्थ ना. गोखले यांच्या उद्गारांप्रमाणें एवढाच आहे कीं वर्ष सुबत्तेचें असो किंवा महर्गतेचें असो अवश्य त्या पेक्षां शिलक जास्त पडेल इतका वसूल करावयाचा व अशा प्रकारच्या वसुली उत्पन्नांतून रेल्वेसारख्या कामीं भांडवलांत रक्कम गुंतवावयाची. ना. मि. बेकर यांच्या तत्वाशीं ही गोष्ट धडधडित विरुद्ध आहे. या बाबतींत सरकारनें जी पद्धत स्वीकारली आहे ती ना. गोखले यांनीं आरोग्यरक्षक कामांच्या संबंधानें केलेल्या सूचनेच्या सारखीच आहे. शिल्लक चालू उत्पन्नांतूनच रहात असल्यामुळें आरोग्यरक्षणासारख्या चालू खर्चाचे कामीं तिचा अवश्य विनियोग झाला पाहिजे. रेल्वेच्या संबंधांत सरकारची जी कृति चालू आहे तिच्या पुढें ना. मि. बेकर यांची जाडीं जाडीं तत्वें बोंथट होतात आणि आरोग्यरक्षक कामांच्यावेळीं त्यांची धार ना. मि. बेकर यांच्या हातांत तीव्र होते यावरून हा तत्वाचा गडबडगुंडा कसा आहे हें कोणाच्याही ध्यानांत येईल. बरें, ना. मि. गोखले यांनीं आरोग्यरक्षणाच्या संबंधाच्या ज्या तजविजी सुचविल्या आहेत त्या चालू खर्चातील आहेत हें तरी म्हणणें कोठ खरें आहे? रस्त्यांची साफसुफाई, सार्वजनिक आरोग्य इत्यादि गोष्टी चालू खर्चांतील आहेत हें कोणीही कबूल करील. पण आरोग्यासाठीं मोठमोठ्या सुधराईच्या योजना, पाण्याच्या पुरवठ्याच्या मोठ्या प्रमाणावरील तजविजी, हीं कामें सार्वजनिक संस्था किंवा सरकार यांच्याकडून चालू खर्चांतून होतात हें म्हणणें खरें मानतां येईल काय? या कामांवरील खर्च रेल्वेवरील खर्चाच्या वर्गांतलाच नव्हे काय? शिलकेचा विनियोग रेल्वेकडे झाल्यानें अर्वाचिन सुधारलेल्या तत्वांना जर बाध येत नाहीं तर आरोग्यरक्षक कामांकडे झाल्यानें तो येण्याचें काय कारण? मोठमोठ्या रेल्वेच्या कामांवर ज्या प्रमाणें सालोसाल मोठा खर्च करावा लागत नाहीं तशीच स्थिति आरोग्यवर्धक कामांचीही आहे. अशीं मोठालीं रेल्वेचीं कामें मुद्दाम दिलेल्या रकमांतूनच होतात. नित्याच्या सार्वजनिक हिताशीं ज्यांचा निकट संबंध आहे अशीं आरोग्यरक्षणाचीं कामें तर ना. गोखले यांनीं सुचविल्याप्रमाणें सालोसाल देण्यांत येणाऱ्या रकमेंतून होत जातील. खरी गोष्ट अशी आहे कीं, रेल्वेंत पैसा अडकविल्यापासून उत्पन्नाचें बाब तयार होते. आरोग्यरक्षक कामांत पैसा घातल्यामुळें लोकांना सुख होईल पण सरकारच्या तिजोरींत त्यामुळें भर पडत नाहीं. आणि म्हणून अशा कामीं रकम खर्चीं घालण्याचें हिंदुस्थान सरकारच्या मनास येत नाहीं. प्रजेचें सुख व कल्याण हेंच आपली पहिली कर्तव्यदिशा आहे हें सरकारनें ध्यानांत घेतलें तर काय अशक्य आहे. पण सध्यांची आमच्या सरकारची स्थिति ना. गोखले यांनीं वर्णिल्याप्रमाणें घरीं पोरेंबाळें रोगराईनें खितपत पडून मरत असतां त्यांच्या उपयोगीं पडावें म्हणून बँकेंत द्रव्य ठेवावयास धावणाऱ्या बापाप्रमाणें आहे.

## लजपतरायांच्या फिर्यादी.

लाला लजपतराय हे मंडाले येथें अटकेंत असतांना कलकत्याचें 'इंग्लिशमन' व लाहोर येथील 'सिव्हिल मिलिटरी गॅझेट' या पत्रांनीं त्यांचे संबंधानें खोटसाळपणाचा व बदनामी करण्यासारखा मजकूर प्रसिद्ध केला त्यावरून आपलें समाजांत जें अब्रुचें नुकसान झालें आहे त्याची भरपाई करण्याविषयीं लालाजींनीं सदर पत्रांचे मालकांस नोटीसा दिल्या होत्या, पण आपसांत हें प्रकरण मिटविण्याला ते कबूल न झाल्यावरून लालाजींनीं कलकत्ता व लाहोर येथील कोर्टांत फिर्यादी दाखल केल्या आहेत. त्यांनीं प्रत्येक प्रतिवादीकडून आपल्याला रुपये ५०००० ची रक्कम नुकसानीदाखल मिळावी अशी कोर्टास विनंती केली आहे. कोर्टापुढें हें प्रकरण असल्यामुळें या संबंधांत तूर्त कांहीं लिहितां येत नाहीं. तथापि ज्या लेखांवरून फिर्यादी झालेल्या आहेत त्यांच्या वाचनानें कोणाच्याही लक्षांत या प्रकरणांतील रहस्य येईल. इंग्लिशमन पत्राच्या लाहोर येथील बातमीदारानें पाठविलेल्या पत्रांत लाला लजपतरायांच्या हद्दपारीसंबंधाच्या खरा मजकूर प्रसिद्ध करण्याचा आव घालून 'कनाल कॉलनीज बिलासंबंधानें पंजाबांत जी चळवळ झाली तींत नेटिव्ह पलटणींतील शिपायांचा संबंध कसा आला, कनिष्ठ प्रतीच्या लष्करी अधिकाऱ्यांचे रिपोर्टावरून लॉर्ड किचनर यांनीं लॉर्ड मिंटो यांजकडे कशा रीतीचा आग्रह धरला, लॉर्ड मिंटो यांनीं लष्करी अंमलदारांची तक्रार खरी आहे अशी खात्री मुल्की अमलदारांकडून कशी करून घेतली आणि शेवटीं कनाल कॉलनीज बिल रद्द न होईल व लाला लजपतराय व अजितसिंह यांना हद्दपार केले न जाईल तर आपण राजीनामा देऊं असा लॉर्ड किचनेर यांनी घातलेला धाक लजपतरायांच्या हद्दपारीस कसा कारण झाला याचे आपल्या मनाप्रमाणें वर्णन केलें आहे. पंजाबांतील चळवळ व लजपतराय यांचा निकट संबंध जोडूनही पुरेसें न वाटून इंग्लिशमनच्या बातमीदारानें शेवटीं स्वतःचों विधानें ठोकून दिलीं तीं अशीं 'पंजाबी शिपायांच्या राजनिष्ठेंत विष कालविण्याचा गुन्हा लजपतराय यांचेकडून झालेला आहे याबद्दल लवलेशाही शंका नाहीं. सबब आणखी कित्येक वर्षें त्यांची मुक्तता करणें हें अत्यंत अक्षम्य, मूर्खपणाचें व भयंकर कृत्य होईल. लजपतरायांच्या अंगच्या सद्गुणांमुळेंच ते अधिक भयंकर गृहस्थ आहेत. अशा तऱ्हेच्या अर्धवट शहाण्या अर्धवट वेड्यामध्यें अंतर्भूत होणारे अर्धवट धार्मिक व अर्धवट राजकीय पिशानें भरलेलीं माणसें हींच बहुशः भयंकर कट करणारीं असतात.' लाहोरच्या सिव्हिल मिलटरी गॅझेटचा व हिंदू लोकांचा नेहमींचाच बाराचा बृहस्पती आहे तेव्हां खालीं दिलेलीं मुक्ताफळें त्याचे मुखांतून निघावीं हें युक्तच आहे. 'बंडखोर चळवळींत सामील असलेल्या इतर असंख्य कार्यकारी, सल्लागार, सांगकामे वगैरे लोकांकडे दुर्लक्ष करून सरकारनें राजद्रोह्यांच्या शिरोमणीला पक्कें कचाट्यांत धरलें आहे. लाला लजपतराय आतां अगदीं शून्य होऊन राहिले आहेत. एकच दिवसापूर्वीं हा बंडखोर आपल्या बंडाच्या चळवळींत अगदीं गर्क होऊन राहिला होता. परंतु आज तो हजारों मैल अंतरावर आहे. या बदमाषाच्या चारित्र क्रमावर अंदमान बेटाची शाश्वतिक छाया पडणार असा सर्व साधारण समज आहे. ज्या ठिकाणीं जिवावर उदार झालेल्या एकलाख लोकांची सेना आपल्या ताब्यांत आहे असें लजपतरायास वाटत होते व ज्या ठिकाणच्या दूरवर जाळें पसरलेल्या राजद्रोही चळवळींचें प्रत्येक सूत्र त्याच्या हातीं खेळत होते तो लजपतराय पंजाबच्या दृष्टीस फिरून कधींही पडणार नाहीं एवढें मात्र खास. अनेक कांशीं व दृढबद्धमूल अशा क्रांतिकारक चळवळीचा लजपतराय हा उत्पादक, व्यवस्थित स्वरूप देणारा, पैशाचा पुरवठा करणारा, प्रेरणा करणारा व दिशा दाखविणारा मुख्य सूत्रधार होता.'

## ऐक्य व भिन्नता

भिन्नभिन्न मतें, विचार, आकांक्षा इत्यादिकांचें आस्तित्व समाजाच्या जागृतीचें चिन्ह आहे असें अलीकडे बरेंच वेळां प्रतिपादन केलेलें दिसून येतें. पण हें विधान या स्वरूपांत सर्वस्वी खरें नाहीं, इतकेंच नव्हे तर त्याचें प्रतिपादन करण्यांत ज्या मानानें अतिरेक होईल त्या मानानें त्याची असत्यता मात्र जास्त उघड होत जाईल. ऐक्याप्रमाणेंच मतवैचित्र्य समाजाच्या वाढीला उपयुक्त होतें असेंही अनेक प्रसंगी ह्मटलेलें आढळन येतें. पण मतवैचित्र्य उपयुक्त केव्हां होतें ही विचाराची गोष्ट आहे. सृष्टिक्रमांत मुद्दां हा नियम आढळून येतो. जीवसृष्टिमध्यें जों जों वृद्धि होत जाते तों तों तिच्या निरनिराळ्या भागांकडे निरानिराळीं कार्यें येतात. पुढें समाज किंवा राष्ट्र या स्वरूपांपर्यंत मजल आली म्हणजे या भिन्न कार्यकारित्वांत भिन्न प्रकृति, भिन्न भिन्न संवयी, मतें, इच्छा यांचा उगम होतो. जिवाच्या किंवा समाजाच्या निरनिराळ्या अवयवाचें अस्तित्व किंवा त्यांची सजीवता भासमान होण्यापुरतेंच जेवढें भिन्नत्व असतें त्याची मुळाशीं असलेल्या ऐक्याशीं कधींही तागतूट करतां येत नाहीं. या ऐक्याचें दिग्दर्शन करणारें जें वैचित्र्य असेल तेंवढेंच हित वह असतें हें नेहमीं लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. एका अवयवाची वृद्धि इतकी झाली कीं ती दुसऱ्याच्या वाढीच्या आड येऊं लागली असतां एकंदर शरीराच्या निरनिराळ्या भागांच्या ऐक्याचा नाश होण्याची वेळ आली तर ती त्या अवयवाची वृद्धि हितकर झाली असें कधींही ह्मणतां यावयाचें नाहीं. समाजांतील निरनिराळ्या व्यक्तींची किंवा व्यक्तिसमुहाचीही अशीच गोष्ट आहे. आपणाहून भिन्न अशाच्या वाढीचा मार्ग [illegible] आपली वाढ पूर्ण करून घेण्याकडे समाजांतील कित्येक व्यक्तींची किंवा व्यक्तिसमूहाची प्रवृत्ति होते. आणि या वाढीचा परिणाम समाजाच्या सर्व घटकांमधील ऐक्याची जोपासना करण्याच्या अगदीं उलट ह्मणजे समाजाला विस्कलीत करण्याचा होतो. ह्मणून विचारांचें किंवा मतांचें भिन्नत्व असलें तर तें अशाच बेताचें असावें कीं त्यामुळें एखाद्या विशिष्ट भागाच्या वृद्धीला कारण होईल; पण समूहाची ऐक्यता बिघडूं देणार नाहीं. किंवा त्यांतील दुसऱ्या कोणत्याही घटकाच्या नैसर्गिक वृद्धीच्या आड येणार नाहीं.

## कन्व्हेन्शन कमिटी

सुरत येथें राष्ट्रीयसभेचें काम अवशक्य झाल्यावर सुमारें बाराशें प्रतिनिधींचें जें कन्व्हेन्शन भरलें त्यांत नेमलेल्या कमिटीची बैठक अलाहाबादेंत होऊन राष्ट्रीयसभा पुनः भरविण्याविषयीं निश्चय झाला. याच वेळेस राष्ट्रीयसभेचे हेतु व तिचें कामकाज चालविण्यासंबंधाचे नियम ठरले आहेत. ब्रिटिश साम्राज्यांतील स्वराज्य चालविणाऱ्या संस्थानांतील पद्धतीसारखी राज्यपद्धती हिंदुस्थानांतील लोकांना साध्य व्हावी आणि त्या संस्थानाच्यासारखेच पूर्ण हक्क व जबाबदारी हिंदुस्थानांतील लोकांना प्राप्त व्हावी हा राष्ट्रीय सभेचा हेतु असावा असें ठरलें आहे. हा हेतु पूर्णपणें कायदेशीर उपायांनीं साध्य करून घ्यावयाचा आहे. या उपायांत, सध्यांच्या राज्यपद्धतींत

अखेरीस ता. १९ रोजीं तारखात्यांतील बखेड्याचा निकाल लागला. संपवाल्यांची एक सभा भरून तारखात्याच्या शर्ती मान्य करण्याचें ठरलें. ता. ८ पासून पुढें बडतर्फी संबंधाचे तारखात्याकडून निघालेले हुकूम परत घेण्याचें तारखात्याच्या अधिकाऱ्यानें कबूल केलें असून संपांत सामील झालेल्यास पूर्ण माफी करण्याचें त्यांनी अभिवचन दिलें नवीन पद्धतीसंबंधानें चौकशी करण्यासाठीं एक कमिटी नेमण्याचें अधिकारीवर्गानें कबूल केल्यावरून अनुभव पाहण्यासाठींच फक्त थोडे दिवस त्या पद्धतीनें काम करण्याचें संपवाल्यांनीं कबूल केलें आहे. संपवाल्यास पूर्ण माफी करण्याचें व त्यांस [illegible]च्या जागीं कामावर रुजूं करण्याचें अधिकारीव[illegible] आश्वासन मिळाल्यावरून झालेल्या प्रकाराबद्दल खेद प्रदर्शित करण्याचें संपवाल्यांनीं कबूल केलें असून त्या प्रत्येकाकडून एका करारावर सही करून घेण्यांत येणार आहे. ता० १ जुलईपासून पगार वाढविण्याचें डायरेक्टर जनरलकडून संपवाल्यास आश्वासन मिळालें आहे व गैरहजिरीच्या दिवसांचा पगार सोडण्यास संपवालेही तयार आहेत.

कलकत्ता येथील पोष्टखात्याचे नौकर लोक लवकरच संप करतील अशी अधिकारी लोकांस भीति वाटत असून नौकर लोकांमधील असंतोष नाहींसा करण्याचा प्रयत्नही करीत आहे काल सांयकाळीं विचारस्याशिजे गैरहजर राहिले त्यांस अधिकाऱ्याकडून बडतर्फ करण्यांत आले आहे.

सरहद्दीवरील मुसलमानांशीं लौकरच दोन हात करावे [illegible] असा संभव दिसत आहे [illegible] लोकांपेक्षां थोडा कमी त्रास दिला एवढेंच काय तें. सध्यां त्यांच बराच मोठा जमाव झाला असून तो ब्रिटिश मुलुख[illegible] रून येणार असा रंग दिसत आहे. शापकादर येथें त्यांच्यावर नजर राखण्याकरितां पेशावराहू[illegible] पुढें चाल करीत आहे. ह्यावरून लौकरच एकमेकांवर गोळ्या झाडण्यांत येतील असें दिसत.

ऊंस गाळून झाल्यानंतर उंसाच्या ज्या चोयट्या राहतात त्यांचा कागद करण्याचें कामीं उपयोग होतो असा त्रिनिदाद येथील उंसाची लागवड करणार मि. [illegible] डी लामूर यांनी नवीन शोध लावला आहे.

**हें चित्र पहा —** लांच खाल्ल्याच्या आरोपावर गुजराणवाला येथील मि. जे. ई. स्टीफन्स यांना कामावरून सस्पेंड केलें व या प्रकरणाची बारकाईनें चौकशी करण्याकरितां एका स्पेशल मॅजिस्ट्रेटची नेमणूक झाली, अशी पूर्वी तारेनें बातमी आली आहेच. त्यानंतर सुमारें २०० लोकांच्या लेखी व तोंडी जबान्या झाल्या. त्यामध्यें आरोपीचा गुन्हा शाबीत होण्यासारखा पुरावा होता असें ह्मणतात, तथापि मि. स्टीफन्स यांना पुनः कामावर रुजूं होण्याची परवानगी मिळाली आहे. इतकेंच नव्हे तर त्यांची ब्रह्मदेशांत बढतीवर रवानगी होणार आहे अशी लोकवार्ता आहे.

**आणि हीं चित्रें पहा —** याप्रमाणें हे साहेब सुटले, परंतु तेंच पब्लिक वर्क्स खात[illegible]तील एका शीख कारकुनानें 'डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट[illegible] कचेरींत आपणास नौकरी मिळवून दिल्यास १०० रुपये देऊं' असें तेथील हेड क्लार्कला पत्रांत लिहिल्याबद्दल तीन महिने सक्त मजुरीची शिक्षा दिली आहे. निकाल देतांना मॅजिस्ट्रेटनीं असें सांगितलें कीं, आरोपी चांगल्या स्वभावाचा आणि अब्रुदार घराण्यापैकीं आहे हें मला कबूल आहे, परंतु लांच घेणें हे गुन्हे सर्वत्र माजलेले असतांना देखील, शाबीद करणें फार कठीण जातें. ह्मणून या गुन्ह्यामध्यें मी आरोपीला कडक शिक्षा देत आहे. व जलंदरहून अशी बातमी आली आहे कीं, तेथील अपकारी खात्यांतील एका हिंदी कारकुनाला लांच घेतल्याच्या आरोपावरून पांच वर्षांची सक्त मजुरीची सजा देण्यांत आली आहे.

"इंग्लिशमन" पत्रांत पुढील बातमी प्रसिद्ध झाली आहे:—"बांब गोळा फेंकण्याच्या आरोपावरून पकडण्यांत आलेल्या नागेंद्र बोस नांवाच्या मनुष्याची जबर दस्तीनें अटकेंतून सुटका करण्याकरितां चंद्रनगरचे बंगाली लोक जमून गेले. त्यावर, मेयरनें फ्रेंच शिपायांना बागनेटी रोखून बंगाली लोकांवर हल्ला करण्याचा हुकूम केला. त्यानंतर, बंगाली लोकांनीं धूम ठोकली. कांहींनीं गंगेंत देखील उड्या टाकल्या." ह्या बातमीमुळें बंगाल्यांत मोठी गडबड उडून गेली आहे. "इंग्लिशमन" पत्र ह्मणतें:—"बंगाली लोकांना चंद्रनगरवर राज्य करण्याची इच्छा झाली आहे व ह्या शहरावर बंगाली गव्हर्नर नेमण्याचा त्यांचा हेतु आहे!" परंतु बंगाली लोक ह्मणत आहेत कीं बांब गोळा मुळींच फेंकण्यांत आला नाहीं. केरोसिन तेलाचा एक दिवा कायतो फुटला व त्याचा बांबप्रमाणें आवाज आल्यासारखा वाटला.

हिंदुस्थानांतील इतर मुख्य मुख्य ठिकाणाप्रमाणें लाहोर येथेंही विभागणी कमिशनपुढें सरकारी व बिनसरकारी गृहस्थांच्या साक्षी होऊन कमिशनचें हिंदुस्थानांतलें काम संपलें. कमिशनपुढें आलेल्या साक्षीपुराव्याचें मंथन करून रिपोर्ट तयार करण्यास कमिशनला आणखी किती दिवस लागतील त्यासंबंधाची निश्चित माहिती अद्यापि प्रसिद्ध झालेली नाहीं.

युगांतर— पत्राच्या ता. ४ एप्रिलच्या अंकांत 'इंग्रजी जुलूम' या मथळ्याखालीं आलेला लेख राजद्रोहाचा आहे असें ठरवून 'युगांतर' कचेरीचा झाडा घेण्यांत आला व कांहीं कागदपत्र वगैरे जप्त करण्यांत आले. या पत्राचे मुद्रक व प्रकाशक बाबू फणींद्रनाथ मित्र यांजवर वारंट काढण्यांत आले होतें, व पोलीस त्यांना पकडण्याकरितां आलेही होते. पण त्यांनीं घराच्या छपरावरून जवळील घराच्या छपरावर उड्या मारून शिताफीनें पोबारा केला. जप्त केलेले कागदपत्र घेऊन पोलीस जात असतां लोकांनीं त्यांची हूर्यो करून त्यांस शिव्या दिल्या. फणींद्रबाबू हे तालीमबाज असून एका सर्कसमधील काम करणार कुशल इसम आहेत.

# वऱ्हाडसमाचार

चैत्र वद्य १२ शके १८३०

## औद्योगिक पुनरुज्जीवनाचा खरा मार्ग

बंगाल्यांतील असोसिएशन फार दि अडव्हान्समेंट ऑफ सायंटिफिक् अँड इंडस्टियल एज्युकेशन ऑफ इंडियन्स नामक संस्थेची पांचवी वार्षिक सभा नुकतीच कलकत्ता येथें बाबू नरेंद्रनाथ सेन यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. गतवर्षांत या संस्थेच्या पुरस्कर्त्यांपैकीं महाराजा सर ज्योतिंद्र मोहन टागोर हे परलोकवासी झाले. गेल्या तीन वर्षांमिळून शिक्षणासाठीं परदेशीं जाण्याकरितां एकंदर १५७ विद्यार्थ्यांची निवड करण्यांत आली होती. त्यापैकीं १०० विद्यार्थी संस्थेच्या आश्रयाचा फायदा घेऊन ज्ञानार्जनासाठीं परदेशास गेले. यांपैकीं १९ विद्यार्थी आपआपला शिक्षणक्रम संपवून परत आले असून त्यांना योग्य तो तो उद्योग मिळाला आहे. सांपत्तिक दृष्ट्या या संस्थेची स्थिति चांगलीच आहे. गतवर्षी सुमारें पन्नास हजार रुपये उत्पन्न होऊन अडतीस हजार रुपये खर्च झाला. या संस्थेच्या विद्यमानें चाललेल्या शेतकीच्या क्षेत्राचीही स्थिति बरीच सुधारत चालली अदोच्या [illegible] होय किंबहुना डेव्हलपमेंट [illegible] त्यांस आ[illegible] हस्तानें [illegible] साठी बरवर उचलून धरीत आहे [illegible] क्रीश: राजश्री टिळक [illegible] तिचें काम एक महिन्याचे आंत चालूं होईल. देशी वस्तूंचें एक कायमचें संग्रहालय कलकत्त्यास स्थापण्याची बहुतेक सर्व तयारी झाली आहे. अशा रीतीनें या संस्थेच्या मार्फतें अत्यंत प्रसंशास्पद असें काम होत आहे. या सं[illegible] जन्म एकंदर देशांत स्वदेशी चळवळीचा उगम होण्यापूर्वींच एक वर्ष झालेला असून ही संस्था खरें स्वदेशी कार्य करीत आहे. सदर प्रसंगीं अध्यक्ष बाबू नरेंद्रनाथ सेन यांनीं या संस्थेकडून होणाऱ्या कामाचें पर्यालोचन स्वदेशी चळवळीसंबंधानें फार उपयुक्त असे विचार प्रगट केले. ते ह्मणाले आह्मी जें कार्य करित आहों त्याचा फायदा कोणत्याही एका जातीला होणारा नसून तो सर्वांना सारखाच होणारा आहे आणि आह्मी कोणालाही दुखवीत नाहीं. सहानुभूति आणि सहकारित्व हीं आमच्या कामांतील मुख्य तत्वें आहेत. ज्याला ज्याला ह्मणून हिंदुस्थानच्या औद्योगिक सुस्थितीविषयीं आस्था वाटत असेल, त्याला या संस्थेंत येण्याला पूर्ण मुभा आहे; मग त्याचे राजकीय, धार्मिक आचार विचार कांहींही असोत व तो कोणत्याही देशचा रहिवासी असो. या संस्थेकडून होणारें काम खरें खरें स्वदेशी आहे. पण त्याला जातिद्वेष, वर्णमत्सर किंवा दंडेफराशी यांचा आधार आह्मी दिलेला नाहीं. पाश्चिमात्य व पौर्वात्य विचारांच्या मिश्रणानें हिंदुस्थानचें औद्योगिक पुनरुज्जीवन होईल असा आह्मास पक्का भरंवसा वाटत आहे. ह्मणून पाश्चिमात्य देशच आमच्या लोकांना ज्ञानार्जनाला योग्य असें क्षेत्र आहे हें लक्षांत घेऊन आह्मी तेथें इकडील तरुण व होतकरू लोकांना त्या करितां पाठवीत असतो, सध्यां हिंदुस्थानांत सांपत्तिक स्थिति संबंधाचा प्रश्न अतिशय महत्वाचा होऊन बसला आहे. या पासूनच लोकांमधील अस्वस्थता व इतर प्रकार यांची उत्पत्ति आहे. या प्रश्नाचा निकाल साध्या मार्गानें व कोणाचेंही मन न दुखवितां अगर कोणालाही राग येण्याला कारण उरूं न देतां करण्याचें या संस्थेनें पतकरलें आहे. आपल्या कामानें आह्मी लोकांना व सरकारास मदत करीत आहों. आह्मी स्वीकारलेल्या मार्गामुळें हिंदुमुसलमान सरकारि बिनसरकारी सर्व प्रकारचे लोक एकेठीकाणीं येण्याची तजवीज झाली आहे. आणि हिंदुस्थाचें औद्योगिक पुनरुज्जीवन करण्याचा हाच रस्ता उत्तम मार्ग आहे. असा आह्माला भरंवसा आहे. बाबू नरेंद्रनाथ यांची विचारसरणी किती तरी पोक्त व व्यविहारिक आहे!

---

### आरोग्य रक्षण

अलीकडे हिंदस्थान सरकारच्या तिजोरींत सालोसाल जी शिलकेची भर पडत आहे तिचा विनियोग कसा करावा या मुद्यावर गेल्या बजेटावरील वादविवादाचे वेळीं बराच ऊहापोह झाला. चालू हिशेबांतील शिलक रकमेचा उपयोग रेल्वेकडे करण्याची जी पद्धत सरकारनें स्वीकारली आहे तिचा गेलीं कित्येक वर्षें पर्यंत ना. गोखले यांजकडून प्रतिवर्षीं निषेध होत [illegible] आला [illegible] लोकनिर्देश[illegible] रकमेचा खर्च हिंदुस्थानला अत्यंत आवश्यक अशा आरोग्य रक्षणाचे कामीं व्हावा अशी सूचना त्यांनीं गेल्या वर्षीं केली होती; तिचीच पुनरावृत्ति त्यांनीं यंदांही केली. गतवर्षी सरकारतर्फे ना. मि. बेकर यांनीं असें प्रतिपादन केलें होतें कीं ही शिलक दरवर्षीं उरेलच अशी खात्री नसल्यामुळें, अशा बेभरंवशाच्या उत्पन्नाच्या आधारावर नवीन आरोग्य रक्षणाच्या कामांना सुरवात केल्यास मागाहून उत्पन्न न झालें तर कामें बंद ठेवावीं लागतील; ह्मणून अशा चुकीच्या तत्वाची पद्धति स्वीकारणें योग्य होणार नाहीं. या प्रतिपादनाला ना. गोखले यांनीं उत्तर दिलें. त्यांनीं असें दाखवून दिलें कीं या शिलकेची सालोसाल निरनिराळ्या प्रांतिक सरकारांमध्यें वांटणी करून देऊन त्यांचेपाशीं एक फंड तयार होईल अशी व्यावस्था करावी. प्रांतिक सरकाराजवळ असलेल्या शिल्केंत हा फंड जमा करावा. या फंडांत ऐन उत्पन्नांतून सालोसाल भर टाकीत जावी आणि या फंडांतून आरोग्य रक्षक कामें करविण्यांत यावीत; मात्र त्यांत एक अशी अट घालावी कीं एखाद्या कामाला लागणारी सर्व रक्कम प्रांतिक सरकारच्या हातीं असल्याखेरीज तें काम सुरू केलें जाऊं नये. वास्तविक पहातां आरोग्य रक्षणोपयोगीं कामें ह्मणजे निरनिराळ्या ठिकाणच्या आरोग्याच्या व्यवस्थेंतील सुधारणा होय. यामुळें कोणतेंही एखादें मोठें काम पैशाच्या अडचणीमुळें बंद पडेल व झालेला खर्च फुकट जाईल असा संभव

# वऱ्हाडसमाचार

**BERAR SAMACHAR**

वर्ष ४२ ] आकोला वऱ्हाडसमाचार सोमवार तारीख २७ माहे एप्रिल सन १९०८ इ० [ अंक १५



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन आळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

ह्या बँकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेकडा तीन टक्के प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A Phillips
आकोला ९।९।०९ } एजंट
नं ७३


### नोटीस

डिगीबाई जवजे गौतमलाल गुजराथी राहाणार बाळापूर यांसः—

रामकृष्ण बाळाजी ओक वकील आकोला यांजकडून कळविण्यांत येतें कीं, आमचा पक्षकार कुमनलाल वल्लद मन्नुलाल गुजराथी राहाणार बाळापूर याची सोयरीक तुमची मुलगी नामे गोकळीबाई इचे बरोबर ठरली. त्यास सुमारें २ वर्षें झालीं. तेव्हांपासून कुमनलाल यानें तुमचे मुलीस जातीचे रीतीप्रमाणें वेळोवेळीं दागिने कपडे व खाऊ देण्याचें सुरू केलें.

हल्लीं कुमनलाल यांस असें समजलें कीं सदर्हू सोयरीक तुम्ही कांहीं कारणाशिवाय मोडून आपली मुलगी गोकळीबाई ही रा. विठुलाल सुंदरलाल गुजराथी यांस देण्याचें ठरविलें आहे.

कुमनलाल याचे बरोबर केलेली सोयरीक विनाकारण तुम्ही मोडली सबब कपडे वगैरे बद्दल त्यांचें नुकसान रुपये १०० चें आज पावेतों झालें आहे तें व सोयरीक मोडल्यामुळें झालेलें नुकसान रुपये ३०० एकूण रुपये ४०० व तुमचा भ्रतार मोहनचंद यांजकडे कुमनलालची बाकी घेणें आहे ती रुपये ३१॥- व त्याचें व्याज अशी एकंदर रक्कम तुम्ही हो नोटीस पावल्या पासून ८ दिवसांत कुमनलाल यांस देऊन त्याची पावती घ्यावी असें न केल्यास कायदेशीर उपाय करून रक्कम वसूल केली जाईल. कळावें. तारीख २९।४। ८ इ०

सही
रामकृष्ण बाळाजी ओक
वकील अकोला

नं. ख. ९४

### नोटीस

सुर्याजी वल्लद हैबतं हसकी जात कुणबी रा. कजवे वाकद प्रगणे मजकुर ता. वाशीम जि. अकोला यास— ठकी मर्द सुर्याजी हसकी जात कुणबी रा. मेहकर ता. मेहकर जि. बुलडाणा इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी तुमची लग्नाची बायको असून तुम्हीं मजला विनाकारण आपण होऊन [illegible] राहिल्या [illegible] याचे मुसर्कीर मना- [illegible] त्या पेक्षां [illegible] एक [illegible] पासून [illegible] यांचा वका- [illegible] राचें कर्ज काढून [illegible] झाल हे पक्षच आहे. तुम्ही मजला न नेतां दुसरी पाटाची बायको केली असून संसार करितां. आतां माझे खावास माझेकरितां सावकार कर्ज देत नाहींत, या मुळें माझे अन्नवस्त्राची फार गैर सोय आहे सबब मजला दुसरा घरठाव करणें भाग आहे. करितां ही नोटीस पावल्या दिवसापासून आठ दिवसांचें आंत मजला झालेलें कर्ज रुपये २५० देऊन घेऊन जाणें. सदरहु मुदतींत न आल्यास मी ही दिलेली नोटीस हांच फारकती समजून दुसरा घरठाव करीन. मग तुमचा मजवर व माझ्याशीं गंधर्व करणाऱ्यावर कोणतेच प्रकारचा दावा चालणार नाहीं, करितां अगाऊ ही नोटीस दिली आहे. कळावें ता. १६- ४- ०८ इसवी

सही
ठकी मर्द सुर्याजी.
नं. ख. ९९ नि. हातची बांगडी.

### सर हे. कॅ. बॅनरमन यांचा मृत्यु.

पुष्कळ दिवसपर्यंत दुर्धर व्याधीचे शेवटचे कष्ट सोसून शेवटीं गेल्या आठवड्यांत माजी मुख्य प्रधान सर हेन्री कॅंबल बॅनरमन यांचा अंत झाला. आपलें दुखणें असाध्य आहे असें पाहून त्यांनीं चालू महिन्याचे सुरुवातीलाच आपल्या जागेचा राजीनामा देऊन ब्रिटिश सामराज्याच्या कारभाराचें जूं नवीन उमेदाच्या मुख्य प्रधानांच्या व त्यांच्या पंक्तीच्या प्रधानांच्या मानेवर ठेवलें होतें. सर हेन्री यांचा म्हणजे सध्यांच्या लिबरल पक्षाचा गेल्या तीन वर्षांत हिंदुस्थानाशीं बरेंच वेळां संबंध आला. पण त्यांत हिंदुस्थानच्या लोकांचें कोणत्याही प्रकारचें कल्याण बुद्धिपुरस्कर करण्यांत आलेलें नाहीं. ही गोष्ट आम्ही मागेंच नमूद केलेली आहे. सर हेन्री कॅंबल बॅनरमन हे लिबरल पक्षाचे कट्टे भक्त होते हें त्यांना त्या पक्षांत मिळालेल्या उच्च स्थानावरूनच व्यक्त होते. पण ते लिबरल म्हणजे उदार मतांचे कैवारी होते असें जर कोणी प्रतिपादित असेल तर तें निदान हिंदुस्थानांत तरी कोणी खरें मानणार नाहीं. ज्या लोकांपासून गोळा केलेल्या पैशाच्या जोगवर राज्यकारभार चालवयांचा त्यांचाच फक्त अभिप्राय खर्चाच्या बाबतींत प्रमाण मानला जावा हें जें खरें लिबरल तत्व आज सर्व जगांत दुमदुमत आहे याचा उगम इंग्लंडांतील लिबरल पक्षाच्या उद्योगापासून झालेला आहे हें जगजाहीर आहे. पण आतांचे आपणांस लिबरल म्हणविणारे मतानें [illegible] नसून फक्त अधिकाराच्या उपभोगाकरितां त्यांना तें सोंग करावें लागत आहे असा अनुभव प्रत्यक्ष आलेला आहे.

## वर्तमानसार

गेल्या रविवारीं रात्रीं उतारूंनीं गच्च भरलेल्या दोन आगगाड्या आडेलना व बालारत येथून मेलबोर्नला येत असतां बेंबुक जंक्शनवर त्यांची टक्कर होऊन ४२ जण ठार झाले व ८० जण जखमी झाले आहेत.

संध्या - पत्राचे मुद्रक बाबू जोगेंद्रनाथ सेन यांस पकडण्यांत आलें आहे. आपलें खरें नांव न सांगतां कोर्टांत दिलेल्या प्रतिज्ञालेखांत खोटें नांव दिल्याबद्दल त्यांजवर खटला चालणार आहे.

त्रिपोली जिल्ह्यांत डर्ना येथें एका इटालियन गोमाश्यास तुर्क लोकांनीं ठार केल्याबद्दल व दुसऱ्या कांहीं कारणावरून अकरा लढाऊ जहाजें तुर्की समुद्रांत पाठवून देण्यांत येत आहेत. तुर्कस्थानांत पांच इटालियन पोष्ट हापिसें उघडण्याची परवानगी इटालीनें तुर्कस्थानांत मागितली होती. परंतु तुर्कस्थाननें ही परवानगी न देतां पोष्ट हापिसें उघडल्यास तीं बंद केलीं जातील असें इटालीस बजावून सांगितलें. ह्या कारणामुळेंही इटली तुर्कस्थानाविरुद्ध चेतला आहे. आडमिरल ग्रेव्हेट यांच्या नायकत्वाखालीं अकरा लढाऊ जहाजांचा काफिला पाठविण्यांत येत आहे. इजियन समुद्रांतील एखादें बेट हीं लढाऊ जहाजें व्यापतील व स्मरना येथें आरमारी धाकदपटशा दाखविण्यांत येईल, असा व्हिएन्न पत्रांचा तर्क आहे. इटलीच्या [illegible] मुळें सर्व यूरोपांतलि लोक विर[illegible] आहेत; कारण तंटा [illegible] खेडा उत्पन्न [illegible] बातमी ह्यापूर्वीं प्रसिद्ध झाली नव्हती.

लाला लजपतराय हे मंडले येथें प्रतिबंधांत असतांना त्यांची बेअब्रु करणारे लेख प्रसिद्ध केल्याबद्दल 'इंग्लिशमन' पत्रावर कलकत्ता येथील हाय [illegible] लालाजीं फिर्याद केली असून [illegible] ९० हजार रुपये [illegible] आली आहे.

सुरतच्या कनव्हेन्शननें नेमलेल्या कमिटीची बैठक अलाहाबाद मुक्कामीं ता. १८ व १९ रोजीं भरली होती. काँग्रेसची पद्धतशीर रचना करून तत्संबंधीं नियम करणें हा ह्या कमिटीच्या सभेचा उद्देश होता. एकंदर चौपन्न सभासद हजर होते. डॉक्टर घोष यांनीं अध्यक्षस्थान सुशोभित केलें होतें. ब्रिटिश साम्राज्याचे स्वयंशासित नागरिक भोगीत असलेली राज्यपद्धति हिंदुस्थानचे लोकांस मिळावी व ह्या नागरिकांच्या बरोबरीनें हिंदुस्थानच्या लोकांचे साम्राज्यविषयक हक्क व जबाबदारी असावी हें काँग्रेसचे हेतु असून असें काँग्रेसच्या पद्धतशीर पुनर्घटनेच्या [illegible] मसुद्यांत आलें आहे. कायदेशीर रीतीनें, प्रचलित राज्यपद्धतींत सुधारणा घडवून आणून व राष्ट्रीय ऐक्य वृद्धिंगत वैराग्य लोकांमध्यें सार्वजनिक बाबतींत [illegible] उत्पन्न करून व देशाच्या बुद्धिविषयक, नैतिक, अर्थशास्त्रविषयक व औद्योगिक साधनसंपत्तीचा विकास करून अंगीकृत हेतु सफळ करण्याचा काँग्रेसचा हेतु आहे. ह्याप्रमाणें प्रतिपादन केलेले काँग्रेसचे हेतु आपणास मान्य आहेत व काँग्रेसच्या नियमबद्ध रचनेप्रमाणें वागण्यास आपण खुशी आहो, असें प्रतिनिधींनीं लेखी वचन दिलें पाहिजे, असा नियम करण्यांत आला आहे. येती काँग्रेस भरविण्यासंबंधानें पुढील ठराव पास करण्यांत आलाः— "ह्या कमिटीचे अध्यक्ष व सेक्रेटरी यांनी प्रांतिक सब कमिट्यांचा सल्ला घेऊन, ह्या नियमबद्ध रचनेप्रमाणें, नाताळच्या सुटींत काँग्रेस भरविण्याची व्यवस्था करावी." मुसलमान वगैरे संख्येनें कमी असलल्या लोकांसंबंधानें काँग्रेसच्या पुनर्घटनेंत अशा प्रकारची व्यवस्था केली आहे कीं देशांतील लोकांच्या राज्यव्यवस्थेंत अधिकाधिक शिरकाव होण्यासंबंधानें जे जे अर्ज होतील व ज्या मागण्या केल्या जातील त्यांत संख्याबळानें कमी असलेल्या लोकांच्या हितसंबंधांकडे पूर्णपणें लक्ष दिलें जाईल. नामदार गोखले हे सहा महिने विलायतला जाणार असल्यामुळें, नामदार खरे यांना काँग्रेसचे जॉईंट सेक्रेटरी नेमण्यांत आले आहे.